
• पुणे, बुधवार, १६ जुलै २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 228 • वर्ष ४ थे, अंक २२८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





P३

# शुभांशू शुक्ला पृथ्वीवर सुखरूप परतले

## ॲक्सिओम ४ मिशनचे यशस्वी लँडिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी ॲक्सिऑम ४ मोहिमेच्या माध्यमातून अंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवस घालवून पृथ्वीवर यशस्वी परत येण्याचा इतिहास रचला आहे. स्पेसएक्सच्या 'ग्रेस' या अंतराळयानानं सॅन डिएगो, कॅलिफोर्निया येथील किनाऱ्यावर ते सुरक्षितपणे उतरले आहेत. या मोहिमेत शुक्ला यांच्यासह तीन अन्य अंतराळवीरांचा समावेश होता. ही मोहीम भारताच्या महत्वाकांक्षी गगनयान कार्यक्रमासाठी एक मैलाचा दगड ठरली आहे, ज्यामुळं भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्रो) मानवी अंतराळ मोहिमेसाठी महत्त्वपूर्ण अनुभव मिळाला आहे.

### गगनयानसाठी महत्त्व

• शुक्ला हे इस्रोच्या गगनयान मोहिमेचे प्रशिक्षित अंतराळवीर आहेत. २०२७ मध्ये होणाऱ्या या मोहिमेसाठी त्यांचा हा अनुभव महत्त्वपूर्ण ठरेल. इस्रो नं ॲक्सिऑम ४ मोहिमेसाठी सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत, ज्यामुळं गगनयानच्या तयारीसाठी आवश्यक तांत्रिक माहिती मिळाली आहे. इस्रो यावर्षी किमान तीन मानवरहित चाचणी उड्डाणे करणार आहे, ज्यामुळं यानाची सुरक्षितता आणि विश्वासार्हता तपासली जाईल. नुकतेच गगनयानच्या सर्व्हिस मॉड्यूल प्रोपल्शन सिस्टमची पूर्ण-कालावधीची चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली.

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी ॲक्सिऑम ४ मोहिमेत मिशन पायलट म्हणून सहभाग घेतला. त्यांच्यासोबत मिशन कमांडर पेगी व्हिटसन, पोलंडचे स्लावोझ उझनांस्की-विस्निव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू हे मिशन विशेषज्ञ होते. ही मोहीम २५ जून रोजी दुपारी १२.०१ वाजता कॅनेडी अंतराळ केंद्रातून फाल्कन ९ रॉकेटद्वारे स्पेसएक्सच्या 'ग्रेस' अंतराळयानातून सुरू झाली. सुमारे २८ तासांच्या प्रवासानंतर, २६ जून रोजी दुपारी ४.०१ वाजता यान अंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर यशस्वीपणे जोडले गेलं. तिथं त्यांनी नासाच्या एक्स्पिडिशन ७३ संघासोबत वैज्ञानिक प्रयोग केले.

१८ दिवसांच्या वास्तव्यानंतर, १४ जून रोजी पहाटे २.५० वाजता हॅच बंद करून अंतराळयानानं स्थानकापासून स्वायत्तपणे वेगळं होण्याची प्रक्रिया सुरू केली. दुपारी ४.३५ वाजता यान स्थानकापासून पूर्णपणे वेगळं झालं. त्यानंतर यानानं अंतराळ स्थानकापासून दूर जाण्यासाठी अनेक प्रक्षेपण क्रिया (डिपार्चर बर्न्स) केल्या. १५ जुलै रोजी दुपारी २.०७ वाजता डी-ऑर्बिट बर्न पूर्ण झाल्यानंतर यानानं » पान ७ वर

» पान ७ वर

# महापालिकेने भाड्याने दिलेली जागा सह्याद्रीने विकली?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील आघाडीची खासगी रुग्णालय साखळी सह्याद्री हॉस्पीटल्स साखळी विकत घेण्यासाठी मणिपाल हॉस्पीटल्स समूहाशी व्यवहार झाला होता. तब्बल ६४०० कोटी रुपयांचा हा व्यवहार होता. सह्याद्री हॉस्पीटल साखळी आणि मणिपाल हॉस्पीटल यांच्यातील हा व्यवहार भारतातील सर्वात मोठ्या व्यवहारांपैकी एक मानला जात होता. या व्यवहारानंतर पुण्याती सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कोंढरे यांनी एक धक्कादायक आरोप केला आहे, ज्यामुळे हा संपूर्ण व्यवहारच अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राजेंद्र कोंढरे यांनी या व्यवहाराबद्दल बोलताना म्हटले की, पुणे महापालिकेने १९९८ साली सह्याद्री हॉस्पीटल्सला १ रुपया दराने २२ हजार स्क्वेअर फूट जागा ९९ वर्षांच्या कराराने दिली होती. ही जागा सह्याद्री हॉस्पीटलला देत असताना ती धर्मादाय कारणांसाठी देण्यात येत असल्याचे म्हटले होते. डेक्कन परिसरातील ही जागा असून, धर्मादाय कारणांसाठी देण्यात आलेल्या या जागेचा विक्री व्यवहार कसा होऊ शकतो, असा सवाल कोंढरे यांनी विचारला. महापालिकेने सह्याद्रीला दीर्घकाळासाठी नाममात्र दराने जागा भाड्याने दिल्याची महापालिकेने दिलेली कागदपत्रे आपल्याकडे असल्याचे कोंढरे यांनी म्हटले आहे.

कॅनडास्थित गुंतवणूकदार संस्थेने सह्याद्री हॉस्पीटल्समधील आपला प्रमुख हिस्सा मणिपाल समूहाला विकला आहे. ओटीपीपीने २०२२ मध्ये सह्याद्रीमध्ये गुंतवणूक केली होती आणि तीन वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात या हॉस्पीटलच्या साखळीचा विस्तार केला होता. सह्याद्री हॉस्पीटल साखळी समूह घेतल्यानंतर मणिपाल हॉस्पीटल्सकडे देशभरात ४९ हॉस्पीटल्स आणि १२ हजारांहून अधिक बेड्स असलेलं विस्तृत आरोग्यसेवा जाळं तयार झालं आहे अशी माहिती देण्यात आली होती. मणिपाल हॉस्पीटल्स लवकरच आयपीओ म्हणजेच शेअर बाजारात सूचीबद्ध होण्याच्या तयारीत आहे, त्यापूर्वी हा व्यवहार अडचणीत आल्याने यापुढे मणिपाल हॉस्पीटल नेमका काय निर्णय घेतंय हे बघणं महत्त्वाचे ठरेल. सह्याद्री हॉस्पीटल्सची पुण्यासह नाशिक, कराड आणि अहमदनगर येथे ११ रुग्णालये असून या रुग्णालयांद्वारे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा सेवा दिली जाते.

# शरद पवारांनी भाकरी फिरवली शशिकांत शिंदे नवे प्रदेशाध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा जयंत पाटील यांनी राजीनामा दिला होता. यानंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्वसाधारण बैठकीत नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून शशिकांत शिंदे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. मंगळवारी दुपारी ३ वाजता मुंबईत वाय बी चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची सर्वसाधारण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शशिकांत शिंदे यांच्या नावाची घोषणा केली.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यावर पक्षाला यश मिळवून देण्याची मोठी जबाबदारी आली आहे. जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर शशिकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरु होती. आज त्या चर्चेला पूर्णविराम मिळाला असून शशिकांत शिंदे यांच्या निवडीनंतर आता पक्ष वाढीसाठी त्यांच्याकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांकडे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचं लक्ष लागलं आहे.

वाय बी चव्हाण सेंटरमध्ये पार पडलेल्या या बैठकीला शरद पवार, जयंत पाटील, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी अनिल देशमुख यांनी नव्या » पान ७ वर

# विधानसभेत देसाई वि. सरदेसाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ठाकरेसेना आणि शिंदेसेनेच्या नेत्यांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. ठाकरेसेनेचे आमदार वरुण सरदेसाई आणि शिंदेसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांच्यात शाब्दिक चकमक झाली. मुंबईच्या वांद्रे येथील संरक्षण जमिनीवर असलेल्या झोपड्यांच्या पुनर्वसनाचा मुद्दा सरदेसाई यांनी उपस्थित केला. त्यावर माहिती देताना मंत्री देसाई यांनी उद्धव ठाकरेंच्या कार्यकाळाचा उल्लेख केला. त्यावरुन सरदेसाई संतापले.

वांद्रे येथे असलेल्या संरक्षण खात्याच्या ४२ एकर जमिनीवरील झोपड्यांच्या पुनर्वसन प्रश्नावरुन आमदार वरुण सरदेसाई यांनी एक लक्षवेधी मांडली. त्यावर जवळपास अर्धा तास चर्चा झाली. गृहनिर्माण मंत्रालयाचा कार्यभार एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. » पान ७ वर

# गणेशोत्सवासाठी कोकणात ५००० जादा बसेस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गणरायाचे आगमन २७ ऑगस्ट २०२५ रोजी होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. मुंबईतील कोकणाच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान ५००० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते गणपती उत्सवाच्या जादा वाहतुकीच्या अनुषंगाने मंत्रालयातील आपल्या दालनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थिती » पान ७ वर

## ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख लुटले: नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण

# निवृत्त विंग कमांडरच्या बंगल्यावर दरोडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वानवडी परिसरातील जांभुळकर चौकात पहाटेच्या सुमारास एक धक्कादायक दरोड्याची घटना घडली. निवृत्त विंग कमांडर वीरेंद्र कुमार जिंदाल यांच्या कौशल्या बंगल्यात दोन अज्ञात दरोडेखोरांनी घुसून ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख रुपये रोख रक्कम लुटली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास ही घटना घडली. वीरेंद्र कुमार आपल्या बंगल्यात गाढ झोपेत असताना दोन दरोडेखोरांनी त्यांच्या घरात प्रवेश केला.

### सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

• या घटनेमुळे केवळ वानवडीच नव्हे, तर संपूर्ण पुणे शहरात सुरक्षेच्या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली आहे. निवृत्त लष्करी अधिकाऱ्याच्या घरावर दरोडा पडणे हे गंभीर स्वरूपाचे आहे, कारण अशा व्यक्तींच्या घरांमध्ये सामान्यतः उच्च दर्जाची सुरक्षा असते. या घटनेमुळे सामान्य नागरिकांमध्येही असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

थेट बेडरूममध्ये घुसलेल्या दरोडेखोरांनी वीरेंद्र यांच्या तोंडावर हात ठेवून त्यांना जागे केले. "सोने कुठे आहे?" अशी विचारणा करत त्यांनी धमकी दिली.

दरोडेखोरांच्या हातात हातोडी आणि हक्सा ब्लेडसारखे धारदार शस्त्र होते, ज्यामुळे वीरेंद्र यांनी जीव वाचवण्यासाठी कपाटाची चावी त्यांना दिली. दरोडेखोरांनी कपाटातून ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख रुपये रोख रक्कम लुटली आणि काही मिनिटांतच पळ काढला. या दरोड्यामुळे वानवडी परिसरात खळबळ उडाली आहे.



वानवडी हा पुण्यातील अतिशय महत्त्वाचा आणि सुरक्षित समजला जाणारा परिसर आहे. येथे अनेक पोलीस आणि लष्करी अधिकारी तसेच निवृत्त अधिकाऱ्यांचे बंगले आणि वसाहती आहेत. मुख्य रस्त्यावर असलेल्या कौशल्या बंगल्यात हा प्रकार घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आश्चर्य आणि भीती पसरली आहे. इतक्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या परिसरात जर निवृत्त विंग कमांडरच्या घरावर » पान ७ वर

# तळजाई टेकडीवर गावगुंडांचा हैदोस

## पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या तरुणांवर हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या तरुण-तरुणींवर गावगुंडांनी हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यातील तळजाई टेकडीवर काही तरुण-तरुणी पोलीस भरतीचा सराव करीत होते. यादरम्यान काही गावगुंडांनी त्यांना शिवीगाळ करीत हल्ला केल्याचे सांगितले जात आहे. या घटनेचे काही व्हिडिओही समोर आले आहे.

पुण्यातील तळजाई टेकडीवर पोलीस भरतीचा मैदानी सराव केला जात होता. परंतु आज सकाळी सराव करत असताना दहा ते बारा गावगुंड तिथे पोहोचले. त्यांनी मुलींकडे पाहून अश्लील कमेंट केल्या. त्यांना शिवीगाळही करण्यात आली. त्यानंतर काही मुलांना मारहाण करत तुमची लायकी नाही पोलीस होण्याची असं म्हणत मारहाण करण्यात आली. त्यानंतर दोघांमध्ये हातापायी झाल्याचे सांगितले जात आहे.



> या प्रकरणामध्ये एका पोलीस अधिकाऱ्याला देखील मुकामार झाला आहे, पुण्यातील तळजाई सारख्या परिसरात घडलेला हा प्रकार फार गंभीर आहे. महात्मा फुले, शाहू, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये सावित्रीबाईंच्या लेकी सुरक्षित नाही हेच खरे. कित्येक प्रकार असे महाराष्ट्रमध्ये घडत आहेत, म्हणून तळजाई युवा फाउंडेशनच्या माध्यमातून अशा मुलांना व मुलींना सुरक्षा देण्याकरता तळजाई युवा फाउंडेशन पुढे येत आहे. पुणे फिटनेस क्लब च्या कोच ला व ट्रेनिंगच्या मुला मुलींना असुरक्षितीता भासू नये म्हणून तळजाई फाउंडेशन त्यांच्या सुरक्षितेसाठी सतत कार्यरत आहे."
>
> — **निलेश खंडाळे,** तळजाई युवा फौउंडेशन , संस्थापक अध्यक्ष

मागील काही दिवसांपासून ही मुलं पोलीस भरतीचा मैदानी सराव करणाऱ्या मुलींचा पाठलाग करीत होते. या मुलींकडे पाहून अश्लील कमेंट करीत होते. आज सकाळी या गावगुंडांनी मुलांना मारहाण केली. तर मुलींना शिवीगाळ करण्यात आली. यानंतर येथील मुला-मुलींनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांकडे तक्रार देण्यासाठी पोलीस भरतीचे शिक्षक व मुले- मुली सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले.

# सज्ञान म्हणून खटला चालविण्याचा अर्ज फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर हादरवून टाकणाऱ्या पोर्शे अपघात प्रकरणात आज बाल न्याय मंडळाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. पोलीस विभागाने आरोपी अल्पवयीन असूनही त्याच्यावर सज्ञान म्हणून खटला चालवावा, अशी मागणी केली होती. मात्र न्याय मंडळाने हा अर्ज फेटाळून लावला आहे. यानंतर आता या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे.

१९ मे २०२४ रोजी पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरात पोर्शे कार भरधाव वेगाने चालवली. यामुळे दुचाकीवरून जाणाऱ्या दोन तरुण अभियंत्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. अपघातात वापरलेली पोर्शे कार सधन कुटुंबातील १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने चालवली होती.

तो अपघातावेळी मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला होता. पुणे पोलिसांनी बाल न्याय मंडळात अर्ज सादर करत म्हटलं होतं की, "हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून आरोपीने सज्ञानासारखं वर्तन केलं आहे. त्यामुळे त्याच्यावर भारतीय दंड संहितेनुसार प्रौढ गुन्हेगार म्हणून खटला चालवावा. न्याय मंडळाने आज आपल्या निर्णयात पोलिसांचा अर्ज फेटाळला. त्यांनी स्पष्ट केलं की, "आरोपीचा वय १८ वर्षांखाली असल्याने, त्याच्यावर 'जुवेनाइल जस्टिस ॲक्ट २०१५' अंतर्गतच खटला चालवण्यात येईल.

# मुलांच्या यशाला 'मातृत्त्वाची किनार'...!

## दोन मुलांच्या बरोबरच आई झाली 'बीए' उत्तीर्ण

**जिद्द**

**वयाच्या पस्तिशीनंतर एके दिवशी त्यांनी स्वतःशीच ठरवलं "दहावीची परीक्षा द्यायचीच." त्यांनी कर्नाटकातून शाळा सोडल्याचा दाखला आणला, मराठी भाषेचा सराव केला आणि प्रयत्नपूर्वक दहावीची परीक्षा दिली. मराठीसारखा नवीन विषय असूनही त्यांनी ४३ टक्के गुण मिळवत दहावी उत्तीर्ण होण्याचं धाडस दाखवलं.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिकण्याचं वय नसतं, फक्त इच्छाशक्ती लागते," हे प्रत्यक्षात सिद्ध केलं आहे पुण्यात राहणाऱ्या शकुंतला अशोक घोरपडे यांनी. त्यांच्या शिक्षणाचा प्रवास थक्क करणारा आहे. विशेष म्हणजे, आपल्या मुलगा व मुलीसोबत त्यांनीही याचवर्षी बी.ए.ची पदवी मिळवत शिक्षणाची अपूर्ण राहिलेली स्वप्न पूर्ण केली.

शकुंतला घोरपडे यांचा जन्म कर्नाटक राज्यातील एका गावात झाला. कुटुंबातील परंपरेनुसार त्यांचं लग्न लहान वयातच झालं आणि १९९१ साली त्या पुण्यात आल्या. त्यावेळी त्यांचं शिक्षण केवळ सातवीपर्यंतच झालं होतं आणि तेही कन्नड माध्यमातून. पुढील आयुष्य कुटुंब, संसार आणि मुलांच्या संगोपनात गेलं. १९९४ मध्ये मुलीचा आणि त्यानंतर मुलाचा जन्म झाला.



घराची जबाबदारी पार पाडताना शिक्षणाचं स्वप्न मात्र मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात कायम होतं.

वयाच्या पस्तिशीनंतर एके दिवशी त्यांनी स्वतःशीच ठरवलं "दहावीची परीक्षा द्यायचीच." त्यांनी कर्नाटकातून शाळा सोडल्याचा दाखला आणला, मराठी भाषेचा सराव केला आणि प्रयत्नपूर्वक दहावीची परीक्षा दिली. मराठीसारखा नवीन विषय असूनही त्यांनी ४३ टक्के गुण मिळवत दहावी उत्तीर्ण होण्याचं धाडस दाखवलं.

> शिक्षणाने आयुष्यातील अंधकार दूर होत असतो; याची जाणीव असल्यानेच लग्न झाल्यानंतरही शिक्षण सुरु करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मी घेतला. माझ्या या निर्णयाला कुटुंबाकडूनही अपेक्षित साथ मिळाली; त्यामुळेच मला यशाचे हे शिखर गाठता आले. माझ्या मुलांनीही यापुढे उच्च शिक्षण घ्यावे असा माझा आग्रह असून माझे हे ध्येय निश्चितच पूर्ण होइल यामध्ये शंका नाही."
>
> — **शकुंतला घोरपडे,** एक ध्येयवेडी माता

दहावीचा टप्पा पार केल्यानंतर आत्मविश्वास वाढला आणि त्यानंतर त्यांनी बारावीची परीक्षा दिली. यातही त्यांनी यश मिळवलं. विशेष म्हणजे, त्याच काळात त्यांचा मुलगा आणि मुलगीही बी.ए.चे शिक्षण घेत होते. यामुळे शकुंतलाताईंनाही वाटलं – "आपल्याही हातून हे शक्य आहे."

शकुंतला घोरपडे यांनी मेहनतीच्या जोरावर यावर्षी बी.ए. » पान ७ वर

#रा

# आंदोलन गाववाल्यांच्या हितासाठी...!



**पुणे** समाविष्ट गावातील नागरिकांच्या मिळकतकरावर २% सावकारी व्याज दंड लावून महायुती सरकार व पुणे महानगरपालिका प्रशासन नागरिकांची लूट करत आहे.या लुटीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात "गाजर व रताळी आंदोलन" करण्यात आले.

## राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे गाजर व रताळी आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मांजरी बु. सह पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांना पुणे महानगरपालिकेने सातत्याने विकासा पासून वंचित ठेवले आहे. येथील मिळकत धारकांना ४०% मिळकत कर सवलतीचे व विकासाचे गाजर दाखवून, प्रत्यक्षात मात्र करावर २% सावकारी व्याज दंड लावून महायुती सरकार व पुणे महानगरपालिका प्रशासन नागरिकांची लूट करत आहे.

या लुटीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात "गाजर व रताळी आंदोलन" करण्यात आले. या आंदोलनात पुणे मनपा प्रशासन व महायुती सरकार यांचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी महायुती सरकार व पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या निषेधच्या घोषणांनी संपूर्ण महानगरपालिका परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनास प्रशांत जगताप, रवींद्र माळवदकर, उदय महाले, आशाताई साने, गजेंद्र मोरे, किशोर कांबळे, वैशाली थोपटे, दिलशाद अत्तार, पूजा काटकर, रमिझ सैय्यद, असिफ शेख, गणेश नलावडे उपस्थित होते.



## 'एफपीसी' यशस्वी होण्यासाठी प्रयत्न आवश्यक

**पुणे :** कृषी क्षेत्रातील शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) यशस्वी होण्यासाठी पुरवठासाखळी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांकडून उत्पादित होणारी कृषी उत्पादने वेळेवर, दर्जेदार व कमी खर्चात ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एफपीसीमध्ये योग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश आवश्यक आहे. या ऑनलाइन प्रशिक्षणाचा उद्देश एफपीसी सदस्यांना पुरवठा साखळीची मूलतत्त्वे, खरेदी, साठवण आणि वितरण प्रक्रियेचे नियोजन, नोंद व्यवस्थापन व डिजिटल साधनांचा प्रभावी वापर याबाबत सखोल मार्गदर्शन देणे हा आहे. प्रशिक्षणाद्वारे एफपीसी अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि बाजाराशी सुसंगत कशी बनू शकते यावर भर दिला जाईल. तसेच बाजार संलग्नतेसाठी कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली जाईल. हे प्रशिक्षण एफपीसी सदस्य, व्यवस्थापक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित स्वयंसेवी संस्थांसाठी उपयुक्त असून कृषी मूल्यसाखळीतील प्रत्येक टप्प्यावर निर्णयक्षमता वाढवण्यास मदत करेल.



## मार्गदर्शन कार्यशाळा २१ जुलै रोजी

**पुणे :** शेतजमिनीमध्ये रासायनिक खतांचा वापर मर्यादित करून सेंद्रिय खतांचा वापर वाढविल्यास जमिनीची उत्पादनक्षमता वाढते, मातीच्या कणांची रचना दाणेदार होते, जमिनीची जलधारणशक्ती वाढते, निचरा चांगला होतो व हवा खेळती राहते. तसेच रासायनिक खतांमुळे होणाऱ्या दुष्परिणामावर मात करता येते. रासायनिक खतांच्या किमती वाढल्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे. म्हणून सेंद्रिय खते तयार करण्यास शिकवणारी व त्याचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करणारी ऑनलाइन कार्यशाळा २१ जुलैला होणार आहे. यात नैसर्गिक शेतीमधील निविष्ठा, गोआधारित निविष्ठा, नैसर्गिक खत व्यवस्थापन, वनस्पतीपासून तयार करण्यात येणारी जैविक कीटकनाशके तयार करण्याची पद्धत, घरगुती बुरशीनाशके, चंद्र व सूर्याच्या कलेनुसार घेतले जाणारे सेंद्रिय उत्पादन व फवारण्यांचे नियोजन, बायोडायनामिक शेती पद्धती, सेंद्रिय शेतीमधील कीड नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या सापळ्यांचा अभ्यास, परमा कल्चर शेती तंत्रज्ञान आदींबाबत मार्गदर्शन होईल.



## प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशन तर्फे 'बरखा रंग' मैफल

**पुणे :** प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशनतर्फे वर्षा ऋतुनिमित्त रविवार, दि. २० जुलै रोजी गायन-वादनाच्या 'बरखा रंग' या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे.

'बरखा रंग' मैफल सायंकाळी ५ वाजता टिळक रोडवरील न्यू इंग्लिश स्कूलच्या आवारात असलेल्या गणेश हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. या मैफलीत सुप्रसिद्ध गायक पंडित प्रवीण गावकर (गोवा), विदुषी सानिया पाटणकर (पुणे) यांचे गायन होणार असून पंडित मुकुंदराज देव (ठाणे) यांचे एकल तबला वादन होणार आहे. मालू गावकर, देवेंद्र देशपांडे (संवादिनी), प्रशांत पांडव (तबला), वासिम खान (सारंगी) साथसंगत करणार आहेत. शोभा कुलकर्णी यांचे निवेदन असणार आहे. प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या मातोश्री पुरस्काराने शिल्पा जोशी यांचा गौरव केला जाणार आहे. नितीन महाबळेश्वरकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## सामाजिक संस्थासाठी मोफत प्रशिक्षण प्रकल्प

**पुणे :** सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांना अधिक सक्षम, शाश्वत आणि परिणामकारक बनवण्यासाठी विवेक स्पार्क फाउंडेशन आणि विवेक व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'संस्था सक्षमीकरण' कार्यक्रमांतर्गत 'एस-इक्वल' हा प्रशिक्षण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पास ऑलस्टेट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे सहकार्य लाभले आहे. पुणे शहर आणि परिसरातील नोंदणीकृत संस्थांनी या महत्त्वपूर्ण प्रकल्पात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. सुमारे एक वर्ष कालावधी असलेल्या या प्रशिक्षण प्रकल्पामध्ये संस्थेचे संचालक, कर्मचारी, स्वयंसेवक अशा सर्व स्तरांतील सदस्यांना सहभागी होता येणार आहे. हे प्रशिक्षण विनामूल्य असणार आहे.

काही संस्थांकडे सीएसआर नोंदणी, दर्पण पोर्टलवरील नोंदणी किंवा इतर आवश्यक कागदपत्रांची कमतरता असल्यामुळे कंपन्यांकडून निधी मिळवणे आणि निधी संकलन करणे यात अडथळे येतात. हे वास्तव लक्षात घेऊन 'एस-इक्वल' प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे.

# 'पीएमपी'ला महिलांचा 'हातभार'...!

## प्रवाशांच्या लिंगनिहाय नोंदवहीत 'गणती': पाच लाख महिलांचा प्रवास

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महिलांनी सर्वच आघाड्यांवर उत्तुंग झेप घेतली आहे; विशेष म्हणजे जगातील अन्य देशातील महिलांच्यापेक्षाही भारतातील महिलांची कामगिरी निश्चितच वाखाणण्याजोगीच आहे. त्यामुळेच भारतीय महिलांच्या कतृत्त्वाचा झेंडा अटकेपार रोवला गेला आहे; ही बाब सर्वच भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच समाधानाचीच आहे. आता याच महिलांनी प्रवासातही आपल्या कतृत्त्वाचा एक आगळावेगळा ठसा उमटविला आहे; दुचाकी आणि कारने प्रवास करणारी हीच महिला सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या कारभारालाही चांगलाच हातभार लावत आहेत. गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत तब्बल पाच लाखाहून अधिक महिलांनी 'पीएमपी' च्या बसने प्रवास केला आहे.



> महिला प्रवाशांची ही वाढती आकडेवारी निशितच समाधानकारक अशीच आहे. त्यामुळेच महिलांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी त्यांना बसमधील संपूर्ण एक रांग राखीव ठेवण्यात आली आहे; त्याशिवाय महिला वाहकांची संख्याही वाढविण्यात येत आहे; आगामी काळात आणखी काही मार्गावर महिलांसाठी खास बससेवा सुरु करण्याचा प्रशासनाचा विचार आहे.
> **-दीपा मुधोळ मुंडे,** अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका, पीएमपीएमल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील लाखो नागरिकांचे दैनंदिन वाहतुकीचे मुख्य साधन असलेल्या पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बस सेवेमध्ये आता प्रवाशांचे लिंगनिहाय वर्गीकरण सुरू करण्यात आले आहे. पुरुष, महिला आणि लहान मुलांचे प्रमाण स्पष्ट होण्यासाठी पीएमपीने तिकीट यंत्रणेमध्ये महत्त्वाचा बदल केला असून, एप्रिल २०२५ पासून सर्व तिकिटांवर प्रवाशांचे लिंग नोंदवले जात आहे.

सध्या पीएमपीच्या अंदाजे १,६५० ते १,७०० बस शहर व उपनगरातील ३८१ मार्गांवर धावत आहेत. या बसमधून दररोज सुमारे १० ते ११ लाख प्रवासी प्रवास करतात. यापैकी सरासरी ५.५ ते ६ लाख प्रवासी पुरुष असून, ४.५ ते ५ लाख महिला प्रवासी असतात, अशी प्राथमिक नोंद झाली आहे. उर्वरित प्रवासी हे लहान मुले किंवा इतर प्रवर्गातील आहेत.

पूर्वी फक्त तिकीटाच्या माध्यमातून प्रवासाची रक्कम व प्रवास मार्गाची माहिती मिळत होती. मात्र, आता प्रवाशांचे लिंगदेखील नोंदवल्यामुळे अधिक अचूक आणि उपयुक्त माहिती पीएमपीकडे उपलब्ध होत आहे. ही माहिती प्रशासनाच्या विविध योजना आणि निर्णय प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणार आहे.

पीएमपीने २०१०-११ च्या सुमारास इलेक्ट्रॉनिक तिकीट यंत्रणा (ई-तिकीट मशीन) सुरू केली होती. यामुळे बसमधील तिकिटांची विक्री, उत्पन्न आणि प्रवास मार्गाची नोंद अधिक सुटसुटीत झाली. त्यानंतर ऑक्टोबर २०२३ पासून प्रवाशांसाठी क्यूआर कोडद्वारे फोन-पे, गुगल-पे यांसारख्या ॲप्समधून तिकीट खरेदी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे रोख रकमेचा ताण कमी झाला आणि वाहक-प्रवासी यांच्यातील व्यवहार अधिक पारदर्शक झाले.

पण याशिवाय प्रवाशांची लिंगनिहाय माहिती उपलब्ध नसल्याने महिलांसाठी योजना आखताना किंवा विशेष बस सेवा सुरू करताना पीएमपीसमोर अडचणी निर्माण होत होत्या. त्या पार्श्वभूमीवर पीएमपीच्या अध्यक्षा दीपा मुधोळ-मुंडे यांनी एप्रिल २०२५ पासून लिंग नोंदी सक्तीच्या करण्याचे निर्देश दिले.

मागील तीन महिन्यांत मिळालेल्या माहितीच्या आधारे बसमध्ये प्रवास करणाऱ्यांमध्ये सरासरी ५५ ते ५८ टक्के पुरुष आणि ४२ ते ४५ टक्के महिला असल्याचे निष्पन्न झाले आहे. एप्रिल महिन्यातील तपशील पाहता पावणेदोन लाख पुरुष तर सुमारे दीड लाख महिला प्रवास करताना नोंदवण्यात आल्या आहेत. तसेच, इतर प्रवाशांची संख्या २२ हजारांहून अधिक होती.

### यामुळे पीएमपीला काय लाभ होणार?

- दैनंदिन पुरुष व महिला प्रवाशांचे अचूक प्रमाण कळणार
- प्रवाशांच्या संख्येनुसार बस नियोजन सुलभ होणार
- महिला आणि लहान मुलांसाठी स्वतंत्र योजना आखता येणार
- महिला प्रवाशांसाठी विशेष बससेवा राबवण्यास मदत
- या नव्या उपक्रमामुळे पीएमपीच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेतील अचूकता वाढणार
- महिला केंद्रित योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

# पुण्यातील ९० पैकी ४० पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील सार्वजनिक बांधकामांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुणे महापालिकेने हद्दीतील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सुरुवात केली होती. याअंतर्गत ९० बांधकामांपैकी ४० पुलांचे ऑडिट पूर्ण करण्यात आले असून, त्यापैकी ३८ पुलांची दुरुस्ती आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. सद्यस्थितीत या दुरुस्तीपैकी ७० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती अधिकृत अहवालात देण्यात आली आहे.

कुंडमळा (ता. मावळ) येथे पुल कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्ह्यातील सर्व पूल, साकव, उड्डाण पूल आणि जाहिरात फलकांची तातडीने तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने सादर केलेला अहवाल नुकताच जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला आहे.

महापालिका हद्दीतील पूल, उड्डाण पूल, पादचारी पूल, भुयारी मार्ग व कॉजवे अशी एकूण ९० बांधकामे असून त्यापैकी २५ वर्षांपेक्षा जुने ३८ पूल अत्यंत महत्त्वाचे मानून त्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यात काही पुलांमध्ये क्षोभजन्य स्थिती आढळून आली असून तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

### महत्त्वाच्या बाबी...

- महापालिकेच्या क्षेत्रातील ९० पैकी ४० बांधकामांचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण
- ३८ पूल दुरुस्तीयोग्य; आतापर्यंत ७० टक्के काम पूर्ण
- साधू वासवानी रेल्वे उड्डाण पूल आणि वृद्धेश्वर येथील कॉजवे धोकादायक असल्यामुळे याआधीच पाडण्यात आले
- ११ पूल प्राधान्यक्रमात; प्रकल्प विभागाकडून कामे सुरू
- उर्वरित पुलांचे ऑडिट करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू
- यासाठी अंदाजपत्रकात १० कोटी रुपयांची तरतूद

### अधिकृत फलकांचेही स्ट्रक्चरल ऑडिट

याशिवाय शहरातील अधिकृत परवानाधारक २,६४० जाहिरात फलकांचेही स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, हे फलक सुरक्षित अवस्थेत असल्याचे निष्पन्न झाले आहे.या संपूर्ण प्रक्रियेमुळे पुणे शहरातील सार्वजनिक बांधकामांच्या सुरक्षेबाबत अधिक सजगता निर्माण झाली असून, भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महापालिका स्तरावर पावले उचलण्यात येत आहेत.

# 'आनंदयात्री'तून पुणेकर रसिक 'पुलकित'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'तुझे आहे तुजपाशी' नाटकातील प्रवेश, 'ती फुलराणी'तील स्वगत, 'अंतू बरवा' या व्यक्तिरेखेसह विविध किश्श्यांनी पुणेकर रसिकांची सायंकाळी 'पुलकित' झाली.

निमित्त होते पूना गेस्ट हाऊस स्नेह मंच आयोजित 'आनंदयात्री' या विशेष कार्यक्रमाचे! महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेल्या पु. ल. देशपाडे अर्थात पुलंच्या विपुल साहित्यातील उत्कंठावर्धक किस्से आणि पैलू उलगडून दाखविणाऱ्या कार्यक्रमास रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. कलाकारांनी आत्मियतेने केलेले सादरीकरण आणि त्यास रसिकांनी भरभरून दिलेली दाद यातून कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

'स्वरयोग' निर्मित कार्यक्रमाची संकल्पना प्रदीप देसाई यांची होती तर निर्मिती सहाय्य सुबोध चितळे यांचे होते. देसाई यांनी पुलंविषयीच्या अनेक आठवणी आणि किस्से सांगत कार्यक्रमातील रंगत वाढविली. पुलंचे रंगमंचावर झालेले आगमन, आकाशवाणी, दूरदर्शनमध्ये केलेली नोकरी, व्यक्ती म्हणून, संगीतकार म्हणून अनुभवलेले पुलं असे अनेक किस्से त्यांनी सांगितले.

प्रसिद्ध एकपात्री कलाकार सुबोध चितळे, केतकी पांडे, नाट्यकर्मी राजीव कुलकर्णी, मंजुषा जोशी या कलाकारांनी सुरुवातीस 'तुझे आहे तुजपाशी' नाटकातील प्रवेश सादर केला.




**पुणे** 'तुझे आहे तुजपाशी' नाटकातील प्रवेश, 'ती फुलराणी'तील स्वगत, 'अंतू बरवा' या व्यक्तिरेखेसह विविध किश्श्यांनी पुणेकर रसिकांची सायंकाळी 'पुलकित' झाली. निमित्त होते पूना गेस्ट हाऊस स्नेह मंच आयोजित 'आनंदयात्री' या विशेष कार्यक्रमाचे!

# मास्टर कृष्णराव यांना सांगीतिक कलांगणची मानवंदना !!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संगीत कलानिधी मास्टर कृष्णराव म्हणजे संगीत क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व. मास्टर कृष्णराव यांनी संगीतबद्ध केलेली वेगवेगळ्या धाटणीची गीते सादर करून त्यांना गुरुपौर्णिमेच्यानिमित्ताने आदरांजली वाहण्यात आली. ७ वर्षापासून ते २५ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी गायन, वादन, निवेदनाची बाजू सांभाळत कल्पकता आणि कलात्मकतेची चुणूक दर्शविली.

कलांगण, मुंबई संस्थेच्या संस्थापिका वर्षा भावे यांच्या संकल्पनेतून आणि दिग्दर्शनातून या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शास्त्रीय संगीत, भारूड, गवळण, अभंग, भक्तिगीते, नाट्यगीतांसह चित्रपटगीते अशा विविध गीत प्रकारांना मास्टर कृष्णराव यांनी दिलेल्या चाली आजही स्मरणात राहणाऱ्या आहेत. गुरुपौर्णिमेच्यानिमित्ताने गुरूंना वंदन करण्याच्या उद्देशाने मास्टर कृष्णराव यांच्या गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. 'बात कान सुनिये जी', 'किस्न्याची माया लय भारी', 'असा नेसून शालू हिरवा', 'क्षण आला सौख्याचा', 'काका अप्पा शूर शिपाई' यासारखी वैविध्यपूर्ण धाटणीची गीते विद्यार्थ्यांनी सादर केली. 'लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' या अजरामर गीताने झालेली सांगता हा क्षण कार्यक्रमाचा कळसाध्याय ठरला. श्रीरंग जोशी, सानिका फडके, जुई देशपांडे, विभा हरिश्चंद्रकर, तनय नाझिरकर, भार्गव वैद्य, इवा जोशी यांनी गीते सादर केली. अन्वी पाटणकर (संवादिनी), सिद्धी देशपांडे, इरा परांजपे (व्हायोलिन), ऋषभ गोडबोले (की-बोर्ड), अभय ओक (बासरी), आदित्य केळकर, वेदांग जोशी (तबला), मानस कांबळे (तालवाद्य) यांनी समर्पक साथसंगत केली.

> लहान वयापासूनच मुलांना संगीत, वाद्य याची गोडी लागावी यासाठी कलांगण संस्था काम करीत असल्याचे संस्थेच्या संचालिका वर्षा भावे यांनी रसिकांशी संवाद साधताना सांगितले. मास्टर कृष्णराव यांनी आपल्या संगीत कारकिर्दीची सुरुवात केलेल्या पुण्यात पहिल्यांदाच कार्यक्रमाचे सादरीकरण करता आले, याचे समाधान असल्याचेही त्या म्हणाल्या.
> **-वर्षा भावे,** संस्थापिका, कलांगण, मुंबई



## ‘नक्षी स्वर लयीची...’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे :** ज्येष्ठ सतारवादक, लेखिका, कवयित्री, गुरु विदुषी जया जोग येत्या २० जुलै रोजी अमृत-महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असून या निमित्ताने त्यांच्या संगीतयात्रेचा गौरव करण्याच्या उद्देशाने त्यांच्या शिष्यांनी येत्या रविवार दि. २० जुलै रोजी ‘नक्षी स्वर लयीची...’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. नवी पेठ येथील एस एम जोशी सभागृह या ठिकाणी सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या वेळेत सदर कार्यक्रम संपन्न होणार असून त्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर विनामूल्य प्रवेश देण्यात येईल. कार्यक्रमादरम्यान काही जागा या निमंत्रितांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

यावेळी सुप्रसिद्ध बासरीवादक गुरु पं. केशव गिंडे यांच्या हस्ते विदुषी जया जोग यांचा सत्कार करण्यात येईल. तर प्रसिद्ध व्हायोलिन वादक, रचनाकार असलेल्या डॉ. नीलिमा राडकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. यानंतर जया जोग यांच्या शिष्यांचे समूह सतारवादन संपन्न होईल. यावेळी प्रज्ञा मेने, मानसी दांडेकर, स्वाती घैसास, सुचेता गोसावी, बीमा लिमकर, रिशान कुळकर्णी हे शिष्य जयाताई यांच्या स्वतंत्र रचनांचे सादरीकरण उपस्थितांसमोर करतील.

यानंतर प्रज्ञा मेने आणि दीपा कुडतरकर यांचे सतार- व्हायोलिन सहवादन रंगेल. सर्व कार्यक्रमांना भावना टिकले व अभिजित बारटक्के हे तबलासाथ करतील. कार्यक्रमाचा समारोप विदुषी जया जोग यांच्या एकल सतारवादनाने होईल. रंजना काळे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतील.



## मिरवणुकीसाठी वेळ वाढवून देण्याची मागणी

**पुणे :** क्रांतिवीर सेना तळजाई युवा फाउंडेशन वतीने डॉ. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नियोजित कार्यक्रम मिरवणूक काढणारे सामाजिक संघटना सामाजिक कार्यकर्ते तसेच मातंग समाजातील व्यक्ती समूहाला प्रासंगिक परवानगी तसेच साऊंड सिस्टम करिता निर्धारित वेळेपेक्षा जादाची परवानगी मिळण्या बाबत निवेदन देण्यात आले उपस्थित क्रांतिवीर सेना अध्यक्ष मनोज क्षिरसागर तळजाई फाउंडेशन चे निलेश खंडाळे, उध्दव कांबळे, सविता खवळे, दिनेश वाघमारे. अशितोष कसबे, अमन मोरे, तेजस साबळे, सुमित शेलार, गणेश आवळे, सुनिल कांबळे, सागर खंडागळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## उरूळी देवाची–फुरसुंगीच्या हस्तांतरण प्रक्रियेस गती

**पुणे :** पुणे महापालिकेपासून वेगळ्या करण्यात आलेल्या उरूळी देवाची आणि फुरसुंगी या गावांसह नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदेच्या हस्तांतरण प्रक्रियेला आता गती मिळू लागली आहे. महापालिकेच्या मालकीतील बहुतांश मालमत्ता नव्या नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आल्या असून, प्रत्यक्ष सेवा व्यवस्था सुरू होईपर्यंत महापालिकेकडूनच पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत सुविधा दिल्या जात आहेत.

२०१७ मध्ये ही गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली होती. मात्र, ११ सप्टेंबर २०२४ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार त्यांना पुन्हा स्वतंत्र नगरपरिषद म्हणून मान्यता देण्यात आली. नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदेपुढे अद्याप प्रशासकीय यंत्रणा आणि मनुष्यबळाची कमतरता असल्याने, राज्य शासनाने २३ सप्टेंबर २०२४ रोजी महापालिकेला या गावांचे दैनंदिन कामकाज पाहण्याची जबाबदारी दिली.

अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच हस्तांतरण प्रक्रियेवर आढावा बैठक पार पडली. त्यांनी सांगितले की, "गावातील जलप्रदाय योजना पूर्वीपासून महाराष्ट्र जलप्राधिकरणामार्फत चालवली जात होती. आता नगरपरिषदेच्या कार्यान्वयनाखाली ही कामे येणार आहेत. परंतु पर्यायी व्यवस्था उभी राहेपर्यंत महापालिकाच देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी पार पाडणार आहे.

# पुण्यात रेल्वेस्थानकावर ‘ब्लॅक बॉक्स’

## वाहतूकीच्या संदर्भातील रेकॉर्डिंग होणार : नवीन ‘व्हीएचएफ’ यंत्रणा कार्यान्वित करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे स्थानकासह विभागात आता विमानातील ‘ब्लॅक बॉक्स’सारखी कम्युनिकेशन प्रणाली बसविण्यात येणार आहे. पुणे रेल्वे स्थानक, यार्ड, नियंत्रण कक्ष, क्रॉसिंग या सारख्या महत्त्वाच्या व संवेदनशील ठिकाणी स्थानक व्यवस्थापक अथवा मुख्य यार्ड व्यवस्थापक यांचे रेल्वे वाहतूक संदर्भात होणाऱ्या संवादाचे रेकॉर्डिंग होणार आहे. यासाठी रेल्वे प्रशासन स्थानकावर ‘नवीन व्हीएचएफ’ (अतिशय उच्च वारंवारतेवर चालणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी) यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे.

यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांचा एकमेकांसोबत होणारा संवाद हा जलद व स्पष्ट ऐकू येईल. शिवाय या संवादाचे रेकॉर्डिंगदेखील होणार आहे. एखादा अपघात अथवा घटना घडल्यास त्या आधारे तपास करणे सोपे होणार आहे. यासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

पुणे रेल्वे विभागाने रेल्वे वाहतूक संदर्भात महत्त्वाच्या ठरणाऱ्या या नवीन ‘व्हीएचएफ’ प्रणाली बाबतचा



प्रस्ताव रेल्वे बोर्डाला पाठवला होता. त्याला रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली असून, लवकरच पुणे स्थानकावर व विभागातील अन्य स्थानकावर ही यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

स्थानक व्यवस्थापकाच्या जवळ असलेल्या ‘वॉकी टॉकी’ सेट देखील अद्ययावत केले जाणार आहे. ‘व्हीएचएफ’ प्रणाली ही ३० ते ३०० मेगाहर्ट्झ (प्रति सेकंद निर्माण होणारी कंपने) त्यामुळे संवाद अधिक जलद व सुस्पष्ट होण्यास मदत मिळणार आहे. हे रेकॉर्डिंग सामान्यपणे तीन महिन्यांपर्यंत जतन केले जाणार आहे.

### आपत्कालीन परिस्थितीत फायदेशीर

- रेल्वे अपघात, डबे घसरणे अशा आपत्कालीन परिस्थितीत संवाद साधणे सोपे होईल.
- रेल्वेचा अपघात झाल्यास त्याचा तपास करण्यासाठी रेकॉर्डिंग तपासणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.
- यातून कोणत्या कारणामुळे अपघात झाला, चूक कोणाची याची अचूक माहिती मिळण्यास मदत
- हे कसे काम करेल
- ही यंत्रणा रेडिओ फ्रिक्वेन्सीवर आधारित वायरलेस संवाद प्रणाली
- रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये यांच्यात त्वरित, स्पष्ट आणि सुरक्षित संपर्क साधण्यासाठी वापरली जाते.
- कर्मचाऱ्याकडे व्हीएचएफ रेडिओ सेट उपलब्ध असणार
- फ्रिक्वेन्सीवर आधारित संवाद
- यापूर्वी कधी रेकॉर्डिंग झालेले नाही पण आता रेकॉर्डिंग होणार
- रेडिओची रेंज सरासरी ५ ते १५ किलोमीटर.
- स्थानकाजवळ रेल्वे येताच संवादाचे रेकॉर्डिंग होणार.
- मिळणारे फायदे
- वादळ, पाऊस, अडथळ्यांमध्ये आवाज ऐकू येतो
- त्वरित संवाद
- स्पष्ट आवाज
- कमी वेळेत संपर्क

# पालिकेच्या कारभारावर नवी ‘मोहोर’...!

## ‘डिजिटल’ द्वारे यंत्रणा अपडेट : सर्व विभागांमध्ये ‘ई-ऑफिस’ सक्तीचे

सरकारी काम अन सहा महिने थांब ही पूर्वजांपासून सुरु असलेली म्हण महापालिकेच्या कारभाराच्या संदर्भात तंतोतंत लागू पडत आहे; त्याचा जबरदस्त फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे एका टेबलावर दिलेल्या फाईलवर ‘वजन’ ठेवल्याशिवाय ती पुढे हालतच नाही, असा महापालिकेच्या कारभाराचा इतिहास आहे. त्याशिवाय ही फाईल कोणत्या टेबलावर आहे; याची माहितीच नागरिकांना मिळत नाही. त्यातूनच त्यांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे; विशेष म्हणजे सध्याच्या ‘प्रशासकराज’ मध्ये या बाबी वारंवार घडत आहे. मात्र; आता महापालिकेचा संपूर्ण कारभारच ‘डिजिटल’ होणार आहे. त्यामुळे संबधित अधिकारी त्यासाठी बांधील राहणार आहेत.



> “नवीन फाईल्स आता थेट ‘ई-ऑफिस’मध्ये तयार होत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निर्णय घेणे, प्रकरणांचा निपटारा करणे ही सर्व कामे याच प्रणालीद्वारे केली जात आहेत. युनिक क्रमांकाशिवाय कोणतीही फाईल स्वीकारली जाणार नाही.”
> 
> — पृथ्वीराज बी. पी.
> अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र आणि राज्य शासनानंतर आता पुणे महानगरपालिकेनेही आपल्या दैनंदिन कामकाजात ‘ई-ऑफिस’ प्रणालीचा पूर्ण वापर सुरू केला आहे. यापूर्वी काही मोजक्या विभागांपुरती मर्यादित असलेली ही प्रणाली आता



महापालिकेच्या सर्वच विभागांमध्ये सक्तीने राबवण्यात येत आहे. यामुळे महापालिकेचा कारभार पेपरलेस आणि अधिक गतिमान होणार आहे.

महानगरपालिकेत दररोज मोठ्या प्रमाणावर विकासकामांचे प्रस्ताव, अहवाल, विविध विभागीय नोंदी यांची देवाण-घेवाण होते. यामध्ये वेळकाढूपणा, फाईल हरवणे, कागदपत्र गहाळ होणे, कामकाजात विलंब अशा अनेक समस्या वारंवार उद्भवत होत्या. मात्र, ‘ई-ऑफिस’ प्रणालीमुळे आता या सर्व त्रुटींवर नियंत्रण येणार आहे.

‘ई-ऑफिस’ प्रणालीद्वारे प्रत्येक प्रस्तावाची डिजिटल नोंद होणार असून, त्याला युनिक क्रमांक दिला जाईल. कोणती फाईल कोणाकडे प्रलंबित आहे, ती कधी पासून आहे, निर्णयासाठी किती वेळ लागतो आहे याचा तपशील यामुळे अगदी अचूकपणे समजणार आहे. त्यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांना कामात उशीर करता येणार नाही, तसेच उत्तरदायित्व निश्चित होणार आहे.

या प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेच्या आयटी विभागामार्फत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. एनआयसी या शासकीय संस्थेद्वारे विकसित करण्यात आलेल्या या प्रणालीसाठी आतापर्यंत ११०० हून अधिक अधिकाऱ्यांचे लॉगिन आयडी तयार करण्यात आले आहेत, अशी माहिती आयटी विभागाचे प्रमुख राहुल जगताप यांनी दिली.

याआधी प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी तयार होणाऱ्या प्रस्तावांच्या फाईल्स एक विभागातून दुसऱ्या विभागात फिजिकल स्वरूपात पाठवल्या जात होत्या. त्यामुळे कधी कधी फाईल हरवण्याचे प्रकार घडत होते. आता या प्रक्रियेचे डिजिटायझेशन झाल्यामुळे कागदपत्रांची गहाळी, फाईल्सची उशीराने हालचाल, किंवा गैरव्यवस्थापन याला आळा बसेल. महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील सर्व विभागांनी ‘ई-ऑफिस’ प्रणालीचा वापर सुरू केला आहे. आता पुढील टप्प्यात महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्येही ही प्रणाली लागू करण्यात येणार आहे. त्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

### असा मिळणार लाभ...!

- महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये ‘ई-ऑफिस’ प्रणाली सक्तीची
- ११०० हून अधिक अधिकाऱ्यांचे लॉगिन आयडी तयार
- १००% ऑनलाईन व पेपरलेस कामकाजाचा मार्ग मोकळा
- कागदपत्र व फाईल्स गहाळ होण्यास आळा
- कारभाराला गती आणि पारदर्शकता

# हवेली बाजार समितीवर भाजपचा सभापती ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आशिया खंडातील सर्वात मोठ्या मानल्या जाणाऱ्या हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीवर भाजपचा लोकनियुक्त सभापती विराजमान होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. येत्या १८ जुलै रोजी नव्या सभापतीची निवड होणार असून, भाजपचे गेल्या अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पूर्णत्वाकडे जाण्याची शक्यता आहे. मात्र पक्षाच्या अंतर्गत उदासीनतेमुळे या प्रक्रियेबाबत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या १८ तारखेला सभापतीची निवड होणार आहे. भाजपचा प्रतिनिधी सभापती होतो की पुन्हा राजकीय तडजोडीला प्राधान्य दिलं जातं, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

२०२३ मध्ये झालेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजप असा थेट सामना रंगला होता. राष्ट्रवादीचे नेतृत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर भाजपच्या पॅनलचे नेतृत्व मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार राहुल कुल आणि प्रदीप कंद यांनी केले. ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची मानली गेली आणि भाजपने पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरत 'हवेलीतील सहकारात भगवा फडकवणार' असा निर्धार केला होता.

या निवडणुकीत भाजपच्या पॅनलमधील पाच उमेदवारांच्या अर्जांवर हरकती आल्या होत्या. ते रिंगणाबाहेर पडतील, असे चित्र होते. मात्र मंत्री चंद्रकांत पाटील यांनी लक्ष घालून सर्व अर्ज वैध ठरवण्यात यश मिळवले. यानंतर झालेल्या मतदानात भाजपने १६ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले, तर राष्ट्रवादीला केवळ २ जागांवर समाधान मानावे लागले.

निवडणुकीनंतर भाजपने सभापतीपदावर दावा केला. मात्र, अंतर्गत चर्चेनंतर ‘सध्याचा सभापती दुसऱ्या गटातून असू द्या, पण पुढचा भाजपचा असेल’, असा तडजोडीचा निर्णय झाला. त्यानुसार दिलीप काळभोर यांची निवड झाली होती.

### राजकीय प्रभाव असलेल्या क्षेत्रांवर परिणाम

हवेली बाजार समितीचा प्रभाव पुणे शहरातील पर्वती, खडकी, कोथरूडसह ग्रामीण भागातील भोर, मुळशी आणि हवेली विधानसभा क्षेत्रांवर आहे. त्यामुळे या समितीवरील वर्चस्व भाजपच्या राजकीय गणितात मोठी भूमिका बजावू शकते. त्यामुळेच मंत्री माधुरी मिसाळ यांनीही यासंदर्भात विधानसभेत वेळोवेळी लक्षवेधी उपस्थित केल्या आहेत.

# समाजाचे ऋण फेडणाऱ्या गणपती मंडळांचा आदर्श ठेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील गणेशोत्सव मंडळांचे नेहमीच कौतुक वाटते, कारण हे मंडळे धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजिक भान राखून समाजातील प्रत्येक घटकासाठी कार्य करतात. तुळशीबाग मंडळाने गेल्या १२५ वर्षांपासून या सामाजिक कार्याची परंपरा जपली आहे. विद्यार्थ्यांनी समाजाचे ऋण फेडणाऱ्या अशा गणपती मंडळांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी व्यक्त केले. मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टतर्फे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट वाटप करण्यात आले. बाजीराव रस्त्यावरील नुमवी प्रशालेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, कोषाध्यक्ष नितीन पंडित, उपाध्यक्ष विनायक कदम, शैलेश गुजर, मुख्याध्यापक प्रकाश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनात चकोर सुबंध, साई डोंगरे, मयूर दिवेकर, प्रतीक इप्ते, तुषार पवार, सागर पेट्टी, अक्षय पुजारे, अनिरुद्ध बारणे यांनी विशेष परीश्रम घेतले. किटमध्ये १२५ दप्तरे, १२५ पाण्याच्या बाटल्या, १२५ कंपास बॉक्स आणि १२५० वह्या मुलांना देण्यात आल्या.



पुणे : मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टतर्फे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

# उद्योग आणि शिक्षण संस्थांमधील परस्पर समन्वय वाढवण्याला प्राधान्य : पाटील




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यासाठी शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान देण्यावर भर दिला पाहिजे. रोजगाराभिमुख व कौशल्याधारित शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यात परस्पर समन्वय वाढण्याची गरज असून, नवीन शिक्षण धोरणात या गोष्टीला अधिक प्राधान्य दिले आहे," असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. जॉबिझ्झा मल्टिपल सर्व्हिसेसच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र एज्युकेशन अँड कॉर्पोरेट आयकॉन्स २०२५' सन्मान सोहळ्यात चंद्रकांत पाटील बोलत होते. 'जॉबिझ्झा'चे संस्थापक गौरव शर्मा, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, माजी संचालक डॉ. विश्वास गायकवाड, डॉ. गिरीश देसाई, रामकृष्ण रमण, डॉ. सुनील भिरूड, डॉ. सिद्धार्थ जबडे, अनिल कश्यप, संजीव बजाज, नीरज व्यवहारे, डॉ. माधुरी खांबेटे, डॉ. सुनीता कराड, डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. शीतल वाटिले, डॉ. कमलजित कौर, यशोधन सोमण, झील कॉलेज, डी. वाय. पाटील बिझनेस स्कुल, डॉ. चेतन चौधरी, डॉ. सुनील कपूर, आशिष लांबट, डॉ. सुशील राऊत, डॉ. निधी मेढेकर, शीतल शर्मा, जितेंद्र शर्मा, गणेश काकांडीकर, हर्षदा जाधव, गणेश शिरसाठ यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल, तर असेंचर टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत सारडा, टेराडाटाचे वरिष्ठ व्यवस्थापक कौस्तुभ कुलकर्णी, फोक्सवॅगन स्कोडाचे सरव्यवस्थापक अजित कवडे, सिम्प्लिफाय हेल्थकेअरचे वरिष्ठ संचालक संगीता सिंग, आयडॉक्स पीएलसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास मसेकर, आय-सोर्स इन्फोसिस्टीम्सचे संस्थापक जितेंद्र सरदेसाई आदींना सन्मानित करण्यात आले. सॉफ्टलिंक ग्लोबलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित माहेश्वरी यांचे 'परिवर्तनशील शिक्षण व भविष्यातील कॉर्पोरेट कार्यपद्धती' यावर बीजभाषण झाले.

इनोव्हेशन आणि मानवी विकासात परिवर्तनशील योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. 'शिक्षण' विभागातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या, महिला शिक्षणात कार्य करणाऱ्या, शिक्षण व उद्योग यांच्यातील परस्पर संबंध दृढ करणाऱ्या, दूरदृष्टीने व प्रेरक शिक्षण देणाऱ्या, तंत्र शिक्षणात भर घालणाऱ्या, शिक्षण क्षेत्रात इनोव्हेशन व मूल्यांकनासाठी भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वाचा, तसेच 'कॉर्पोरेट' विभागातून 'आयकॉनिक एचआर लीडर', 'बेस्ट आंत्रप्रेन्युअर', 'बेस्ट इन लर्निंग अँड डेव्हलपमेंट', 'एचआर लीडरशिप अँड डायव्हर्सिटी चॅम्पियन', 'यंग एचआर लीडर अँड ट्रेलब्लेझर', 'बेस्ट इन टॅलेंट मॅनेजमेंट' असे पुरस्कार देण्यात आले.



> उद्योग व शिक्षण क्षेत्रातील गुणवंतांना एकाच व्यासपीठावर आणून सन्मानित करण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे. यातून दोन्ही क्षेत्रांना आवश्यक गोष्टींची, कौशल्यांची देवाणघेवाण होईल. त्यातून विद्यार्थ्यांना भविष्याच्या दृष्टीकोनातून चांगले, रोजगारक्षम व कौशल्याचे, तसेच प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे मिळतील. सर्व पुरस्कारार्थींचे योगदान दोन्ही क्षेत्रांच्या प्रगतीसाठी मोलाचे आहे.
> 
> -चंद्रकांतदादा पाटील;
> उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

# तरुणींमध्ये रुजतोय रुग्णसेवेचा 'सेवाभाव'...!

## बीएससी नर्सिंगकडे वाढतोय कल : प्रथम वर्ष प्रवेशाची प्रक्रिया सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राज्यातील जवळपास २४७ नर्सिंग महाविद्यालयांमधील बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) ही प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना १७ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षांच्या कालावधीत तरुणींचा 'नर्सिंग' कडे कल वाढत आहे; त्यामुळे या अभ्यासक्रमाला जोरदार पसंती मिळत आहे

या अभ्यासक्रमासाठी झालेल्या सीईटी परीक्षेत जवळपास ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. सीईटी सेलमार्फत एप्रिलमध्ये बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'सीईटी' परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी राज्यातील जवळपास ४७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

त्यापैकी जवळपास ४३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. परीक्षेचा निकाल मे मध्ये जाहीर करण्यात आला. मात्र निकाल जाहीर होऊन दीड महिना झाला, तरी आतापर्यंत अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया जाहीर न झाल्याने विद्यार्थी-पालक हवालदिल झाले होते. परंतु, अखेर सीईटी कक्षाने या प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

यानुसार, बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याच्या प्रक्रियेस सुरवात झाली आहे. ही नोंदणी १७ जुलैपर्यंत सुरू राहणार असून, याच कालावधीत विद्यार्थ्यांना शुल्क भरून अर्ज निश्चिती करायची आहे. विद्यार्थ्यांना त्यांची सर्व कागदपत्रे मूळ रंगीत स्वरूपात स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करायची आहेत. त्यानंतर पुढील प्रक्रियेचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले जाईल, असे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे.

या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी सीईटी सेलच्या संकेतस्थळावरील सर्व माहिती सविस्तर वाचावी, अर्ज भरताना चुकीची माहिती दिल्यास प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच, विद्यार्थ्यांनी कागदपत्रे पडताळणीच्या अंतिम मुदतीपूर्वी आवश्यक सर्व कागदपत्रे अपलोड करावीत, असे आवाहन सीईटी सेलने केले आहे.

**'बी.एस्सी नर्सिंग'च्या प्रवेशासाठी उपलब्ध जागांचा तपशील :**

| महाविद्यालयांचा प्रकार | महाविद्यालयांची संख्या | उपलब्ध जागा |
|---|---|---|
| शासकीय | १२ | ९०० |
| खासगी | २३५ | १२,५२० |

प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.mahacet.org

'बी.एस्सी नर्सिंग'साठी १३ हजारांहून अधिक जागा उपलब्ध

राज्यातील केंद्र सरकार, इंडियन नर्सिंग कौन्सिल, महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) यांच्या मान्यतेने आणि संलग्न असणाऱ्या नर्सिंग महाविद्यालयांतील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ही प्रक्रिया राबविली जात आहे. राज्यात एकूण २४७ नर्सिंग महाविद्यालयातून १३ हजार ४२० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत.





## समाविष्ट गावांच्या मिळकत करावर विधानसभेत चर्चा

**पुणे :** विधानसभेच्या अधिवेशनात पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील मिळकत करविषयक तक्रारींवरही चर्चा झाली. आमदार भीमराव तापकीर यांनी लक्षवेधी सुचना मांडताना सांगितले की, या गावांमधील कर पूर्वीच्या ग्रामपंचायतींच्या दराच्या तुलनेत दुप्पट घेतला जात आहे. यामुळे नागरिकांवर आर्थिक बोजा वाढला असून, काही नागरिकांना लाखो रुपयांची कर बीले मिळाली आहेत.

तापकीर यांनी यासाठी महादेव धावडे या मिळकतधारकाला आलेल्या सुमारे ५९ लाख रुपयांच्या बिला संदर्भात उदाहरण दिले. यावर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, "नवीन कर चार्ट तयार करण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात आले आहेत आणि सध्या कोणतीही सक्तीची वसुली केली जात नाही."

त्याचबरोबर, समाविष्ट ११ गावांतील पाणीपुरवठा योजनांसाठी ६०० कोटी रुपयांचा प्रस्ताव महापालिकेने पाठवला असून, त्याचा विचार 'नगरोत्थान योजने'त केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



## पुण्यात महावितरणच्या आठ नव्या शाखांची तयारी

**पुणे :** महावितरणच्या पुणे शहरातील शाखांवर ग्राहकांची प्रचंड वाढलेली संख्या आणि अपुरे मनुष्यबळ यामुळे वीजपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात आठ नव्या शाखांची निर्मिती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विशेषतः कोंढवा परिसरातील वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेचा आणि अपघातांचा विचार करून, त्या भागात भूमिगत वीजवाहिन्यांचे जाळे निर्माण करण्याचीही योजना आखण्यात आली आहे.

कोंढवा शाखेअंतर्गत सुमारे ८१ हजार वीज ग्राहक असून, केवळ २५ कर्मचारी कार्यरत आहेत. परिणामी तांत्रिक त्रुटी, वारंवार वीज खंडित होणे आणि देखभाल दुरुस्तीत अडथळे निर्माण होत आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार चेतन तुपे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना दिली.

या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "महावितरणच्या कार्यपद्धतीनुसार २० हजार ग्राहकांमागे एक शाखा असावी असा नियम आहे. मात्र पुण्यात अनेक शाखांमध्ये यापेक्षा कितीतरी अधिक ग्राहक संख्या असूनही योग्य पद्धतीने विभाजन झालेले नाही. त्यामुळे आता आठ नव्या शाखांची निर्मिती केली जाणार आहे.

## रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी ऋषिकेश बागडे

**पुणे :** रोटरी क्लब लोकमान्यनगरच्या अध्यक्षपदी ऋषिकेश बागडे यांची निवड करण्यात आली. मावळते



अध्यक्ष अविनाश तरवडे यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्विकारली. सचिवपदी शेखर शिंदे यांची निवड करण्यात आली त्यांनी राजकुमार बजाज यांच्याकडून सूत्रे स्विकारली. हॉटेल क्लार्क्स इन येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी नियोजित प्रांतपाल नितीन ढमाले, सहाय्यक प्रांतपाल संजीव ओगले आदी मान्यवरांच्या बरोबरच रोटरी पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना नवनिर्वाचित अध्यक्ष ऋषिकेश बागडे यांनी या वर्षीचा "Youth Focus"हा प्रमुख ध्येय म्हणून जाहीर केला. त्यांनी सांगितले की, "भरत हा तरुणांचा देश आहे. जर या युवांना योग्य स्किल्स,विचार आणि प्रेरणा दिली, तर ते केवळ नोकरी मागणारे नाही, तर नवे रोजगार निर्माण करणारे ठरतील.

## औंध ब्रेमेन चौकात विजेच्या धक्क्याने दोन तरुणांचा मृत्यू

**पुणे :** औंधमधील ब्रेमेन चौकात सोमवारी मध्यरात्री विजेच्या धक्क्याने दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली असून, महावितरणच्या निष्काळजीपणावर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

मृत्यू झालेल्या तरुणांची नावे विनोद चिंतामण क्षीरसागर (वय २९, रा. कस्तुरबा वसाहत, औंध) आणि सौरभ विजय निकाळजे (वय २७, रा. कोथरूड) अशी आहेत. हे दोघे मित्र रविवारी रात्री ब्रेमेन चौकातील महावितरणच्या विद्युत रोहित्राजवळ असलेल्या एका पडीक जागेत मद्यपान करण्यासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी उघड्या अवस्थेत असलेल्या रोहित्रातून विद्युत प्रवाह त्यांच्या संपर्कात आला आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

सकाळी नागरिकांना पडीक जागेत दोघांचे मृतदेह दिसून आले, त्यानंतर त्यांनी तात्काळ अग्निशमन दल आणि पोलिसांना माहिती दिली. चतु:श्रृंगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला असून, या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली.

# विद्यार्थी पालिकेचे; 'पोषण' झेडपीचे...!

### प्रशासनाचा सावळागोंधळ चव्हाट्यावर: पालक हतबल

राज्य शासनाकडून मिळणारा निधीचा मलिदा लाटण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'लगीनघाई' करत हद्दीलगतच्या गावांचा शहरात समावेश करुन घेतला; त्यामुळे गावचा विकास होइल अशी भ्रामक अपेक्षा गाववाले बाळगून होते. मात्र; त्यांची ही आशा अल्पावधीतच फोल ठरली आहे. या गावांचा विकास पूर्णपणे मंदावला आहे; त्यामुळे 'गड्या आपला गावच बरा' असे म्हणण्याची वेळ गाववाल्यांवर आली आहे. विकासाची ही जंत्री 'कोसो मैल दूर' असतानाच महापालिका प्रशासन शाळांतील विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्यास सपशेल अपयशी ठरले आहे; त्याचा जबरदस्त फटका सर्वसामान्य विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना सहन करावा लागत आहे.

"याबाबत आदेश नुकतेच प्राप्त झाले आहेत. येत्या दोन-तीन दिवसांत समाविष्ट गावांतील शाळांना पोषण आहाराचे वाटप सुरू करत आहोत. यासंदर्भात संबधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत; त्यामध्ये सातत्य ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

**- शिल्पा मेनन,** अधीक्षक, पोषण आहार विभाग, महापालिका

"अधिकाऱ्यांनी वेळोवेळी याबाबत पाठपुरावा करून हे निदर्शनास आणून देणे अपेक्षित होते. एक वर्षाच्या कालावधीत महापालिकेकडे नियोजनासाठी वेळ होता. मात्र अजूनही याबाबत मबापालिका या दृष्टीने पावले उचलताना दिसत नाही,

**-दीपाली कवडे** रहिवासी

"शिक्षणासाठी कोटींचा अर्थसंकल्प असणाऱ्या महापालिकेला जिल्हा परिषदेकडून पोषण आहार घेण्याची वेळ आली आहे. शिक्षण विभागाचा हा आंधळा कारभार आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना महापालिकेचा पोषण आहार तर नाहीच; परंतु १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला मिळणारा खाऊदेखील मिळत नाही. मुलांना दानशूर व्यक्तींकडून या दिवशी शाळेत येऊन खाऊ वाटप करण्यात येतो.

**- सचिन झांबरे,** नागरिक, होळकरवाडी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नव्याने समाविष्ट झालेल्या शाळांत महापालिकेकडून पोषण आहाराचे नियोजन रखडलेले आहे. या शाळांना अजूनही जिल्हा परिषदेचा पोषण आहार पुरवत आहे. या शाळांसाठी महापालिकेने तातडीने पोषण आहाराचे नियोजन आखावे, अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालकांकडून होत आहे.

महापालिकेत समायोजन होऊन एक वर्षाचा कालावधी झाला तरीही शाळांना पूर्णपणे सुविधा मिळत नसल्याचे दिसत आहे. समाविष्ट गावांबरोबर लहान मुलांसोबतही महापालिका दुजाभाव करत आहे. जिल्हा परिषदेकडून महापालिकेकडे शाळांचे हस्तांतर झाले आहे; मात्र पोषण आहाराचे नियोजन केले नसल्याने मुले पोषण आहारापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा परिषदेकडूनच पोषण आहार सुरू आहे. सध्या जिल्हा परिषदेकडूनच शाळांना आवश्यक धान्य पुरवले जाते. बचत गटांद्वारे शाळांतील एका खोलीमध्ये पोषण आहार तयार करून मुलांना वाटला जातो.जिल्हा परिषदेने मुलांसाठी दाखवलेली आत्मीयता, काळजी आणि सकारात्मकता महापालिकेकडे नसल्याचे दिसत आहे. पटसंख्या असूनदेखील महापालिका या शाळांमध्ये पोषण आहार देण्यास असमर्थ ठरत आहे.

अधिकाऱ्यांनी वेळोवेळी याबाबत पाठपुरावा करून हे निदर्शनास आणून देणे अपेक्षित होते. एक वर्षाच्या कालावधीत महापालिकेकडे नियोजनासाठी वेळ होता. मात्र अजूनही याबाबत महापालिका या दृष्टीने पावले उचलताना दिसत नाही, असे रहिवासी दीपाली कवडे यांनी सांगितले.

## दुचाकी चोरी करणारा तरुण अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील येरवडा परिसरात डिलिव्हरी बॉयच्या वेशात फिरत दुचाकी चोरणाऱ्या एक १९ वर्षीय तरुणाला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून चोरी केलेल्या ६० हजार रुपयांच्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मुसेफ अकिल शेख असून तो लक्ष्मीनगर येथील सेवक चौक परिसरात राहतो. पोलिसांना खबऱ्याकडून माहिती मिळाली होती की, ईशान्य मॉल परिसरात एक संशयास्पद व्यक्ती वाहन चोरीच्या उद्देशाने फिरत आहे.

ही माहिती मिळताच येरवडा पोलीस ठाण्याचे अंमलदार भिमराव कांबळे आणि बालाजी सोगे यांनी तत्काळ कारवाई करत परिसरात सापळा रचला. थोड्याच वेळात संशयित तरुणाला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने मौजमजेच्या उद्देशाने दोन दुचाकी चोरल्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्याकडून चोरी केलेल्या दोन मोटारसायकली जप्त केल्या असून त्या येरवडा पोलिसांच्या हद्दीतून चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. या कारवाईसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप सुर्वे तपास करत आहेत.

ही यशस्वी कारवाई अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

तपास पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, पोलीस हवालदार सचिन गवळी, मनोज शिंदे, तसेच अंमलदार बालाजी सोगे, भिमराव कांबळे, शैलेश वाबळे, संदीप जायभाये, नवनाथ गांगुडे, नटराज सुतार आणि अमोल गायकवाड यांनी सहभाग घेतला.

## स्वमग्नांसाठीच्या सुंदरजी इंस्टिट्यूटचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वमग्र (न्यूरोडायव्हर्स) तरुण आणि प्रौढ व्यक्तींना सक्षम बनवण्याच्या दृष्टीने सुंदरजी व्होकेशनल इंस्टिट्यूटची (सुंदरजी व्यावसायिक संस्था) स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेचे उद्घाटन बाल विकासतज्ञ डॉ. सुनील गोडबोले आणि डॉ. अश्विनी गोडबोले यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या समारंभाला सुंदरजी ग्लोबल अकाडमीच्या सह-संस्थापक आणि संचालक मसरत तवावाला, डॉ. सुनील गोडबोले, डॉ. अश्विनी गोडबोले, डॉ. झिमरा इस्रायल, निलेश बजाज तसेच रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउनच्या अध्यक्षा अदिती भेंडे, एडविना डायस, रिचर्ड लोबो, शिखा मित्रा, रश्मी शाह, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. मसरत तवावाला म्हणाल्या, "आमचे अंतिम ध्येय न्यूरोडायव्हर्स तरुण आणि प्रौढ यांना आर्थिक स्वातंत्र्य निर्माण करून देण्याचे आहे.संस्थेत डिजिटल साक्षरता, बेकिंग, हाऊसकीपिंग, बागकाम आणि फॅब्रिक एनहान्समेंट अशा पाच परिवर्तनकारी व्यावसायिक प्रयोगशाळा असून त्यांचे 3 वर्षांचे आभ्यासक्रम आहेत. संस्थेच्या प्राचार्या श्रीमती रश्मी शाह यांनी विशेष शाळांमध्ये विद्यार्थी परिषदेचे महत्व सांगण्यासाठी एक अंतर्दृष्टीपूर्ण संदेश दिला.



पुणे स्वमग्र (न्यूरोडायव्हर्स) तरुण आणि प्रौढ व्यक्तींना सक्षम बनवण्याच्या दृष्टीने सुंदरजी व्होकेशनल इंस्टिट्यूटची (सुंदरजी व्यावसायिक संस्था) स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेचे उद्घाटन बाल विकासतज्ञ डॉ. सुनील गोडबोले आणि डॉ. अश्विनी गोडबोले यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

# खरा इतिहास समोर आणणे ही हिंदुत्वाची गरज : माधव भंडारी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशात हिंदुत्वासाठी काम करणाऱ्याचा सत्कार करायला २०२५ साल उजाडावे लागले. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर. ज्या प्रमाणे इतर धर्मीय धर्मांतर करतात त्याच प्रमाणे हिंदूंना धर्मांतर करवून घेण्याचा अधिकार आहे. हा आपला संविधानिक अधिकार आहे. तो कसा करू शकतो याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. धर्मांतराच्या आक्रमणामुळे भारताचे तुकडे झाले. जर आपण वेळच्या वेळी कृती केली नाही, तर हे कुठल्या दिशेने जाईल सांगता येत नाही. आजपर्यंत जो इतिहास आपल्यापर्यंत आला, तो खरा नाही. खरा इतिहास समोर आणणे ही हिंदुत्वाच्या कामाची गरज आहे, असे मत भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी व्यक्त केली

पुणे सार्वजनिक सभेच्या वतीने सार्वजनिक काका पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक मुंबईच्या विश्वस्त आणि कोषाध्यक्ष मंजिरी मराठे यांना सार्वजनिक काका पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विद्याधर नारगोलकर, कार्याध्यक्ष अनिल शिदोरे, सुरेश कालेकर, धनाजी चन्ने, विजय मराठे, विमल भालेराव, सुभाष कुलकर्णी यांसह कार्यकारी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

माधव भंडारी म्हणाले, सार्वजनिक काका आजच्या पिढीला फारसे माहिती नाहीत. पुण्याने जी वैशिष्ट्यपूर्ण नवरत्न देशाला दिली, ज्याची नोंद फारशी घेतली नाही त्यातील सार्वजनिक काका एक होते. ते लोकविलक्षण व्यक्तिमत्व होते. त्यांनी उभी केलेली संस्था १५५ वर्ष जिवंत ठेवणे हे मोठे काम आहे, हे काम जे करत आहेत त्यांचे अभिनंदन. संस्था अशीच पुढे टिकून राहण्यासाठी सगळ्यांनी मदत करायला पाहिजे.

"पहलगाम हल्ल्यात २६ जण मारले गेले. त्यावेळी प्रत्येक जण पेटून उठलो. आपण लढण्यासाठी तयार नव्हतो. त्यामुळे तो हल्ला झाला. आपण लढण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. आज प्रत्येकाने रायफल प्रशिक्षण घेतले पाहिजे.स्वदेशीचा पुरस्कार आपण केला पाहिजे. हे सावरकरांचे विचार आहेत, परंतु आपल्याला ते जाणून घ्यायचे नाहीत.

**-मंजिरी मराठे;**
विश्वस्त आणि कोषाध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक मुंबई

# अनधिकृत मजल्यांच्या बांधकामांवर पालिकेचा 'हातोडा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**थेरगाव :** आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या अतिक्रमण कारवाईत थेरगाव व रहाटणी येथील महापालिकेची परवानगी न घेता अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या मजल्यांचे तसेच पत्रा शेडचे १३,३१५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८ अनधिकृत बांधकामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

थेरगाव येथील कारवाईमध्ये ग क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे यांच्या नेतृत्वात महापालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच कारवाई दरम्यान या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या निष्कासन कारवाईमध्ये पोकलेन व जेसीबी यांचा वापर करण्यात आला. शिवाय यावेळी अग्निशमन वाहने आणि



रुग्णवाहिका याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या. तर महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाई मध्ये थेरगाव येथील गुजरनगर, लक्ष्मणनगर तसेच रहाटणी गावठाण येथील अनधिकृत बांधकामांचा समावेश होता. येथील इमारती मध्ये अनधिकृत पद्धतीने उभारलेले इमारतींचे मजले तसेच पत्र्यांच्या बांधकामांवर महापालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



> शहरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या वतीने कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या शाश्वत विकास सोबतच येथील नागरिकांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. शहरात अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या बांधकाम धारकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- शेखर सिंह,** आयुक्त





## नाना शिवले यांची प्राचार्यपदी नियुक्ती.

**पिंपरी :** दिशा सोशल फाऊंडेशनचे ज्येष्ठ संचालक तसेच माजी अध्यक्ष जगन्नाथ उर्फ नाना शिवले यांची थेरगाव येथील प्रेरणा माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय या शिक्षण संस्थेत प्राचार्यपदी नियुक्ती झाली आहे. यानिमित्ताने मंगळवारी (१५ जुलै) एका विशेष बैठकीत दिशा सोशल फाऊंडेशन परिवाराच्या वतीने त्यांचा शिवप्रतिमा, स्मृतीचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. दिशा सोशल फाऊंडेशनच्या स्थापनेपासूनच कार्यरत असलेले नाना शिवले हे शहरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, सहकारी संस्थाशी संबंधित आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील प्रसिध्द सूत्रसंचालक, वक्ते व मुलाखतकार म्हणूनही ते सर्वपरिचित आहेत. महापालिकेच्या शिक्षण मंडळावर सदस्य आणि उपसभापती म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली, तेव्हा त्यांनी विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबवत त्या संधीचे सोने केले.

## 'जीएसटी' रॅकेटमधील 'रेहमानी'वर कारवाई

**पिंपरी :** चिंचवडमधील कुदळवाडी-जाधववाडी येथील दीपक भगत यांना कर्ज देण्याच्या बहाण्याने कागदपत्रे घेतली. त्याच्या आधारे बनावट कंपनी स्थापन केली. त्या कंपनीच्या माध्यमातून बोगस बिले सादर केली आणि इनपूट टॅक्स घेवून सरकारचा करोडो रुपयांचा वस्तू व सेवा कर (GST) बुडवला आहे. सेवा कर गुप्तवार्ता संचालनालयाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू असली, तरी प्रकरणाची गंभीरता लक्षात घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याची चर्चा करुन गृह विभाग व जीएसटी विभागाकडून आरोपींवर कठोर करावाई करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिले.

जाधववाडी येथे राहणारा मोहम्मद कैश रहमानी याने कर्ज देण्याच्या बहाण्याने दीपक भगत यांची कागदपत्रे घेतली. त्याद्वारे बोगस कंपनी तयार केली. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. रेहमानी याने आशिया स्टील ट्रेडर्स दुकानाद्वारे कोट्यवधींचा जीएसटी बुडवला आहे. शहरात असे रॅकेट कार्यरत आहे.

## श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापनदिन

**रावेत :** श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघ व विरंगुळा केंद्र यांच्या स्थापनेचा पहिला वर्धापनदिन २३ जुलै रोजी होत आहे. सायंकाळी ५ ते ९ या वेळेत एस.व्ही. पाटील रोडवरील रंजन हायट्ससमोर यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात अले आहे.

कार्यक्रमात सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संघाचे अध्यक्ष अरुण जोशी, उपाध्यक्ष किशोर शिनकर, सचिव आनंदराव बागुल, सहसचिव चंद्रकांत आंबोळे, कोषाध्यक्ष विकास कुलकर्णी व अन्य सर्व सभासदांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

# रमाबाई मुक्ती मिशनची मान्यता रद्द करा

## धर्मांतरण विरोधी कायदा कधी आणणार - आ. उमा खापरे

पंडिता रमाबाई मुक्ती मिशन केडगाव, तालुका दौंड, जिल्हा पुणे येथील संस्थेमध्ये दाखल असणाऱ्या अनाथ मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी अत्याचार केले जातात. त्यांचा छळ केला जातो, त्यांच्याकडून सार्वजनिक शौचालय साफ करून घेणे, त्यांचे केस कापणे, त्यांच्या देवतांच्या मूर्ती फोडून धर्मांतर करण्यासाठी दबाव आणला जातो. या संस्थेची मान्यता रद्द करून धर्मांतरण विरोधी कायदा पुढील अधिवेशनात आणावा अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी मंगळवारी विधान परिषदेत केली.



> पंडिता रमाबाई मुक्ती मिशन केडगाव, तालुका दौंड, जिल्हा पुणे या संस्थेमध्ये घडलेल्या अत्याचाराच्या घटनेविषयी ८ डिसेंबर २०२३ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून तो यवत पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आला आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पुढील एका महिन्यात संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल घेऊन जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच संस्थेची मान्यता रद्द करण्यासाठी अहवालावर अभिप्राय देऊन संबंधित विभागाकडे सादर केला जाईल
>
> **-पंकज भोयर** राज्यमंत्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** या संस्थेमध्ये दाखल झालेल्या अनाथ मुलींवर अत्याचार केले जातात, तसेच त्यांना वैद्यकीय उपचारांच्या नावाखाली परदेशात पाठवले जाते. त्यांचे पुढे काय होते ? त्या परत भारतात आल्या का नाही याची माहिती दिली जात नाही. येथील मुलींना त्यांच्या पालक व नातेवाईकांशी संपर्क ठेवू दिला जात नाही. याविरुद्ध एका मुलीने तिथून सुटका करून घेऊन पालकांकडे तक्रार केली. याविषयी नंतर यवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल



झाला. तेंव्हा मी प्रत्यक्ष यवत पोलीस स्टेशनला जाऊन आले. या धर्मांतराच्या गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी ११ जुलै २०२४ रोजी, एक वर्षापूर्वी मी औचित्याचा मुद्दा म्हणून हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन गृहमंत्र्यांनी देखील समिती नेमून चौकशी अहवाल सादर करून यावर कारवाई केली जाईल असे आश्वासन सभागृहात दिले होते.

- १) एक वर्ष झाले तरी अध्यापही या संस्थेवर कारवाई झाली नाही. अशा घटना घडणे ही समाजाला लागलेली कीड आहे ही कीड वाढू नये यासाठी धर्मांतरण विरोधी कायदा आणणे आवश्यक आहे.
- २) पुढील अधिवेशनात धर्मांतरण विरोधी कायदा करून पंडिता रमाबाई मुक्ती मिशनची मान्यता रद्द करावी व तसा अहवाल केंव्हा सादर करणार हे सभागृहाला अवगत करावे अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी मुंबई येथे सुरू असणाऱ्या पावसाळी अधिवेशनात मंगळवारी (दि. १५ जुलै) विधान परिषदेत सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे केली.

# वाहतूक पोलिसांच्या भूमिकेबाबत शंका व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी मेट्रो स्टेशनखाली उभी केलेली दुचाकी वाहने 'टोइंग व्हॅन'द्वारे उचलून वाहतूक पोलिस दंड आकारत आहेत. पण, तेथेच 'नो-पार्किंग'चा फलक असूनही रिक्षा उभ्या केल्या जातात. पण, या चालकांवर वाहतूक पोलिस कारवाई करत नाहीत. त्यामुळे रिक्षाचालकांसाठी वेगळा नियम आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर, वाहतूक पोलिसांच्या भूमिकेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.



पिंपरीतील मोरवाडी चौकातून पिंपरी गाव, चिंचवड, नेहरूनगर, लांडेवाडी, भोसरी, मोशीकडे जाता येते. वर्दळीच्या या चौकात सतत वाहतूक कोंडी होत आहे. विविध कामांमुळे रस्ते अरुंद झाले, त्यातच रिक्षा थांब्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होऊन कोंडीची स्थिती उद्भवत आहे. मोरवाडी चौकात रिक्षा चालकांनी दापोडी-निगडी रस्ता, मोरवाडी-पिंपरी कोर्ट रस्ता, निगडी-दापोडी रस्त्यावर महापालिकेसमोर आणि मोरवाडी-पिंपरी गाव या चारही रस्त्यांवर चार रिक्षा थांबे सुरू केले आहेत. त्यामुळे हा चौक रिक्षाचालकांच्या ताब्यात गेला आहे.

तर, याच चौकात मेट्रो स्टेशनखाली दुचाकी उभी करुन कामाला जाणाऱ्यांना वाहतूक पोलिस कारवाई करताना दिसून येतात. दुचाकी उचलून नेतात. दंड आकारतात. पण, रिक्षाचालकांना या बेशिस्तीतून सवलत देण्यात आल्याची स्थिती आहे.

### 'नो-पार्किंग' फलक नसतानाही दंड

- **मोरवाडी चौकाच्या पुढे विजय सेल्ससमोर नो-पार्किंगचा फलक नसल्याने खासगी वाहन चालक चारचाकी पार्किंग करुन जातात. पण, काही वेळातच तेथे वाहतूक पोलस दररोज येथे पार्किंग केलेल्या वाहनांना जॅमर लावतात किंवा ती वाहने टोईंग करुन घेऊन जातात. त्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करताना दिसून येतात. त्यामुळे नो-पार्किंगचा बोर्ड नसताना कारवाई का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

# नवयुग श्रावणी काव्य स्पर्धेसाठी कविता पाठवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आयोजित ३२व्या नवयुग श्रावणी काव्यस्पर्धेसाठी गुरुवार, दिनांक ३१ जुलै २०२५ पर्यंत कविता पाठवाव्यात, असे आवाहन नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष राज अहेरराव यांनी केले आहे. सदर स्पर्धा प्रत्यक्ष सादरीकरण करून घेण्यात येईल. स्पर्धेसाठी इच्छुक कवीने आपली एक कविता अनिकेत गुहे (सहकोषाध्यक्ष) यांच्या व्हॉट्सॲप क्रमांक ९८२२८८४९९२ वर टाईप करून पाठवायची आहे. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी खालील नियमावलीचे पालन करावे. कवितेला विषयाचे बंधन नाही. कविता किमान १२ ते कमाल २० ओळीपर्यंत असावी. यापेक्षा दीर्घ असू नये. सुरुवातीला 'नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आयोजित श्रावणी काव्य स्पर्धा ३२ साठी' असा उल्लेख करावा. कवितेचे शीर्षक, कविता, त्याखाली संपूर्ण नाव, आपला परिसर आणि संपर्क क्रमांक टाईप करावा. कवितेमधून राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.



## 'न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता व निष्पक्षता प्रेरणादायी!'

**पिंपरी :** न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता व निष्पक्षता नवोदित वकिलांसाठी प्रेरणादायी असून युवा पिढीने न्याय, नीतीमत्ता आणि लोकशाही मूल्यांची शिकवण घ्यावी!' असे आवाहन मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अंबादास जोशी यांनी पिंपरी येथे केले. दर्द से हमदर्द तक संस्था आणि एस.एन.बी.पी. विधी महाविद्यालय, पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ व १३ जुलै रोजी ऑक्सफर्ड शैली राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा एस.एन.बी.पी. विधी महाविद्यालय सभागृह, मोरवाडी, पिंपरी येथे 'कॉलेजियम प्रणाली : शाप की वरदान?' या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याच्या बक्षीस वितरण समारंभात अंबादास जोशी बोलत होते. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश साळशिंगीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनीता साळशिंगीकर, सुभद्रा एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. वृषाली भोसले, ॲड. ऋतुजा भोसले, प्राचार्या डॉ. रोहिणी जगताप, उपप्राचार्य कैलाश पोळ, ॲड. सतिश गोरडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांचा आकुर्डीत सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आकुर्डी येथील शिवसेनेचे उप जिल्हा प्रमुख यांच्या वतीने युवा सेनेच्या नवीन पदाधिकांऱ्यांचा आकुर्डी येथे सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, युवा सेनेचे प्रदेश सचिव विश्वजित बारणे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहर संघटक

सरिता साने, ॲड राजेंद्र काळभोर, सुनील राऊत आयोजक दिलीप पांढरकर,प्राजक्ताताई पांढरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख सागर पाचर्णे, युवा सेना मावळ लोकसभा अध्यक्ष राजेंद्र तरस, युवती सेना जिल्हाप्रमुख सायली साळवे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

तसेच प्रियांका चव्हाण, अर्चना गुरव, प्रेरणा मिसाळ, सरिता जगधणे, स्पृहा चांदोरकर, वैशाली चांदोरकर यांचा देखील सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप पांढरकर यांनी केले सूत्रसंचालन सुरेश लिंगायात यांनी तर आभार हर्षवर्धन पांढरकर यांनी मानले.




**पुणे** आकुर्डी येथील शिवसेनेचे उप जिल्हा प्रमुख यांच्या वतीने युवा सेनेच्या नवीन पदाधिकांऱ्यांचा आकुर्डी येथे सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, युवा सेनेचे प्रदेश सचिव विश्वजित बारणे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहर संघटक

# सुधारित प्रारूप विकास आराखड्या विरोधात हरकती दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सुधारित प्रारूप विकास आराखडा (डीपी प्लान) वर हरकतींचा अक्षरशः पाऊस पडला आहे. साठ दिवसांच्या मुदतीमध्ये तब्बल ४९ हजार ५७० हरकती महापालिकेकडे दाखल करण्यात आल्या आहेत. मंगळवारी हरकती नोंदविण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हरकती नोंदवून शहरवासीयांकडून महापालिका प्रशासनाविरोधातील अंसतोष व्यक्त केला आहे. त्यावर लवकरच सुनावणी घेतली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा एकत्रित डीपी आराखडा महापालिकेने तयार केला आहे. शहरातील एकूण २८ गावांच्या एकूण १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या आराखड्यात शहरातील विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे तसेच, सार्वजनिक सेवा व सुविधांसह नवीन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९९६, कलम २६ (१) अन्वये पिंपरी-चिंचवड शहर व विशेष नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्राची प्रारूप सुधारित डीपी १४ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्यावर



नागरिकांकडून सोमवार (दि.१४) पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या.

- १) अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने आरक्षण प्रस्तावित केल्याने नागरिकांसह जागा मालकांमध्ये असंतोष वाढला आहे.
- २) डीपी कार्यालयात बसून खासगी एजन्सीने तयार केला आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकऱ्यांच्या जागे व घरांवर आरक्षणे टाकल्याने आरोप करीत, रोष व्यक्त केला जात आहे.
- ३) या सर्व कारणाने डीपीबाबत हरकतींची संख्या वाढली आहे.

### जागामालक नाराज

- नदीची पूररेषा काही भागांत बदलण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजाची नगण्य संख्या असतानाही शहरातील अनेक भागांत दफनभूमीचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. हरितक्षेत्र, टेकड्या व औद्योगिक क्षेत्रात निवासी झोन दर्शविण्यात आले आहे. रेडझोनचा सीमा निश्चित नसताना ती डीपीच्या नकाशात ठळकपणे दर्शविण्यात आली आहे. काही भागांतील नैसर्गिक नाल्याचे मार्ग बदलण्यात आले आहेत. भर लोकवस्तीत कचरा हस्तांतरण केंद्राचे आरक्षण टाकले आहे. पुनावळे कचरा डेपोच्या जागी ऑक्सिजन पार्कऐवजी व्यापारी संकुलाचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. शिल्लक राहिलेल्या शेतजमिनीवर आरक्षणे टाकल्याने जागामालक नाराज झाले आहेत.

संपादकीय विशेष

# कायदा नवा, त्रुटींचा गवगवा

अमेरिकेत मंजूर झालेले नवे विधेयक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पच्या 2017 च्या करकपातीला कायमस्वरूपी बनवण्याबरोबरच 'अमेरिका फर्स्ट' भूमिकेच्या परतफेडीचे संकेत देते. या कायद्याद्वारे सरकारने संरक्षण, सीमा सुरक्षा आणि ऊर्जा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची योजना आखली आहे. करसवलत आणि देशांतर्गत सुरक्षा मजबूत करणे हा त्यामागील महत्वाचा उद्देश आहे. विधेयकातील सर्वात मोठा निर्णय म्हणजे ट्रम्प यांच्या काळात सुरू झालेली करसवलत. ती लवकरच संपणार होती, पण आता कायमस्वरूपी करण्यात आली आहे. याशिवाय, सरकारने इमिग्रेशनबाबतही कठोर भूमिका घेतली आहे. एक काळ असा होता, जेव्हा अमेरिकेला स्वप्नांचा देश म्हटले जात असे. तिथे जगभरातून लोक चांगल्या भविष्याच्या शोधात येत असत; पण आता स्थलांतराशी संबंधित नियम इतके कडक होत आहेत की निर्वासित आणि स्थलांतरित कामगारांना अमेरिकेत पोहोचणे पूर्वीइतके सोपे राहिलेले नाही. ताजा कायदा अमेरिकेची आर्थिक स्थिती मजबूत करू शकतो; परंतु दीर्घकाळात देशावरील कर्जाचा बोजा वाढवेल. याचा परिणाम अमेरिकेच्या जागतिक भूमिकेवरही होऊ शकतो.

हे विधेयक केवळ एक आर्थिक पाऊल नाही, तर ट्रम्प यांची धोरणे अमेरिकन धोरणनिर्मितीत, विशेषतः सीमासुरक्षेच्या आणि राष्ट्रीय हितांना सर्वोच्च स्थान देण्याच्या बाबतीत मोठी भूमिका बजावत आहेत, हे दाखवते. हे विधेयक धाडसी; पण फूट पाडणारे म्हणून पाहिले जाऊ शकते. एकांगी वृत्ती आणि वादग्रस्त तरतुदींमुळे ट्रम्प यांचे कायदेशीर यश आणि सार्वजनिक स्वीकृती मर्यादित झाली.

अमेरिकेमध्ये मंजूर झालेले हे 864 पानांचे 'बिग ब्युटीफुल' विधेयक भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी चिंतेचे कारण ठरू शकते. या कायद्यातील दोन प्रमुख तरतुदी थेट आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांवर परिणाम करतील. एक म्हणजे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्जाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे आणि दुसरे विद्यापीठांच्या देणगी निधीवरील कर वाढवण्यात आला आहे. या देणगी निधीद्वारे परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेतील अनेक प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये महागडे शिक्षण घेता आले; परंतु नवीन कायद्यानुसार या निधीवर कर लावण्याची तरतूद आहे. विद्यार्थी कर्जावर मर्यादा घातल्याने अमेरिकेची शिक्षण व्यवस्था भारतासह अनेक देशांमधील विद्यार्थ्यांसाठी आणखी महाग आणि कठीण होईल. यामुळे अमेरिकेच्या विकासातील जागतिक प्रतिभेचा सहभागही मर्यादित होऊ शकतो. ट्रम्प यांच्या या पावलामुळे पुढील दहा वर्षांमध्ये अमेरिकेची सुमारे 300 अब्ज डॉलरची बचत होईल; परंतु हे पाऊल आंतरराष्ट्रीय प्रतिभेला निराश करु शकते. अमेरिकेच्या नवोन्मेष क्षमतेवर आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर यामुळे परिणाम होईल. या विधेयकामुळे वाढत्या व्हिसा खर्चासह एनआरआय गुंतवणूक, भारतीय रिअल इस्टेट आणि पैसे पाठवण्यावर दूरगामी आर्थिक परिणाम होऊ शकतो. व्हिसा नियम कठोर होत असताना आणि अमेरिकेतील भारतीय व्यावसायिकांची नोकरीची सुरक्षा अस्थिर होत असताना बरेच लोक त्यांचे दीर्घकालीन गुंतवणूक निर्णय पुढे ढकलू शकतात किंवा त्यांचा पुनर्विचार करू शकतात. भारतीय शेअर बाजारातील अनिवासी भारतीय गुंतवणूक, म्युच्युअल फंड आणि व्यवसाय उपक्रमांवर याचा थेट परिणाम होऊ शकतो.

नवीन अमेरिकन विधेयकानुसार यापुढे अमेरिकेत राहणाऱ्या; परंतु अमेरिकन नागरिक नसलेल्या भारतीय नागरिकांना भारतात पैसे पाठवताना प्रत्येक वेळी 3.5 टक्के कर भरावा लागू शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेवरही या निर्णयाचा परिणाम त्याचा थेट परिणाम होईल. यामुळे भारतातील प्रतिभा आणि स्टार्टअप्स इतर देशांकडे झुकू शकतात. यामुळे केवळ अमेरिकेची तंत्रज्ञान शक्ती कमकुवत होणार नाही, तर ते भारत-अमेरिका संबंधांच्या धोरणात्मक अक्षांनाही धक्का देऊ शकते. हे विधेयक भारत आणि अमेरिकेतील व्यापक धोरणात्मक आणि राजनैतिक संबंधांमध्ये थेट बदल करत नसले, तरी हजारो भारतीय विद्यार्थी, तंत्रज्ञान कर्मचारी आणि व्यावसायिक हितसंबंधांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. नव्या विधेयकामुळे एच-1 बी व्हिसावर नियंत्रण किंवा शुल्कवाढ यासारख्या धोरणांमुळे तंत्रज्ञान कंपन्यांची प्रतिभा पुरवठा साखळी विस्कळीत होईल. टीसीएस, विप्रोसारख्या भारतीय आयटी कंपन्यांनी आधीच अमेरिकेत स्थानिक भरतीवर भर देण्यास सुरुवात केली असून एच-1बी विसाचा वापर 56 टक्क्यांनी कमी केला आहे. यामुळे भारतीय तंत्रज्ञान व्यावसायिकांसाठी अमेरिकन संधींचे दरवाजे कमी होऊ शकतात. एच-1बी व्हिसा शुल्कात 50 टक्क्यांपर्यंत वाढ करणे आणि ग्रीन कार्ड कोटा कमी करणे यासारख्या पावलांमुळे आता भारतीयांसाठी 'अमेरिकन ड्रीम' खूप महाग आणि कठीण बनत आहे. भारतीयांसाठी ग्रीन कार्डची प्रतीक्षा यादी आधीच मोठी आहे. ती आणखी कमी केली गेल्यास अनेक कुटुंबांमध्ये भविष्याबद्दलची अनिश्चितता वाढेल.

दोन्ही देशांमध्ये कार्यरत असलेल्या भारतीय उत्पादन आणि लॉजिस्टिक्स कंपन्यांवरही अमेरिकेच्या टॅरिफ धोरणांचा परिणाम होईल. व्यावसायिक खर्चात वाढ होण्याच्या प्रकारांना सामोरे जावे लागल्यामुळे त्या जागतिक स्पर्धेत मागे पडण्याचा धोका आहे. तसेच अमेरिकन कंपन्यांनी भांडवली गुंतवणूक कमी केल्याचा थेट परिणाम भारतातील परकीय निधीवर अवलंबून असलेल्या 'फिनटेक स्टार्टअप्स'वर होईल. 'एआय'सह तंत्रज्ञान क्षेत्रात दबाव वाढेल. हे विधेयक भारत-अमेरिका संबंधांवर, विशेषतः तंत्रज्ञान सहकार्य आणि कुशल मानवी संसाधनांच्या देवाणघेवाणीवर दबाव टाकू शकते. अर्थात यामुळे भारतीय प्रतिभा कॅनडा, ऑस्ट्रेलिया किंवा ब्रिटनसारख्या देशांकडे वळू शकते. नव्या विधेयकामुळे जागतिक प्रतिभा आकर्षित करण्याच्या अमेरिकेच्या क्षमतेला आणि तांत्रिक वर्चस्वाला धक्का बसू शकतो. ही भारतासाठी एक संधीदेखील असू शकते. भारताने आपल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुंतवणूक वाढवली आणि जागतिक उत्कृष्टतेचे केंद्र बनवले तर दक्षिण आशियाच नाही तर पाश्चात्य देशांमधील विद्यार्थीही येथे शिक्षण घेण्यासाठी येऊ शकतात. तसेच, देशांतर्गत नवोन्मेषाला प्रोत्साहन देऊन भारत दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करू शकतो. अनिवासी भारतीय रिअल इस्टेट, शिक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये पैसे गुंतवतात. वाढत्या करांमुळे या प्रवाहात घट होऊन भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्राला आणि देशांतर्गत गुंतवणूक चक्राला धक्का बसू शकतो.

# दलाई लामांच्या नियुक्तीचा वाद

**तिबेटचे धार्मिक नेते दलाई लामा यांचा उत्तराधिकारी ठरलेला नाही; परंतु या नियुक्तीवरून भारत आणि चीन यांच्यात मात्र नव्याने वाद सुरू झाला असून कटुता निर्माण होण्याची शक्यता आहे. चीनने तिबेटवर अनधिकृत कब्जा करणे, या प्रांतातील लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य नाकारणे आणि त्यांच्या जीवनपद्धतीमध्ये सतत हस्तक्षेप करणे गेली अनेक वर्षे चर्चेत आहे. त्यामुळे हा विषय जगाचे लक्ष वेधत आहे.**



विश्वभ्रमण

प्रा. जयसिंग यादव

तिबेटी धार्मिक नेते दलाई लामा यांनी त्यांची संस्था संपणार नाही आणि त्यांचा पुनर्जन्म निश्चितच होईल; पुढील दलाई लामा कोण असेल याचा निर्णय केवळ आध्यात्मिकरित्या घेतला जाईल, असे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. दलाई लामा यांच्या या विधानानंतर चीनपासून अमेरिकेपर्यंत वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. तिबेटमधील बौद्ध समुदायात मात्र त्यांच्या या विधानाने आनंदाची लाट पसरली आहे. चीनला मात्र गेल्या काही वर्षांपूर्वी केलेल्या कायद्यानुसार दलाई लामांची निवड करण्याचा अधिकार स्वतःकडे हवा आहे. दलाई लामा आपल्या मर्जीतील असल्यास तिबेटवरील आपला अधिकार कायम राहील आणि जगभरातील तिबेटींमध्ये वेगळा संदेश जाईल, स्वतंत्र तिबेटीच्या चळवळीला शह बसेल, भारताचा हस्तक्षेपही थांबेल, असे चीनला वाटते; परंतु निर्वासित तिबेटी सरकारचे प्रमुख पेनपा त्सेरिंग यांनी चीनच्या या हस्तक्षेपाचा तीव्र निषेध केला आहे. ते म्हणाले की पुनर्जन्म हा राजकीय मुद्दा नाही तर पूर्णपणे आध्यात्मिक प्रक्रिया आहे. चीन यात हस्तक्षेप करू शकत नाही. दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण आणि कुठे असेल हे फक्त धार्मिक नेते स्वतः ठरवतात. हा चीनचा विषय नाही. त्यांनी चीनच्या हस्तक्षेपाला निराधार आणि अयोग्य म्हटले. पेनपा त्सेरिंग यांनी 'चीनने प्रथम तिबेटी संस्कृती, बौद्ध धर्म आणि मृत्यूनंतरचे जीवन समजून घेतले पाहिजे, असा सल्ला दिला. त्यांनी उपहासात्मकपणे म्हटले की, चीन खरोखरच पुनर्जन्मावर विश्वास ठेवत असेल तर प्रथम माओ झेडोंग, जियांग झेमिन इत्यादी नेत्यांचा पुनर्जन्म शोधला पाहिजे.

पेनपा त्सेरिंग यांनी 'गोल्ड कलश' प्रक्रियेंतर्गत पुढील दलाई लामाची निवड करावी, ही चीनची सूचनादेखील फेटाळली. त्यांनी सांगितले की ही प्रक्रिया 1793 मध्ये चिंग राजवंशाने लादली होती. त्यामुळे तिबेटवरील नियंत्रण वाढवता येईल; परंतु त्यापूर्वी पहिल्या आठ दलाई लामांची निवड या प्रक्रियेशिवाय करण्यात आली होती. ही परंपरा तिबेटी संस्कृतीचा भाग नाही. दलाई लामांनी स्वतः म्हटले आहे की ते आणखी किमान वीस वर्षे जगतील आणि योग्य वेळ आल्यावरच उत्तराधिकाऱ्याशी संबंधित माहिती दिली जाईल. पेनपा त्सेरिंग यांनी चीनवर तिबेटमधील बौद्ध समुदायात फूट पाडण्याचा आरोप केला आहे. बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी आपल्या आत्मचरित्रात आणि मुलाखतींमध्ये आधीच सूचित केले आहे, की ते नव्वदीनंतर उत्तराधिकाऱ्याबाबत निर्णय घेतील. या वेळी धर्मशाळेतील मॅकलॉडगंज येथे त्यांचा तीन दिवसांचा वाढदिवस साजरा करणे हा केवळ एक उत्सव नाही, तर इतिहास घडवणारा आहे. कारण तो पुढील पिढीत बुद्धाचा प्रतिनिधी कोण असेल हे ठरवू शकतो. चीनचे याकडे लक्ष आहे. चीनचे म्हणणे आहे की दलाई लामा, पंचेन लामा आणि इतर उच्च बौद्ध गुरूंच्या पुनर्जन्माची प्रक्रिया केवळ गोल्डन अर्न म्हणजेच पारंपारिक लॉटरी प्रणाली आणि चीनच्या केंद्र सरकारच्या मान्यतेद्वारे पूर्ण केली जाईल. दलाई लामा यांनी हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला असून आपला उत्तराधिकारी कोणत्याही राजकीय आदेशाने ठरवला जाणार नाही, तर शुद्ध पारंपारिक तिबेटी बौद्ध पद्धतीनुसार ठरवला जाईल, असे म्हटले आहे. त्याला तुल्कु पद्धत म्हणतात. तुल्कू प्रणाली ही तिबेटी बौद्ध धर्माची एक अद्वितीय आणि पवित्र परंपरा आहे.

तुल्कू परंपरेनुसार मृत्यूनंतर दलाई लामांचा पुनर्जन्म होतो. त्यांचा आत्मा नवजात मुलामध्ये पुनर्प्रवेश करतो. या प्रक्रियेअंतर्गत एखादे मूल अचानक जुन्या वस्तू ओळखते, मंत्र जपते आणि मागील जन्माचे अनुभव सांगते तेव्हा बौद्ध धर्म केवळ आश्चर्यकारक मानत नाही, तर मागील जन्मातल्या महान गुरूचा म्हणजेच तुल्कूचा पुनर्जन्म मानतो. हा चमत्कार नाही, तर तिबेटी बौद्ध धर्माची सर्वात रहस्यमय आणि पवित्र परंपरा आहे. हीच 'तुल्कू' प्रणाली चीन राजकीय नियंत्रणाखाली घेण्याचा प्रयत्न करत आहेत. 'तुल्कू' हा तिबेटी शब्द आहे, ज्याचा अर्थ एक ज्ञानी व्यक्ती आहे, जो पुनर्जन्म घेतो आणि मानवजातीच्या कल्याणासाठी परत येतो. ही व्यक्ती सहसा मागील उच्च आध्यात्मिक गुरूचा (जसे की दलाई लामा किंवा पंचेन लामा) पुनर्जन्म मानली जाते. त्याची ओळख बालपणापासूनच होते, त्याला प्रशिक्षण दिले जाते आणि धार्मिक उत्तराधिकारी म्हणून स्थापित केले जाते. त्याच्या निवडीचे अनेक टप्पे आहेत. दलाई लामा यांनी अलिकडेच उत्तराधिकाऱ्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांनी स्पष्ट केले की भविष्यातही एक दलाई लामा असेल. म्हणजेच ही पवित्र संस्था सुरू राहील. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा खरा उत्तराधिकारी शोधला जाईल. याचा अर्थ असा की उत्सर्जनाची परंपरा पाळली जाणार नाही. यामध्ये दलाई लामा जिवंत असताना उत्तराधिकारी निवडतात. सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे दलाई लामा यांनी उत्तराधिकारी निवडण्याशी संबंधित संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी गाडेन फोड्रांग ट्रस्टवर सोपवली आहे. याद्वारे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की चीनने त्यांच्या जागी कोणाची नियुक्ती केली, तर ते अमान्य असेल.

तिबेटमधून 1959 मध्ये निर्वासित झाल्यापासून चौदावे दलाई लामा यांनी हिमाचल प्रदेशमधील धरमशालाला आपला तळ बनवला आहे. येथेच ते तिबेटमधून आलेल्या किंवा भारतात जन्मलेल्या तिबेटी बौद्ध अनुयायांसोबत राहतात. तथापि, गेल्या काही दशकांमध्ये चीनने तिबेटचे चीनीकरण करण्याचे प्रयत्न वाढवले आहेत. त्यांनी या स्वायत्त प्रदेशाला झिझांग असे नवे नाव दिले आहे. दरम्यान, चीनने या धार्मिक रचनेवर नियंत्रण वाढवले आहे. चीनने असे कायदे केले आहेत, जेणेकरून सर्व लामांची निवड त्यांना अनुकूल पध्दतीने केली जाईल. तसेच, तिबेटमधील धार्मिक कार्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. चीनची तिबेटवरील पकड पाहता पंधराव्या दलाई लामाच्या पदावर नियुक्ती केली जाईल. तोच खरा उत्तराधिकारी असेल, हे चीनचे विधान गांभीर्याने घेतले पाहिजे. तिबेटमध्ये हिंसक निदर्शने झाली तरी चीनला पर्वा नाही. कारण तिथे त्याचे सैन्य वर्चस्व गाजवते. चीनला अमेरिकेचीही पर्वा नाही. अमेरिका तिबेटी प्रशासन आणि चौदाव्या दलाई लामांना पाठिंबा देते. चीनला लोकांच्या श्रद्धेची पर्वा नाही. सध्याचे दलाई लामा यांनी त्यांच्या 'व्हॉइस फॉर द व्हॉइसलेस' या पुस्तकात म्हटले आहे, की त्यांचा उत्तराधिकारी चीनव्यतिरिक्त मुक्त जगातून असेल.

चीन हे नाकारण्याचा प्रयत्न करत असला तरी दलाई लामांची संस्था संपवण्याचा मार्ग स्वीकारण्याची शक्यता कमी आहे. त्याऐवजी, ते पुनर्जन्म घेतल्याचा दावा करणाऱ्याचा शोध घेऊ शकतात. यासाठी त्यांनी 2016 मध्ये एक ऑनलाइन प्रणालीदेखील तयार केली. उत्तराधिकारी म्हणून अनेक दावेदार समोर आले, तर चीन 'सुवर्ण कलश' प्रक्रियेद्वारे योग्य उत्तराधिकारी निवडण्याचा प्रयत्न करू शकतो. एक राजकीय प्रक्रियादेखील स्वीकारली जाऊ शकते. त्यात कम्युनिस्ट पक्षाप्रती नवीन दलाई लामांची निष्ठा तपासता येते. हे देखील शक्य आहे की ट्रस्टद्वारे एक दलाई लामा निवडला जाईल आणि चीनद्वारे दुसरा; म्हणजेच एकाच वेळी दोन दलाई लामा असतील. अशा परिस्थितीत, भारताला आपले धोरण ठरवण्यासाठी नैतिक आणि राजकीय-रणनीतिक दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. सध्याचे दलाई लामांचे केंद्र भारत आहे, म्हणून ते या प्रकरणापासून अंतर ठेवू शकते असे गृहीत धरणे ही एक मोठी चूक आहे. नैतिकदृष्ट्या, भारताला धार्मिक स्वातंत्र्य आणि निर्वासित तिबेटी बौद्ध समुदायाला त्यांचा उत्तराधिकारी निवडण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्याचे समर्थन करावे लागेल.

## खेचाखेची

### एकटेच हसताय?

एकटेच हसणारे
एकतर.....
.
.
.
.
प्रेमात पडलेल असतात,
नाहीतर...
.
.
.
डोक्यावर!!!

## सुप्रभात — वेगळं काही

इलिनोइस गोल्फ कोर्सने ११६३ फूट लांबीचा हॉट डॉग तयार केला. हा जगातला सर्वात लांब हॉट डॉग ठरला. या विक्रमाची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली. हा हॉट डॉग बनवण्यासाठी २४४६ हॉट डॉग्जचा वापर करण्यात आला. चार जुलैला हॉट डॉग बनवण्याच्या कामाला सुरूवात झाली. याआधी जपानी कंपनी नाकाकुशू कुबोटाने हा विक्रम आपल्या नावे केला होता. नाकाकुशूने ११५७ फुटांचा हॉट डॉग तयार केला होता. हा जागतिक विक्रम होता. हा विक्रम आता इलिनोइस क्लबच्या नावे झाला आहे. या हॉट डॉगचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. हॉट डॉगचे चाहते जगभरात आहेत. हा हॉट डॉग बघून सर्वांच्या तोंडाला पाणी सुटलं.

## चविष्ट आणि आरोग्यदायी सूप


रुचिरा

पावसाळ्यात गरमागरम सूप घेण्यातली मौज काही वेगळीच असते. म्हणूनच सध्याच्या या वातावरणात पम्पकीन आणि पीनट बटर सूप ट्राय करून बघायला हवं.



साहित्य – चार टीस्पून बटर, चार वाट्या लाल भोपळा खिसून (फ्राय करून), दोन उकडलेले बटाटे, एक कांदा (चिरलेला), चिरलेला लसूण, एक वाटी पीनट बटर, एक चमचा मिरीपूड, सहा वाट्या व्हेज स्टॉक, एक कप दूध, काजू आणि कोथिंबीर, चवीपुरतं मीठ इत्यादी.

कृती – सर्वप्रथम बटाटे आणि लाल भोपळ्याचा खिस मिसळून त्यात बटर टाकून एकजीव करावं. या मिश्रणात व्हेज स्टॉक, कांदा, लसूण, मिरीपूड आणि मीठ मिसळून घ्यावं. मिश्रणाला उकळी येऊ द्यावी. त्यानंतर मिश्रण गॅसवरून उतरवावं. थंड झाल्यावर मिश्रण ब्लेंड करून घ्यावं. त्यामुळे मिश्रण मऊ, दाट आणि एकजीव होईल. त्यानंतर या मिश्रणात दूध आणि पीनट बटर मिसळून घ्या. मिश्रण पुन्हा गॅसवर ठेवून दाट होईपर्यंत शिजवावं. सूप शिजल्यावर कोथिंबीर आणि काजूच्या कापांनी सजवावं.




## राशीभविष्य

- **मेष** : आजचं चंद्रग्रहण या राशीस मिश्र फलदायी आहे. कलांचा विकास होईल. आर्थिक स्थिती सुधारेल.
- **वृषभ** : हे चंद्रग्रहण अनिष्ट फलदायी आहे. कौटुंबिक जीवनात चिंता राहील. अपेक्षित कामं रखडतील.
- **मिथुन** : आजचं चंद्रग्रहण राशीस मिश्र फलदायी आहे. बोलताना विचार करा. आर्थिक अडचणी येतील.
- **कर्क** : आजचं चंद्रग्रहण या राशीस शुभ फलदायी आहे. उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या संधी लाभतील.
- **सिंह** : हे चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. आर्थिक गणित चुकण्याची शक्यता आहे. अनाश्यक खर्च टाळावा.
- **कन्या** : चंद्रग्रहण आपल्याला अनिष्ट फलदायी आहे. मानसिक स्थिती सांभाळावी. फार चिंता करू नये.
- **तूळ** : चंद्रग्रहण शुभ फलदायी आहे. नोकरीत अधिकार वाढतील. आर्थिक कामं मनासारखी होणार आहेत.
- **वृश्चिक** : आजचं चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. कौटुंबिक जीवनात आनंदी रहाल. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **धनु** : हे चंद्रग्रहण आपल्याला अनिष्ट फलदायी आहे. शारीरिक तक्रारी उद्भवतील. घाईने निर्णय नको.
- **मकर** : आजचं चंद्रग्रहण अनिष्ट फलदायी आहे. मोठी गुंतवणूक सध्या टाळावी. प्रतिकूलतेने चिंता राहील.
- **कुंभ** : हे चंद्रग्रहण आपल्याला शुभ फलदायी आहे. नव्या कामांना गती मिळेल. प्रतिकूलतेवर मात कराल.
- **मीन** : आजचं चंद्रग्रहण या राशीस शुभ फलदायी आहे. नोकरीत चांगलं पर्व सुरू होईल. प्रगती होईल.

## टेक केअर — पावसाळ्यात प्रसाधनं जपा

पावसाळ्यात वातावरणातील ओलाव्यामुळे प्रसाधनं खराब होण्याची शक्यता असते. हे टाळायचं असेल तर पुढील टिप्सचा अवलंब करावा.

✻ झाकण घट्ट बसवा– वापर झाला की मेक अप प्रॉडक्टचं झाकण घट्ट बसलं आहे याची खात्री करा. ✻ पावडर बेस प्रोडक्ट– पावसाळी वातावरणात पावडर बेस प्रोडक्ट्सना ओल लागण्याची शक्यता असते. त्यामुळे ही प्रोडक्टस कोरड्या आणि हवेशीर जागेवर ठेवण्याचा प्रयत्न करावा. ✻ झिप लॉक करा– पावसाळ्यात ब्रशची योग्य काळजी घेतली नाही तर कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात ब्रशचे ब्रिसेल्स स्वच्छ ठेवा. तसंच ब्रश झिप लॉक पाऊचमध्ये ठेवा. ✻ ब्लो ड्राय करा– काळजी घेऊनही अनेकदा मेक अप प्रोडक्ट कुंद हवेच्या संपर्कात येतात. अशा वेळी ब्लो ड्रायरच्या मदतीने सुकवण्याचा प्रयत्न करा. पण प्रोडक्टवर ब्लो ड्रायरचा उपयोग सतत करू नका. कारण यामुळे प्रोडक्टच्या रंग आणि दर्जावर परिणाम होण्याची शक्यता असते.

## १६ जुलै — दिनविशेष

१९६९ : अंतराळतज्ज्ञांना घेऊन यान चंद्राच्या दिशेने झेपावलं.
२०१३ : सर्वोच्च न्यायालयाने डान्सबारवरील बंदी उठवली.
२०१७ : गायीपासून होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास करण्यासाठी सरकारकडून समिती स्थापन.
२०१८ : जम्मू आणि काश्मीर क्रिकेट संघटनेतील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारावरुन माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल.

## हेल्थ वेल्थ — उद्दिष्ट ठरवायला हवं

✻ आपल्याला जे जमणार आहे त्याचंच उद्दीष्ट समोर ठेवा. तुम्ही कोणताही खेळ खेळत असलात तरी आधी शालेय संघात स्थान मिळवण्याचं उद्दिष्ट ठेवा. मग चांगली कामगिरी करून पुढे जा. आंतरराष्ट्रीय स्तरावरच संधी मिळायला हवी, असा विचार करू नका. हळूहळू पुढे जा. वास्तववादी उद्दिष्ट ठेवणं गरजेचं आहे.

✻ तुमचं उद्दिष्ट लिहून काढा. पुन्हा पुन्हा लिहून काढा. त्यामुळे ते तुमच्या मनावर ठसेल आणि उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने तुम्ही पुढे जाल.

✻ आयुष्यात कोणताही बदल करताना शिस्त महत्त्वाची असते. त्यामुळे वजन कमी करायचं असो किंवा संघात स्थान मिळवायचं असो; नियमित व्यायाम, आहार–विहाराचे नियम पाळावे लागतील. अंगी शिस्त बाणवावी लागेल. यामुळे तुमचं उद्दिष्ट साध्य होण्यातले अडथळे दूर होतील.

✻ आपलं इप्सित साध्य झाल्यानंतरही प्रयत्नातलं सातत्य राखायला हवं. नाहीतर परत पूर्वपदावर यायला वेळ लागणार नाही.

## पंचांग

**बुधवार, १६ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. ६, नक्षत्र : उ. भाद्रपदा
चंद्रराशी : मीन, योग : शोभन
सूर्योदय : ६.१२, सूर्यास्त : ७.१७


## फॉरवर्डस

**बाज़ीगरी भीं अज़ीब हैं ईन्सानी रिश्तों क़ी ज़नाब...**

**एक़ हीं शख़्स क़ई रंगों में नज़र आतां हैं...!**

## आरोग्यमंत्र — मदत कृत्रिम स्वादुपिंडाची

आहारावर नियंत्रण म्हणजेच मधुमेहावर नियंत्रण असा एक विचार मांडला जातो. हा पूर्णपणे बरा होणारा आजार नसल्याचं तज्ज्ञ सांगतात. मात्र मधुमेहावरच्या उपचारांमध्ये मैलाचा दगड ठरू शकणारा एक शोध अलिकडेच लागला आहे. शास्त्रज्ञांनी कृत्रिम स्वादुपिंड तयार केलं आहे. हे अत्याधुनिक कृत्रिम स्वादुपिंड शरीरात बसवता येतं. ते स्वयंचलित मार्गाने इन्शुलिनची निर्मिती करतं. यामुळे लहान मुलांमधला मधुमेह नियंत्रणात ठेवणं सोपं जाणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हे कृत्रिम स्वादुपिंड रूग्णाच्या रक्तातल्या साखरेच्या पातळीवर लक्ष ठेवतं. त्यानुसार इन्शुलिनची पातळी नियंत्रणात ठेऊन रक्तातली साखरेची पातळी वाढणार नाही याची काळजी घेतली जाते. संशोधकांच्या मते आत्तापर्यंत मुलांच्या रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी इन्शुलिनचं प्रमाण किती असावं याचा निर्णय डॉक्टरांना घ्यावा लागत असे. पण कृत्रिम स्वादुपिंडामुळे पाच ते आठ वर्षांच्या मुलांच्या रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहात असल्याचं तज्ज्ञांच्या लक्षात आलं. कृत्रिम स्वादुपिंडात इन्शुलिन पंप आणि साखर मोजणाऱ्या यंत्राचा वापर करण्यात आला आहे. कृत्रिम स्वादुपिंडाच्या चाचणीत टाईप १ मधुमेहाने ग्रस्त असणाऱ्या पाच ते आठ वयोगटातली सहा मुलं आणि सहा मुलींचा समावेश होता. कृत्रिम स्वादुपिंडाच्या वापराने अधिक चांगला परिणाम दिसून आल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.



## भटकंती

✻ पावसाळ्यात धबधब्याचा आनंद घेण्यासारखं सुख नाही. धबधब्यात भिजायचं असेल तर तुम्ही कर्नाटकातल्या जोग धबधब्याला भेट देऊ शकता. हा भारतातल्या उंच धबधब्यांपैकी एक आहे.

✻ मेघालयमध्ये नोहकालीकाई धबधबा आहे. हा सुद्धा भारतातल्या सर्वात मोठ्या धबधब्यांपैकी एक. मान्सून ट्रेकसाठीही इथे जाता येईल.

✻ कर्नाटकमध्ये हालेबिडू या ठिकाणी प्राचीन मंदिर आहे. तिथे फारसे पर्यटक येत नाहीत. ऐतिहासिक ठिकाणांना भेट द्यायला आवडत असेल तर तुम्ही या ठिकाणाची निवड करू शकता. **क्रमशः**

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### ज्येष्ठ अभिनेते धीरज कुमार यांचे निधन



**मुंबई :** दिग्गज अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक धीरज कुमार यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. न्यूमोनियाची लागण झाल्याने त्यांना मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने आज १५ जुलै राजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. धीरज कुमार यांनी १९६५ साली आपल्या अभिनय क्षेत्रातील कारकीर्दीला सुरुवात केली. ८० च्या दशकात त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांत काम केले आहे. सुभाष घई आणि राजेश खन्ना यांच्यासोबत ते एका टॅलेंट शोच्या अंतिम फेरीपर्यंत पोहोचले होते. या शोचे विजेते राजेश खन्ना ठरले होते. १९७० ते १९८४ या काळात त्यांनी २१ पंजाबी चित्रपटांमध्ये अभिनय केला होता. त्यांनी 'हिरा पन्ना' आणि 'रातों के राजा' या चित्रपटांतही काम केले होते. वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

# किल्ले रायगडावरील पायरी मार्ग १५ ऑगस्टपर्यंत बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायगड :** छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या ऐतिहासिक किल्ले रायगडावर जाणाऱ्या पायरी मार्गावर बंदी घालण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनानं घेतला आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि अतिवृष्टीमुळं पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी १५ ऑगस्ट पर्यंत पायरी मार्ग बंद ठेवण्याचे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

महाड उपविभागीय अधिकारी यांच्या २० जून रोजी सादर करण्यात आलेल्या अहवालात या पायरी मार्गावर दरड कोसळण्याची, दगडी पडण्याची आणि पावसाळ्यात अचानक पाण्याचा जोरदार प्रवाह निर्माण होण्याची शक्यता नमूद करण्यात आली होती. त्यामुळं पर्यटकांच्या जीवित व वित्तहानीची शक्यता नाकारता येत नाही, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घेत संपूर्ण पावसाळभर म्हणजेच १५ ऑगस्टपर्यंत पायरी मार्ग बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.



या बंदी कालावधीत पर्यटकांना रायगडावर जाण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणजेच रोपवे मार्ग वापरण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. त्यासंदर्भात प्रसारमाध्यमांच्या सहाय्यानं जनजागृती करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

जुलै महिन्यात हवामान विभागाकडून अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळं जिल्हा पोलीस अधिक्षकांना नाणे दरवाजा, चित्त दरवाजा आणि रायगड किल्ल्यावर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसंच या आदेशाचं उल्लंघन करणाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत कलम ५१,५४ आणि ५६ अन्वये कडक कारवाई करण्यात येईल, असंही लेखी आदेशात स्पष्ट करण्यात आलं आहे.

किल्ले रायगडाच्या ऐतिहासिक वारशाचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक येत असतात. मात्र, नैसर्गिक आपत्तींमुळे जीवितहानी टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनानं घेतलेला हा निर्णय जनहितार्थ असून नागरिकांनी व पर्यटकांनी सहकार्य करण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

# कात्रज प्राणी संग्रहालयात १४ हरणांचा मृत्यू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राजीव गांधी प्राणी संग्रहालयात मागील काही दिवसांत १४ हरणांचा मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने वन्यजीवप्रेमी आणि पर्यावरण कार्यकर्त्यांमध्ये तीव्र चिंता निर्माण केली असून, प्राणी संग्रहालयाच्या देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, संग्रहालयात सुमारे ९८ हरणे होती. त्यापैकी १४ हरणे मृत अवस्थेत आढळून आली आहेत. हरणांच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, प्रारंभीच्या तपासणीत विषाणूजन्य आजार, अन्नातील दूषितपणा किंवा अचानक झालेला हवामान बदल यास जबाबदार धरण्यात येत आहे. मृत हरणांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, तपासणी अहवाल येण्यासाठी २ ते ३ दिवसांचा कालावधी लागणार आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

घटनेची माहिती मिळताच प्राणी वैद्यकीय अधिकारी व वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. हरणांची देखभाल, आरोग्य परीक्षण आणि खाद्यपदार्थांची गुणवत्ता याबाबत सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर प्राणीप्रेमी आणि पर्यावरण संस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असून, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

राजीव गांधी प्राणी संग्रहालय हे पुणेकरांसह पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. अशा ठिकाणी प्राण्यांच्या अशा पद्धतीने मृत्यू होणे, हे अत्यंत गंभीर असून, प्रशासनाची कार्यपद्धती आणि दक्षतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून देखभाल यंत्रणेचा आढावा घेण्याची तयारी सुरू असून, भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी अतिरिक्त उपाययोजना केल्या जातील, असेही संकेत मिळाले आहेत.

# डिजिटायझेशनचा लाभ लोकसभेला

## सदस्यांना रांगेत उभे राहण्याची गरज नाही



**नवी दिल्ली:** लोकसभेच्या सदस्यांना सभागृहाबाहेर रांगेत उभे राहून हजेरी नोंदवण्याची वेळ आता येणार नाही. त्यांना त्यांची डिजिटल स्वाक्षरी बसल्या जागी करता यावी याची यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. ही सुविधा याच पावसाळी अधिवेशनापासून सुरू करावी, यासाठी लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी विशेष आग्रह धरल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

त्या-त्या दिवसाची कामकाजपत्रिका, प्रश्नोत्तरे व अन्य कागदपत्रे आठव्या अनुसूचितील मराठीसह २२ भाषांमध्ये पाहता येणे, लोकसभा ध्यक्षांसमोरील टेबलवर बसून नोंदी करणाऱ्या संसदीय वृत्तलेखकांऐवजी (रिपोर्टर) साऱ्याच सदस्यांची भाषणे कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) वापर करून त्या-त्या भाषांत डिजिटल पद्धतीने नोंदवणे यांसारख्या डिजिटायझेशन योजनांच्या अंमलबजावणीला लोकसभा सचिवालयाने वेग दिला आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होईल आणि २१ ऑगस्टपर्यंत चालेल. मंत्री आणि विरोधी पक्षनेते यांना त्यांची उपस्थिती नोंदवण्यासाठी स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नसते. मात्र संसदच्या अधिवेशनादरम्यान दैनंदिन भत्ते मिळवण्यासाठी सदस्यांना त्यांची उपस्थिती नोंदवावी लागते.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते टेस्ला शो-रूमचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टेस्ला एक्सपिरियन्स सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केला.

जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्माता टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला आहे. मुंबईत त्यांच्या पहिल्या एक्सपिरियन्स सेंटरचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुख्यमंत्री, त्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धवसे व टेस्ला कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,



महाराष्ट्रासाठी आणि विशेषत: मुंबईसाठी ही आनंदाची गोष्ट आहे की, जगातील सर्वात स्मार्ट कार भारतात येत आहे. याची सुरुवात महाराष्ट्रातून होत असून केंद्राच्या माध्यमातून टेस्लाने भारतात आपली सुरुवात करत असल्याची अधिकृत घोषणा केली आहे.

मुंबईतील टेस्लाचे सेंटर केवळ एक्सपिरियन्स सेंटर न राहता, डिलिव्हरी लोकेशन, लॉजिस्टिक सेंटर आणि सर्व्हिसिंग युनिट देखील येथे सुरू करण्यात आले आहे. टेस्लाच्या कार्सचे बुकिंगही याठिकाणी सुरू झाले आहे. टेस्लाचे जगप्रसिद्ध मॉडेल वाय भारतात लाँच करण्यात आले असून, या कारला १५ मिनिटांत चार्ज करता येते आणि ती एकदा चार्ज केल्यानंतर ६०० किमी धावू शकते. ही कार शून्य प्रदूषण करणारी असून, तिचे सेफ्टी फीचर्स जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानले जातात, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहने प्रोत्साहनासाठी अत्यंत डायनॅमिक पॉलिसी राबवली आहे. यामध्ये चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, कर सवलती व मॅन्युफॅक्चरिंगसाठी विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. येत्या काळात महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उद्योगात देशात आघाडीवर असेल. तसेच मुंबईनंतर भारतातील आणखी दोन शहरांमध्ये सेवा विस्तारित केली जाणार असून, मुंबईत चार मोठे चार्जिंग हब आणि ३२ चार्जिंग स्टेशन उभारली जात आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# लायसन्स विचारल्यानं बाप लेकाची पोलिसांना मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वसई :** वाहतूक पोलिसांना भर रस्त्यात खाली पाडून लाथाबुक्यांनी बापलेकाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना नालासोपारा परिसरात घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. पोलिसांना मारहाण करत असताना स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत बापलेकाला थांबवले. भर रस्त्यात दोन वाहतूक पोलिसांना केलेल्या या मारहाणीचा व्हिडिओ नागरिकांच्या मोबाईल मध्ये कैद झाला आहे.



नालासोपारा पूर्वेकडील नागीनदास पाडा सीतारा बेकारीच्या समोरील परिसरात पोलीस हवालदार हनुमंत सांगळे आणि पोलीस कॉन्स्टेबल शेषनारायण आठरे हे दोघे वाहतूक पोलीस वाहने व वाहन चालक, कागदपत्रांची तपासणी करत होते. तपासणी करणाऱ्या पोलिसांनी एका दुचाकीस्वार मुलाला पोलिसांनी अडवले. त्याच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स व गाडीच्या कागदपत्रांसाठी विचारणा केली. सदर मुलगा हा ड्रायव्हिंग लायसन्स शिवाय गाडी चालवत असल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासणी आढळून आले.

पान १ वरून

## शुभांशू शुक्ला पृथ्वीवर सुखरूप परतले

पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. यावेळी ५.७ किलोमीटर उंचीवर ड्रोग पॅराशूट्स आणि २ किलोमीटरवर मुख्य पॅराशूट्स यशस्वीपणे उघडले, ज्यामुळं यान सॅन डिएगोच्या किनाऱ्यावर सुरक्षितपणे उतरलं. नंतर अंतराळविरांना विशेष जहाजाद्वारे किनाऱ्यावर आणले गेलं. आता शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी सात दिवसांचा पुनर्वसन कार्यक्रम पूर्ण करावा लागेल. या मोहिमेमुळं शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय आणि अंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय ठरले आहेत. त्यांनी राकेश शर्मा यांच्या सात दिवसांच्या अंतराळ मोहिमेचा विक्रम मोडत सर्वाधिक काळ अंतराळात घालवला आहे.

## विधानसभेत देसाई वि. सरदेसाई

त्यांच्या वतीनं शंभूराज देसाई उत्तर देत होते. त्यांनी उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळाचा उल्लेख करताच शिवसेना उबाठाचे आमदार आक्रमक झाले.

'तुम्ही किती वेळ पत्र-पत्र खेळत बसणार? मला कालमर्यादा सांगा. किती महिन्यात हा प्रश्न मार्गी लागेल याची माहिती द्या. २०१७ पासून या विषयावर लक्षवेधी लागत आहेत. आजही हेच उत्तर मिळालं की आम्ही पत्र देऊ, आम्ही बैठक घेऊ. त्यावेळी जे मुख्यमंत्री होते, तेच आताही आहेत. त्यांना प्रश्नाची माहिती आहे. त्यामुळे मला किती कालावधीत हा प्रश्न मार्गी लागेल ते सांगा. केंद्राकडून जमिनीचं हस्तांतरण कधी होईल याबद्दलचा निश्चित कालावधी सांगा,' असं शिवसेना उबाठाचे आमदार वरुण सरदेसाई म्हणाले.

सरदेसाईंनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला मंत्री शंभूराज देसाई यांनी उत्तर दिलं. त्यावेळी त्यांनी ठाकरेंच्या कार्यकाळाचा उल्लेख केला. 'मला या प्रश्नावर अधिक खोलात जायचं नव्हतं. पण २०१९ ते २०२२ या प्रश्नाचा एकदाही पाठपुरावा तत्कालीन राज्य सरकारनं केंद्र सरकारकडे केला नाही. शिंदे सरकार आल्यावर चारवेळा पत्रव्यवहार करण्यात आला. मी पाठपुरावा करणाऱ्यांची नावं घेतली नाहीत. मग तुम्हाला मिरच्या का झोंबल्या?', असा सवाल देसाईंनी विचारला. आमची लायकी काढू नका, असंही यावेळी देसाईंनी सरदेसाईंना सुनावलं. त्यामुळे विधानसभेतील वातावरण तापलेलं पाहायला मिळाला.

## गणेशोत्सवासाठी कोकणात ५००० जादा बसेस

होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना, गणपती बाप्पा, कोकणचा चाकरमानी व एसटी यांचे एक अतूट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणा-या चाकरमान्यांच्या सेवेसाठी नफा-तोट्याचा विचार न करता एसटी धावत असते. यंदा सुमारे ५००० जादा गाड्या कोकणातील रस्त्यावर धावतील. सदर बसेस आरक्षणासाठी public.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या टरफळउ MSRTC Bus Reservation ॲपव्दारे, उपलब्ध होणार आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी देखील एसटी महामंडळाने ५२०० जादा बसेस सोडल्या होत्या. त्याला भाविक-प्रवाशांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे गणपती उत्सवासाठी देखील एसटीने तब्बल ५००० जादा बसेस उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले आहे. जादा बसेसमध्ये व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणासाठी अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जाणार आहे. गट आरक्षण २२ जुलैपासून सुरू होत आहे.

## निवृत्त विंग कमांडरच्या बंगल्यावर दरोडा

दरोडा पडू शकतो, तर सामान्य नागरिक किती सुरक्षित आहेत?" असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेमुळे पुण्यातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. वानवडीसारख्या उच्चभ्रू परिसरात द दरोड्याची घटना घडणे हे पोलिसांच्या गस्त आणि सुरक्षाव्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करते. स्थानिक नागरिकांनी रात्रीच्या गस्तीत वाढ आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे.

# शिक्षकच झाले भक्षक, विद्यार्थिनीवर अत्याचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर अनेक वेळा बलात्कार करून तिला ब्लॅकमेल केल्याप्रकरणी दोन शिक्षक आणि त्यांच्या एका मित्राला अटक करण्यात आली आहे. त्यांनी नोट्सच्या निमित्तानं विद्यार्थीनीशी जवळीक साधली. त्यानंतर तिच्याशी दुष्कर्म केले. आयटी शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या बंगळुरुमध्ये ही घटना घडली आहे.

नरेंद्र (भौतिकशास्त्र विषयाचा प्राध्यापक), संदीप (जीवशास्त्र विषयाचा प्राध्यापक) आणि त्यांचा मित्र अनुप हे शहरातील एका खासगी महाविद्यालयात काम करतात, जिथे पीडित विद्यार्थिनी शिकत होती. पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीनुसार, नरेंद्रने सुरुवातीला शैक्षणिक नोट्स देण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनीशी संपर्क साधला. सतत मेसेज करून तिच्याशी मैत्री वाढवली. त्यानंतर त्याने तिला बंगळूरुमधील अनुपच्या खोलीवर बोलावले, जिथे त्याने तिच्यावर बलात्कार केला आणि कोणालाही काही सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली.

काही दिवसांनंतर, संदीपनेही त्या विद्यार्थिनीसोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध केल्यावर, त्याने तिला ब्लॅकमेल केले. नरेंद्रसोबतचे तिचे फोटो आणि व्हिडिओ आपल्याकडे असल्याचा दावा करत त्याने तिला धमकावले. त्यानेही अनुपच्या घरी तिच्यावर बलात्कार केल्याची माहिती पोलिसांनी गिली. त्यानंतर अनुपने विद्यार्थिनीला आपल्या खोलीत प्रवेश करतानाचे सीसीटीव्ही फुटेज दाखवून धमकावले आणि नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पीडित विद्यार्थिनीने बंगळूरुला भेटायला आलेल्या तिच्या पालकांना सर्व हकिकत सांगितली. कुटुंबीयांनी कर्नाटक राज्य महिला आयोगाकडे संपर्क साधला आणि त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. दोन्ही शिक्षक आणि अनुप यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

## शरद पवारांनी भाकरी फिरवली...

प्रदेशाध्यक्षपदासाठी शशिकांत शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवल्यानंतर हा प्रस्ताव एकमतानं मंजूर करण्यात आला. त्यानंतर शरद पवार यांनी पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून शशिकांत शिंदे यांच्या नावाची घोषणा केली.

काही दिवसापूर्वी एका कार्यक्रमात जयंत पाटील यांनी आपल्याला या पदावरून मुक्त करावं आणि नव्या लोकांना संधी द्यावी, अशी जाहीर मागणी केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची चर्चा सुरू झाली होती. तसंच त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या वावड्या उठल्या होत्या. दरम्यान, पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा निर्णय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत होणार असल्यानं आजच्या बैठकीकडे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचं लक्ष लागलं होतं. याशिवाय, विधानसभा निवडणुकीतील अत्यल्प यशानंतर पक्षाच्या कार्यकारिणीत बदल करावा, अशी मागणी सुरू झाली होती.

## मुलांच्या यशाला 'मातृत्त्वाची किनार'...!

पदवी परीक्षेत ६२.५८ टक्के गुण मिळवत आपलं स्वप्न प्रत्यक्षात आणलं. शिक्षणाची सुरुवात दहावीपासून करणाऱ्या शकुंतलाताईंनी अवघ्या काही वर्षांत पदवी मिळवली, तेही कुटुंब सांभाळत, आणि मुलांच्या बरोबरीने. आज त्या स्वतःच्या यशाचा आनंद लुटत आहेत, आणि इतर महिलांसाठी विशेषतः शिक्षण अर्धवट राहिलेल्या गृहिणींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

# कोकण, रायगडला पावसानं झोडपलं

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. कशेडी घाटात जुन्या महामार्गावर भोगाव हद्दीत खचलेल्या रस्त्यावर दरड कोसळली आहे. येथे भला मोठा दगड रस्त्यावर आला आहे. तसेच रायगडमधील कोलाड- आंबेवाडी नाक्यावरील रस्त्यावर पाणी साचले आहे. मुंबई- गोवा महामार्गावर सुरू असलेला गटार लाईन सर्व्हिस रस्ता आणि मेन चौकातील उड्डाण पुलाच्या अर्धवट कामांमुळे पाणी साचले आहे. यामुळे या ठिकाणी मंगळवारी (दि.१५ जुलै) वाहतूक कोंडी निर्माण झाली.



पनवेलच्या जवळ पळसपे फाटा येथेही वाहतूक कोंडी दिसून आली.

मुंबई- गोवा महामार्गावरील कशेडी घाटत सन २००५ पासून दरड कोसळणे सुरुच आहे. या ठिकाणी चौपदरीकरणात नव्याने झालेल्या महामार्गावर तर कधी जुन्या महामार्गावर दरड कोसळत आहे. यामुळे वाहतूक ठप्प होताना दिसते. २००५ मध्ये कशेडी घाटातील जुन्या मार्गावर भोगाव हद्दीत सुमारे ९० ते १०५ फूट लांब आणि तीन ते चार फूट खोल खचलेल्या

# हिंदू विवाह कायद्याचा वापर लग्न टिकवण्यासाठी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** विवाह हा केवळ सामाजिक करार नसून दोन आत्म्यांचा आध्यात्मिक संगम आहे. मात्र, सध्या क्षुल्लक कारणांवरून वैवाहिक वाद वाढत आहेत. घरगुती हिंसाचार कायदा, हिंदू विवाह कायद्यातील तरतुदी या वैवाहिक संबंध सुधारण्यासाठी आहेत. मात्र, या कायद्यांचा गैरवापरच अधिक होत आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणाचा निर्णय देताना नोंदवले.

नागपूर येथील बेलतरोडी पोलीस ठाण्यात डिसेंबर २०२३ मध्ये एका विवाहित महिलेने पती, त्याच्या बहिणी तसेच मावशीविरोधात तक्रार दिली व हुंडा प्रतिबंधक कायदा, घरगुती हिंसाचारातील तरतुदींच्या आधारावार गंभीर आरोप केले. या तक्रारीनुसार, विवाहानंतर तिचा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ करण्यात आला तसेच ५ एकर जमीन व २ बीएचके फ्लॅटची मागणीही करण्यात आली.

**ग्रामपंचायत गोसासी ता.खेड, जि.पुणे**

**निविदा नोटीस**

उपरोक्त विषयान्वये मौजे गोसासी ता.खेड जि.पुणे येथे पंप हाऊसचे उर्वरित काम करावयाचे असून, त्यासाठी दिनांक १६/७/२०२५ ते २५/०७/२०२५ या कालावधीत सीलबंद निविदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

| कामाचे नाव | रक्कम | ठेकेदाराचा प्रवर्ग | लेखाशीर्ष | ईसारा | कोरी निविदा रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| मौजे गोसासी येथे उर्वरित पंप हाऊसचे उर्वरित काम करणे. | १४८८४४ | सुशिक्षित बेरोजगार राखीव | १५ वा वित्त आयोग | सूट | ५०० | ३ महिने |

सही
सरपंच
ग्रामपंचायत गोसासी
ता खेड जि पुणे

शिक्का

सही
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत गोसासी
ता खेड जि पुणे

# दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानच

## सॅटेलाईट फोनच्या विश्लेषणातून पाकी दहशतवाद्यांचे कनेक्शन समोर





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. हा हल्ला कोणी घडवून आणला? याची माहिती आता समोर आली आहे. हा हल्ला पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा यांनी मिळून घडवून आला. या हल्ल्याचा कट पाकिस्तानमधील राजकीय आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या निर्देशांवरून रचण्यात आला आणि दुसरे तिसरे कोणी नसून केवळ पाकिस्तानी दहशतवाद्यांनीच तो घडवून आणल्याचे सुरक्षा यंत्रणेतील सूत्रांनी म्हटले आहे.

सुरक्षा सूत्रांच्या म्हणण्यानुसार, हा हल्ला २६/११ च्या मुंबई हल्ल्यासारखाच लष्कर-ए-तैयबा आणि आयएसआयचा संयुक्त कट होता. आयएसआयने पाकिस्तान स्थित एलईटीचा कमांडर साजिद जट्टला पहलगामच्या बैसरनमधील हल्ल्यासाठी केवळ परदेशी दहशतवाद्यांना तैनात करण्याचे विशिष्ट निर्देश दिले होते. या हल्ल्याच्या कट उघड होऊ नये म्हणून कोणत्याही काश्मिरी दहशतवाद्याला या कटात सहभागी करुन घेतले नाही. त्याऐवजी, जम्मू-काश्मीरमध्ये कार्यरत असलेल्या लष्कर-ए-तैयबाच्या परदेशी दहशतवाद्यांना हे हत्याकांड घडवून आणण्यास सांगण्यात आले पहलगाम हल्ला सुलेमानच्या नेतृत्त्वाखाली घडवून आणण्यात आला. असा संशय आहे की तो पाकिस्तानच्या स्पेशल फोर्सेसचा माजी संशयित कमांडो होता. त्याने २०२२ मध्ये नियंत्रण रेषा ओलांडून जम्मू खोऱ्यात एम-४ शस्त्रासह प्रवेश करण्यापूर्वी पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील एलईटीच्या मुरीदके तळावर प्रशिक्षण घेतले होते. त्याच्यासोबत आणखी दोन पाकिस्तानी दहशतवादी होते.

सॅटेलाईट फोन विश्लेषणातून असेही स्पष्ट झाले आहे की १५ एप्रिल रोजी सुलेमानचे लोकेशन त्राल जंगलात होते. यावरून असे दिसून येते की त्याचा ठावठिकाणा हल्ल्याच्या घटनेपूर्वी एक आठवडा आधी बैसरनजवळच होता.

एप्रिल २०२३ मध्ये पूंछ येथे लष्कराच्या वाहनांवर झालेल्या हल्ल्यातही सुलेमानचा सहभाग होता. या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले होते. दरम्यान, पहलगाममध्ये २६ नागरिकांची हत्या करणाऱ्या इतर दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांची ओळख उद्याप उघड झालेली नाही. पाकिस्तान स्थित दहशतवादी हाशिम मुसा आणि अली भाई यांचा या हल्ल्यात सहभाग असल्याचा संशय यापूर्वी जम्मू-काश्मीर पोलिसांनी व्यक्त केला होता. पण आतापर्यंतच्या तपासात केवळ सुलेमानच हल्लेखोर असल्याचे असल्याचे सिद्ध झाले आहे. स्थानिक काश्मिरी दहशतवादी आदिल हुसेन ठोकेर हा हल्ल्याचा सूत्रधार असल्याची कोणतीही पुष्टी झालेली नाही.

## जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात भीषण अपघात

# प्रवाशांनी भरलेला टेम्पो दरीत कोसळला, ५ ठार, १७ जण गंभीर जखमी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील डोंगराळ डोडा जिल्ह्यात आज (दि. १५) सकाळी प्रवाशांना घेऊन जाणारा एक टेम्पो ट्रॅव्हलर दरीत कोसळला. यात एका महिलेसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले आहेत. जखमींमधील काहींची प्रकृती गंभीर आहे.

आज सकाळी डोडा-बठार रस्त्यावरील पोंडा परिसरात टेम्पो ट्रॅव्हलर रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळला. या अपघातात वाहन पूर्णपणे चक्काचूर झाले. घटनेनंतर तात्काळ सुरक्षा कर्मचारी आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी जखमींना रुग्णालयात हलवण्यासाठी बचावकार्य सुरू केले. त्यांच्यासोबत नागरी प्रशासनाचे कर्मचारीही बचावकार्यात सामील झाले. अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता, तर १७ जण जखमी झाले होते.

जखमींना डोडा येथील शासकीय वैद्यकीय रूग्णालयात हलवण्यात आले, उपचारादरम्यान आणखी दोघांचा मृत्यू झाला. आतापर्यंत मृतांचा आकडा ५ वर पोहोचला आहे, अशी माहिती डोडाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ओमर कुमार यांनी दिली. मृतांमध्ये एका महिलेचा समावेश असल्याचेही त्यांनी सांगितले.

"काही जखमींची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. गंभीर जखमींपैकी एकाला पुढील उपचारांसाठी जम्मू येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींना सर्वतोपरी मदत आणि वैद्यकीय उपचार पुरवले जात आहेत. जिल्हाधिकारी स्वतः या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत," असे केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी 'एक्स' वरील पोस्टमध्ये सांगितले.

# यमनमध्ये भारतीय नर्सची फाशी टळली?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** येमनच्या तुरुंगात बंद असलेल्या भारतीय नर्स निमिषा प्रिया हिची फाशी तूर्तास टळली आहे. 'ब्लड मनी' वरून पीडित कुटुंबासोबत अंतिम तोडगा न निघाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. तुरुंग प्रशासनानेच ही माहिती दिली असून, यामुळे निमिषाच्या कुटुंबीयांना आणि तिला वाचवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

निमिषा प्रियावर तिचा व्यावसायिक भागीदार तलाल अब्दो महदी याच्या हत्येचा आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारताचे ग्रँड मुफ्ती अबुबकर अहमद हे पीडित तलालच्या कुटुंबाशी बोलणी करत आहेत. चर्चेची पहिली फेरी सकारात्मक झाल्याने पुढेही तोडगा निघण्याची आशा निर्माण झाली आहे. याच कारणामुळे येमनच्या न्याय विभागाने फाशीची शिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

२००८ मध्ये केरळमधून येमनला गेलेल्या निमिषावर २०१७ मध्ये तलालच्या हत्येचा आरोप ठेवण्यात आला होता. तेव्हापासून ती तुरुंगात आहे. यावर्षी तिला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. निमिषाला वाचवण्यासाठी 'निमिषा प्रिया इंटरनॅशनल कौन्सिल' नावाची संस्था प्रयत्न करत आहे. येमनमधील शरिया कायद्यानुसार, पीडित कुटुंबाने पैसे (ब्लड मनी) स्वीकारले, तर ते दोषीला माफ करू शकतात.

याच कायद्याच्या आधारे निमिषाला वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. निमिषाला वाचवण्यासाठी केंद्र सरकार, ग्रँड मुफ्ती अबुबकर अहमद आणि निमिषाचे कुटुंबीय सर्वजण प्रयत्न करत आहेत. तिची आई तर बऱ्याच काळापासून येमनमध्येच आहे.

येमनमध्ये भारताचे दूतावास नसतानाही, केंद्र सरकारचे अधिकारी मुत्सद्देगिरीने सतत संपर्कात आहेत. याच प्रयत्नांमुळे फाशीच्या ऐनवेळी निमिषाला दिलासा मिळाला आहे. निमिषा प्रियाची फाशीची तारीख फक्त पुढे ढकलण्यात आली आहे, फाशी रद्द झालेली नाही. याचा अर्थ धोका अजूनही कायम आहे.

निमिषाच्या कुटुंबाने तलालच्या कुटुंबाला १ मिलियन डॉलर (सुमारे ८.५ कोटी रुपये) देण्याची तयारी दाखवली आहे. मात्र, 'ब्लड मनी' स्वीकारायचा की नाही, याचा अंतिम निर्णय तलालच्या कुटुंबालाच घ्यायचा आहे. त्यांनी पैसे स्वीकारण्यास नकार दिला, तर निमिषाला वाचवण्यासाठी दुसरा कोणताही पर्याय उरणार नाही.

# न्यायालयात राहुल गांधींची शरणागती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** भारतीय सैनिकांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना लखनौ कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने त्याला २० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या वक्तव्यावरून दाखल करण्यात आलेल्या या खटल्याच्या पहिल्या पाच सुनावणीत राहुल गांधी हजर राहिले नाहीत. मंगळवारी त्यांनी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी आलोक वर्मा यांच्यासमोर शरणागती पत्करली आणि जामीन अर्ज दाखल केला.

राहुल गांधी यावेळी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी आलोक वर्मा यांच्यासमोर प्रत्यक्ष हजर झाले. मे महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावली होती, त्यानंतर ते हजर झाले होते. फेब्रुवारी २०२५ मध्ये लखनौच्या एमपी-एमएलए कोर्टाने दिलेला मानहानीचा खटला आणि समन्सच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका त्यांनी दाखल केली होती. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनचे निवृत्त संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला होता, त्यांनी म्हटले होते की, राहुल गांधी यांनी १६ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय सैन्याचा अपमान केला होता, त्यांनी ९ डिसेंबर २०२२ रोजी अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर भारतीय लष्कर आणि चिनी सैन्यात झालेल्या संघर्षाचा उल्लेख करताना प्रसारमाध्यमे आणि जनतेला संबोधित केले होते. लोक भारत जोडो यात्रेबद्दल विचारतील पण चिनी सैनिकांनी आमच्या सैनिकांना मारहाण केल्याबद्दल एकदाही विचारणार नाहीत. चिनी सैनिकांनी भारतीय सैनिकांना केलेल्या मारहाणीबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यामुळे त्यांच्या भावना दुखावल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. राहुल गांधीयांच्या या वक्तव्यानंतर भारतीय लष्करानेही अधिकृत निवेदन जारी केले होते. चिनी सैन्य भारतीय सीमेत घुसखोरी करत होते, त्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले. ज्यानंतर चिनी सैन्य मागे हटले.



**पॅरिस, फ्रान्स** फ्रान्समधील पॅरिसमधील चॅम्प्स-एलिसीज अव्हेन्यूवर वार्षिक बॅस्टिल डे लष्करी समारंभानिमित्त सैनिकी कवायतीचे टिपलेले छायाचित्र.

# यूपीत क्यूआर कोड लावण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** यूपी आणि उत्तराखंडमधील कांवड यात्रा मार्गावरील दुकाने आणि रेस्टॉरंट चालकांना क्यूआर कोड लावण्याचे आणि नाव लिहिण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मंगळवारी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले तेव्हा न्यायालयाने उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथ सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. याची गरज काय, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जुलै रोजी होणार आहे.

न्यायमूर्ती एम.एम. न्यायमूर्ती अपूर्वानंद झा आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला नोटीस बजावली असून शिक्षणतज्ज्ञ अपूर्वानंद झा आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी ठेवली आहे. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी भाजपशासित उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांनी कांवड यात्रा मार्गावरील भोजनालयांना त्यांच्या मालक, कर्मचाऱ्यांची नावे आणि इतर तपशील प्रदर्शित करण्यास सांगितले होते.

उत्तर प्रदेश प्रशासनाने २५ जून रोजी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकाचा हवाला देत झा म्हणाले की, "नवीन उपाययोजनांमध्ये कंवर मार्गावरील सर्व भोजनालयांना क्यूआर कोड प्रदर्शित करणे बंधनकारक आहे ज्यामुळे मालकांचे नाव आणि ओळख उघड होईल." त्यामुळे या न्यायालयाने यापूर्वी ज्या भेदभावपूर्ण पद्धतीवर बंदी घातली होती, त्याच पद्धतीने ओळख पटवण्याची चर्चा सुरू आहे.


याचिकेत म्हटले आहे की, राज्य सरकारने दुकानमालकांना कायदेशीर परवाना आवश्यकतेनुसार आपली धार्मिक आणि जातीय ओळख उघड करण्यास सांगितले आहे, हे दुकान, ढाबा आणि रेस्टॉरंट मालकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. हिंदू दिनदर्शिकेनुसार श्रावण महिन्यात शिवलिंगाचा जलाभिषेक करण्यासाठी मोठ्या संख्येने कांवरिया गंगा आणि इतर नद्यांमधून पाणी आणतात. या महिन्यात अनेक भाविक मांसाहार टाळतात. अनेक जण कांदा-लसूण असलेले अन्नही खात नाहीत. पश्चिम उत्तर प्रदेश वगळता राज्याच्या इतर भागात आणि इतर काही राज्यांमध्येही कांवड यात्रेचा कल वाढला आहे.

दुकानदारांची ओळख उघड होऊ नये, यासाठी गेल्या वर्षी हॉटेल तसेच ढाबा मालकांनी आपल्या नावाची पाटी दर्शनी भागात लावण्यास सांगितले होते. त्यासाठीचा आदेश जारी केल्यानंतर, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले. त्यावेळी न्यायालयाने त्याला प्रतिबंध केला होता.

## व्यसनाधीन तरुणाने वडिलांनी केली गोळ्या झाडून हत्या

**शाहजहांपूर (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर जिल्ह्यात मुलाला घाबरवण्यासाठी बंदूक काढणाऱ्या वडिलांशी झालेल्या झटापटीत एका ३२ वर्षीय व्यसनाधीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी घडली. तिल्हार शहरात राहणारे निवृत्त लेखापाल ओंकार गंगवार (वय ६७) यांचा मुलगा हर्षवर्धन गंगवार (वय ३२) याला अंमली पदार्थांचे व्यसन होते. अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण) दीक्षा भवरे यांनी सांगितले की, सोमवारी रात्री त्याचे वडिलांशी भांडण झाले आणि त्यानंतर हर्षवर्धन हातोड्याने त्याच्या मागे धावला. त्यानंतर वडिलांनी रागाच्या भरात बंदूक बाहेर काढली आणि दोघांमध्ये झालेल्या हाणामारीत एक गोळी झाडण्यात आली जी हर्षवर्धनला लागली, अशी माहिती एएसपी (ग्रामीण) यांनी दिली. त्याला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## केजरीवाल यांनी घेतली झारखंडच्या मुख्यमंत्र्यांची भेट



**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची सर गंगाराम रुग्णालयात जाऊन भेट घेतली आणि रुग्णालयात उपचार घेत असलेले वडील शिबू सोरेन यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. झामुमोचे सर्वेसर्वा शिबू सोरेन (८१) यांच्यावर गेल्या तीन दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मी दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात गेलो आणि झारखंडचे मुख्यमंत्री आणि मित्र हेमंत सोरेन यांची भेट घेऊन त्यांचे वडील आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. ते लवकर बरे होऊन लवकर घरी परतावेत, अशी मी देवाकडे प्रार्थना करतो, असे केजरीवाल यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

## पोलिसांनी उधळला अपहरणाचा कट




**बेंगळुरू :** मुलाच्या अपहरणाची धमकी देऊन शहरातील एका बसचालकाकडून एक कोटी रुपये उकळण्याचा कट उधळून लावल्याचा दावा बेंगळुरू पोलिसांनी मंगळवारी केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिते सोबत आर्थिक वाद असलेल्या स्थानिक व्यापाऱ्याने ही योजना राबविण्यासाठी दिल्लीहून तीन जणांना कामावर घेतले होते. उत्तर भारतातील एका कुख्यात गुंडाच्या नावाने खंडणीची धमकी देण्याचा आरोपींचा हेतू होता. या प्रकरणी मास्टरमाइंड आणि त्याच्या तीन साथीदारांना अटक करण्यात आली असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील मेरठचा रहिवासी आहे.

## ई-कॉमर्स कंपन्यांवर छाप्यात अप्रमाणित वस्तू जप्त

**अमरावती :** भारतीय मानक ब्युरोने (बीआयएस) आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील फ्लिपकार्ट, ई-कार्ट आणि मीशो या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सकडून अप्रमाणित ग्राहक उत्पादनांची मोठी खेप जप्त केली आहे. गुणवत्ता नियंत्रण आदेश (क्यूसीओ) च्या तरतुदींचे उल्लंघन करणार्या प्रमाणित नसलेल्या आणि असुरक्षित उत्पादनांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी बीआयएस देशव्यापी अंमलबजावणी मोहीम राबवित आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून बीआयएस विजयवाडा शाखेने १४ जुलै रोजी गन्नावरम मंडळातील मुस्ताबाद गावात छापा टाकून तीन प्लॅटफॉर्मला लक्ष्य केले.

## लाचखोरीच्या आरोपाखाली सीबीआयने केली अटक




**नवी दिल्ली :** कोळसा उचलणे आणि वाहतूक करण्यात भ्रष्टाचार केल्याच्या आरोपाखाली सीबीआयने सेंट्रल कोलफिल्ड्स लिमिटेडच्या व्यवस्थापकासह तिघांना अटक केली आहे. झारखंडमधील हजारीबाग येथील एका कोलिअरी प्रकल्प कार्यालयात ६ मार्च रोजी झालेल्या संयुक्त अचानक तपासणीत कोळसा चोरांकडून मोठ्या प्रमाणात लाचखोरी उघडकीस आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. कोळसा उचलण्यासाठी आणि वाहतुकीसाठी विविध कोळसा चोरांकडून अवाजवी फायदा घेतल्याच्या आरोपाखाली सीसीएल गिड्डीचे व्यवस्थापक अयोध्या करमाळी, मुकेश कुमार आणि प्रकाश महली या दोन लिपिकांसह दलाल विजय कुमार सिंह यांना अटक करण्यात आली आहे.

# माऊलींचे जिल्ह्यात संततधार पावसात आगमन

## परतीच्या प्रवासात माऊलींच्या पादुकांना नीरा स्नान, ग्रामस्थांनी केले स्वागत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** आषाढी वारीहून माऊलींचे परतीच्या प्रवासामध्ये पुणे जिल्ह्यातील नीरा येथे मंगळवारी (दि. १५) सकाळी नऊ वाजता संततधार पावसात आगमन झाले. त्यापुर्वी नीरा नदी काठावरील प्रसिद्ध दत्तघाटावर माऊलींच्या पादुकांना माऊली... माऊलीच्या जयघोषात नीरा स्नान घालण्यात आले. दरम्यान, नीरा स्नानानंतर सोहळ्या तील वारक-यांना माऊलींच्या पादुकांचे स्पर्श दर्शन देण्यात आले.

आषाढी एकादशीच्या दर्शनानंतर माऊलींचा पालखी सोहळा पंढरपूरहून आळंदीकडे परतीच्या प्रवासाकडे निघाला आहे. परतीच्या प्रवासात रथा पुढे २७ तर रथामागे काही दिंड्या आहेत. सोमवारी ( दि.१४) पाडेगाव (ता. फलटण) येथील मुक्काम आटोपून मंगळवारी (दि. १५) सकाळी सव्वा आठ वाजता पुणे जिल्ह्यातील नीरा नगरीकडे मार्गस्थ झाला. सकाळी साडे आठ वाजता सोहळा नीरा नदीच्या किनारी दत्तघाटावर पोहोचला. त्यावेळी नीरा नदीच्या पवित्र तीर्थांनी माऊलींच्या पादुकांना पालखी सोहळा मालक राजेंद्र पवार - आरफळकर, पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, आळंदी संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ यांच्या हस्ते स्नान घालण्यात आले. यावेळी सोहळ्यातील भाविकांनी माऊली....माऊलीचा जयघोष केला.

यानंतर माऊलींचा पालखी सोहळा मालकांकडून पादुका रथाकडे येत असताना प्रथेप्रमाणे रथाच्या पुढे दोन ओळी व रथाच्या मागे दोन ओळी वारकऱ्यांनी तयार केल्या होत्या. सोहळा मालकांनी पादुकांचे वारकऱ्यांना दर्शन देणे हा एक अविस्मरणीय क्षण असतो. यावेळी सोहळा मालकांनी प्रथम रथाच्या मागील बाजूच्या उजव्या व डाव्या बाजूकडील दोन्हीं ओळींतील वारक-यांना व नंतर रथापुढील उजव्या व डाव्या बाजूच्या दोन्ही ओळींतील वारकऱ्यांना पादुकांचे स्पर्श दर्शन दिल्याचे पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी सांगितले. नंतर माऊलींचा रथ नीरा नदीवरील ब्रिटीश कालीन पुलावरून पुणे जिल्ह्यातील नीरा नगरीकडे मार्गस्थ झाला. मंगळवारी ( दि.१५) सकाळी नऊ वाजता पालखी सोहळ्याचे संततधार पावसात पुणे जिल्हा हद्दीत नीरा येथे आगमन झाले.यावेळी नीरेतील ग्रामस्थांनी माऊलींचे उत्साहात स्वागत केले. त्यानंतर सोहळा दुपारच्या विसाव्या करिता नीरा येथील विठ्ठल मंदिरात विसावला. यावेळी असंख्य भाविकांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले.



यावेळी सोमेश्वर सह.साखर कारखान्याच्या वतीने सोहळ्यातील वारक-यांना अन्नदान करण्यात आले. सोमेश्वरचे चेअरमन पुरूषोत्तम जगताप, संचालक शैलेश रासकर, जितेंद्र निगडे यांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी विठ्ठल रखुमाई ट्रस्टचे अध्यक्ष मदनराव चव्हाण यांनी ट्रस्टच्या वतीने पालखी सोहळा मालक, सोहळा प्रमुख, आळंदी संस्थानचे प्रमुख विश्वस्त, तसेच सोमेश्वरचे चेअरमन व संचालकांचा सत्कार केला. दुपारी दोन वाजता सोहळा वाल्हे मुक्कामी मार्गस्थ झाला. दरम्यान, मंगळवारी ( दि.१५) सकाळी सात वाजल्यापासून सकाळी दहा वाजेपर्यंत नीरा व परिसरात पाऊस सुरू होता. अशातच माऊलींच्या पालखी सोहळ्याचे नीरा नगरीत आगमन झाले.

## स्व-संरक्षण ही काळाची गरज - संतोष जगताप



**सासवड :** एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान, सासवड व चॅम्पियन्स मार्शल आर्ट अँड स्पोर्ट्स अकॅडमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने रविवारी, कुंजीरवाडा, सासवड येथे विद्यार्थ्यांची क्यू बेल्ट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातील ३५ विद्यार्थी बेस्ट खेळाडू या पुरस्काराचे मानकरी ठरले. या पुरस्कार वितरण सोहळ्यात स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान, सासवड चे अध्यक्ष संतोष जगताप यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडे स्व-संरक्षण करण्याचे कौशल्य असणे आवश्यक असून विशेषतः मुलींनी ते आत्मसात करणे गरजेचे आहे, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. या कराटे खेळाची सुरुवात सासवड येथे चार वर्षापूर्वी स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या सहकार्यातून व चॅम्पियन्स मार्शल आर्ट अँड स्पोर्ट्स अकॅडमी, पुणे यांच्या माध्यमातून झाली आहे. आज असंख्य विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे.

## कडेपठार पतसंस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना गणवेश



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील दुष्काळी पट्ट्यातील पांडेश्वर गावातील गरीब गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी यशवंत विद्यालय भागशाळा पांडेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना कडेपठार ग्रामीण बिगरशेती सहक़ारी पतसंस्था आणि तसेच कावेरी कलेक्शनच्या वतीने रामशेठ दोशी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय गणवेशवाटप करण्यात आले. यावेळी उद्योजक रामदास जोशी, निहाल दोशी उपसरपंच किशोर लवांडे, माजी सरपंच प्रताप रासकर, सदस्य विजय नाळे, तंटामुक्तीचे मुगुट शेंडगे, मोहिनी कापरे, शोभा भोसले, कोमल थिकोळे, पल्लवी चांदगुडे, सागर शितोळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक बाळासो भालेराव यांनी केले, सूत्रसंचालन रणजित खारतोडे यांनी तर रमेश खोमणे यांनी आभार मानले

## गणित अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी कल्याण कडेकर

**जेजुरी :** महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ संलग्न पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी कल्याण कडेकर यांची निवड करण्यात आली. सभेचे अध्यक्ष महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाचे विद्या समिती प्रमुख देविदास शिंदे यांनी ही नूतन कार्यकारिणी जाहीर केली. पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाची २०२५-२७ या त्रैवार्षिक कालखंडासाठीची नूतन कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्ष कल्याण कडेकर, सचिव सचिन धनवट, कार्याध्यक्ष संदीप लोणकर, उपाध्यक्ष नाना घळके, जितेंद्र त्रिवेद, राजेंद्र पाटेकर, सहसचिव मारुती मांढरे,संजय गवळी,पांडुरंग आटोळे कोषाध्यक्ष योगेश माळशिरसकर परीक्षा समिती प्रमुख विजय फापाळे सचिव: लक्ष्मीकांत मुंढे सहसचिव , संतोष आगरकर विद्या समिती प्रमुख प्रशांत शेटे, सचिव रत्नाकर भिसे, सहसचिव अलका पाटेकर, प्रसिद्धीप्रमुख अतुल क्षीरसागर, रणजीत खारतोडे सल्लागार प्रदीप आगाशे, नंदकुमार सागर, भारत काळे, नाना डुकरे. गणित

## वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** पुणे नगर महामार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी विविध प्रकारचे उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कारेगाव च्या सरपंच वृषाली गवारे, रांजणगाव गणपतीचे उपसरपंच श्रीकांत पाटील पाचूदकर, यशवंत पाचंगे, एडवोकेट तुषार कर्डीले, संदीप गवारे, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, रांजणगाव इंडस्ट्रियल असोसिएशनचे विक्रम सिंग, एमआयडीसीचे उपकार्यकारी अभियंता अशोक मगर, एम एस आय डी सी चे कार्यकारी अभियंता नाझिर नायकवाडी, गौतम पटेल उपस्थित होते.

यामध्ये प्रामुख्याने पुणे नगर महामार्गावरील अतिक्रमणे हटवण्यात येणार आहेत, तसेच सदर अतिक्रमण हटवल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला साईड पट्ट्यांची कामे करण्यात येणार असल्याचे अधिकारी यांनी सांगितले. सदर अतिक्रमण काढल्यानंतर या ठिकाणी होणारी वाहतूक कुंडी टाळण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे खंडाळा माथा, सणसवाडी येथील मजूर आडा, रांजणगावच्या महागणपती मंदिरा जवळील दोन्ही बाजूचे तीव्र उतार व फलके मळा या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने बसवण्यात आलेले गतिरोधक काढण्याची मागणी यावेळी पदाधिकाऱ्यांनी व कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली. ग्रामस्थांच्या व कंपनी पदाधिकाऱ्यांच्या या मागणीलाही सकारात्मक प्रतिसाद दिला. वाहन कोंडी टाळण्यासाठी अनेक कंपन्यांनी कामाच्या शिफ्टच्या वेळेत बदल केले असल्याचे रांजणगाव इंडस्ट्रीयल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे कंपन्यांचा माल ने-आण करणाऱ्या वाहनांना औद्योगिक वसाहतीमध्ये वाहनतळ उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी यावेळी करण्यात आली. कंपन्या सुटण्याच्या दरम्यान कारेगाव रांजणगाव येथे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने व रांजणगाव इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने वाहतूक पोलिसांना मदतनीस माणसं उपलब्ध करून देण्यात येतील असे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी व असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले. रांजणगाव येथील बस स्टँडच्या समोरील एमआयडीसी कडे जाणारा बस थांबा गावातील पेट्रोल पंपाच्या समोर करण्यात यावा अशी सूचना यावेळी मांडण्यात आली. त्याचप्रमाणे कंपन्यांच्या कामगारांनी आपल्या घरातील कचरा कामाला जात आहे का रस्त्याच्या कडेला न टाकता तो कचरा कचराकुंडी टाकावा असे आवाहन रांजणगावचे उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर यांनी यावेळी केले. पुणे नगर महामार्गावरील बहुप्रतिक्षित अशा तीन मजली रस्त्याचे काम येणाऱ्या वर्षभरात चालू होणार असल्याचे सुतोवाच यावेळी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.



## इंदापूर बाजार समितीत डाळिंबाला उच्चांकी भाव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत या आठवड्यात डाळिंबाची प्रतिकिलो २७५ रुपये इतक्या उच्चांकी भावाने विक्री झाली. पेरूदेखील प्रति किलो ५५ रुपयांनी विकला गेल्याची माहिती इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके यांनी दिली.

इंदापूर बाजार समितीचे कामकाज क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे व मोहोळ तालुक्याचे माजी आमदार यशवंत माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. बाजार समितीच्या कामकाजाबाबत सभापती जाधव म्हणाले, बाजार समितीमध्ये कांद्याची प्रतिक्विंटल रु. २२०० पर्यंत विक्री झाली. ड्रॅगन फ्रुट प्रतिकिलो रु. ८१ ने विकले गेले.

बाजार समितीत खरेदीसाठी आंध्र प्रदेश, कलकत्ता, कर्नाटक, तेलंगणा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, झारखंड, छत्तीसगड या राज्यातील खरेदीदार येत आहेत. शेतकऱ्यांना सुविधा देण्यात बाजार समिती अग्रेसर आहे. बाजार समिती मुख्यत: भुसार, डाळिंब, कांदा, मासे (मासळी), पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रुट, फुले या शेतमालासाठी प्रसिद्ध आहे. मुख्य व उपबाजाराच्या ठिकाणी शेतमाल उघड लिलावाने विक्री, चोख वजनमाप व विक्रीनंतर शेतकऱ्यांना हिशेबपट्टी, त्वरित रक्कम अदा केली जाते.

बाजार समितीने शेतमालास चांगला भाव मिळावा या उद्देशाने मुख्य बाजार आवारात धान्य सफाई यंत्र सुविधा उभारली आहे. बाजार समितीने शेतमाल तारण योजनाही सुरू केली आहे. बाजार समितीतील सुविधा, योजना व उपक्रमांचा शेतकरी, व्यापारी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीने केले आहे.

## रांजणगाव श्री महागणपती मंदिरात अथर्वशीर्ष पठण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** संकष्टी चतुर्थी निमित्त पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक करून मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. तसेच संकष्टी चतुर्थी श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट अयोजनाने सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संकष्टी चतुर्थी निमित्त भाविकांसाठी उत्तम प्रकारे जलद दर्शन व्यवस्था, खिचडी प्रसाद, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा देवस्थान ट्रस्ट तर्फे देण्यात आल्या अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वातीताई दत्तात्रय पाचुंदकर पाटील यांनी सांगितले.

संकष्टी चतुर्थी निमित्त दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्ट मुख्यविश्वस्त ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य करण्यात आला. तसेच प्रगतशील शेतकरी श नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने मंदिर गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली. रांजणगाव विविध विकास कार्यकारी सोसायटी चे संचालक .फक्कड धुमाळ यांच्या तर्फे डाळींबाचा महानैवेद्य श्री चरणी अर्पण करण्यात आला. श्री महागणपती भजनी मंडळ, रांजणगाव गणपती यांचा भजनाचा कार्यक्रम झाला.

यावेळी देवस्थानचे विश्वस्त मंडळ मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, अध्यक्षा. स्वातीताई पाचुंदकर पाटील, उपाध्यक्ष . संदिप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव, चेअरमन दत्तात्रय पाचुंदकर पाटील, व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे तसेच देवस्थान कर्मचारी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



रांजणगाव येथील महागणपती मंदिरात संकष्टी चतुर्थी निमित्त अथर्वशीर्ष पठण करताना भाविक.

## हवेली, जुन्नर, इंदापूर, खेडमधील गट-गणांमध्ये फेरबदल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ७३ गट आणि १४६ गणांच्या रचनेचा प्रारूप आराखडा जिल्हा प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आला. हवेली, जुन्नर, इंदापूर, खेड तालुक्यातील गट-गणांमध्ये मोठे फेरबदल झाले आहेत. हवेली तालुक्यात २०१७ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांची संख्या १३ होती, ती आता ६ वर आली आहे. गट-गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध झाल्याने ग्रामीण भागात कोणत्या गटात-गणात कोणते गाव आले आहे, हे स्पष्ट झाले आहे. यामुळे इच्छुकांनी मोर्चेबांधणी करणे सुरू केले आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गट-गण रचनेची अधिसूचना सोमवारी काढून ती जाहीर केली. २०११ ची जनगणना ग्राह्य धरून ही प्रारूप रचना करण्यात आली आहे. १३ तहसील कार्यालये, याबरोबरच पंचायत समिती कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर ती प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारूप गट-गण रचनेवर २१ जुलैपर्यंत नागरिकांना जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती, सूचना नोंदवता येणार आहेत.

या प्रारूप रचनेनुसार जुन्नर, खेड आणि इंदापूर या तीन तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदेचे प्रत्येकी आठ सदस्य असणार आहेत. त्यामुळे ७३ पैकी २४ सदस्य या तीन तालुक्यांमध्ये असणार आहेत. तर सर्वात कमी म्हणजे २ जिल्हा परिषद सदस्य संख्या ही राजगड (वेल्हे) तालुक्यात असणार आहे.

जिल्ह्यात २०१७ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांची संख्या ७५ तर पंचायत समितीच्या सदस्यांची संख्या १५० होती. २०१७ नंतर हवेली आणि मुळशी तालुक्यातील काही गावांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत करण्यात आला. तर उरुळी देवाची-फुरसुंगी या दोन्ही गावांची मिळून स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समित्यांची सदस्य संख्या कमी होण्यावर झाला.

हवेली तालुक्यात २०१७ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांची संख्या १३ होती. आता या तालुक्यात जिल्हा परिषद सदस्य संख्या ६ वर आली आहे. तर जुन्नर, खेड, दौंड, भोर आणि इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषद सदस्य संख्येत एकने वाढ झाली आहे.

## बारामती कृषी विज्ञान केंद्राला पुरस्कार



**बारामती :** मत्स्य व्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत कृषि विज्ञान केंद्र बारामतीने आपल्या प्रक्षेत्रावर मत्स्य बीज निर्मिती केंद्र ,रोहू, कटला,चिलापी, रेड चिलापी,कोंबडा, मरळ या मासेंचे शेततळ्यात मासे पालन, एकात्मिक कोंबडी मत्स्य उत्पादन, बायोफ्लॉक, अक्वा पॉनिक्स, रंगीत मासे संग्रालय,फिश फूड मिल,मोतीपलन, खेकडा पालन,मत्स्य पाणी तपासणी प्रयोगशाळा,पिंजरा पद्धत मासे पालन,हे युनिट उभारणी करून शेतकरी विद्यार्थी यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या उत्पादन वाढीसाठी भरीव कामगिरी केल्याबदल मत्स्य व्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून कृषि महाविद्यालय पुणे येथे शनिवार दिनांक १२ जुलै २०२५ रोजी राष्ट्रीय मत्स्य दिना निमित्ताने कार्यक्रमात उत्कृष्ट कृषि विज्ञान केंद्र पुरस्कार देऊन सन्मानित केले. नितीन पाटील (खासदार राज्यसभा व स्थायी समिती सदस्य राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड हैद्राबाद), गिरीराज अग्निहोत्री (विभागीय संचालक राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ पुणे), डॉ. संजय खरात (सिनेट सदस्य पुणे विद्यापीठ) आणि डॉ. विजय शिकरे (विभागीय उपायुक्त मत्स्य व्यवसाय पुणे) यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदाताई पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे , कृषि विज्ञान केंद्र प्रमुख डॉ.धीरज शिंदे यांनी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन केले

## शिरूर तहसील कार्यालयात तक्रारदारास दमदाटी

**शिरूर :** शिरूर तहसील कार्यालयात एका अपंग व्यक्तीस धमकी देत सार्वजनिक ठिकाणी अपमान केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी टाकळी भिमा येथील राहुल शंकर करपे यांच्याविरुद्ध शिरूर पोलिसांनी अपंग व्यक्तीचे अधिकार अधिनियम या कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अशोक रावसाहेब भोरडे (वय ४८,रा. निमगाव म्हाळुंगी,ता.शिरूर, जि.पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शुक्रवारी (ता.११) सायंकाळी सव्वा सहा ते पावणे सात वाजण्याच्या दरम्यान शिरूर तहसील कार्यालयात झालेल्या वादात प्लॉटिंग व्यवसायिक राहुल करपे यांनी तहसीलदार बाळासो म्हस्के यांच्या उपस्थितीत तहसीदारांचा केबिनमध्ये मोठ्या आवाजात आरडा-ओरडा करत, "कोणी माकड उठून आमच्या प्लॉटिंगची तक्रार करणार? आम्ही आठ-दहा कोटी गुंतवलेत," असे म्हणत अशोक भोरडे यांना धमकी दिली.

## पारगाव येथील रामभक्तांच्या वह्या आयोध्येला रवाना



**पारगाव :** पारगाव (ता.आंबेगाव) येथील रामभक्त भरत कोल्हे यांनी लिहिलेल्या राम नाम जपाच्या वह्या रविवारी (दि.१३) रोजी श्रीराम मंदिर आयोध्या येथे रवाना झाल्या. पारगाव येथील राम भक्त भरत कोल्हे यांनी गेल्या २१ वर्षात वह्यांमध्ये श्रीरामाचा नामजप केला आहे. त्यांनी ४२ वह्यांमध्ये १६ कोटी ६४ लाख ७४९ वेळा राम नाम वह्यांमध्ये लिहिले आहे. या सर्व वह्यांची रविवारी (दि. १३) रोजी सकाळी पारगाव मधील श्रीराम मंदिरात विधीवत पूजा करण्यात आली. शरद सहकारी बँकेचे संचालक दौलतभाई लोखंडे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शैलजाताई ढोबळे, बाजीराव देवडे, मुख्याध्यापक संतोष लबडे, भरत कोल्हे, वैशाली कोल्हे, ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री कोल्हे- लोखंडे, भास्कर कोल्हे यांच्या शुभहस्ते वही पूजन करण्यात आले. त्यानंतर या राम नामा जपाच्या वह्यांची तुला करण्यात आली. राम नामाच्या वह्यांच्या वजना एवढ्या शालोपयोगी वह्या ह्या पारगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना वाटण्यात आल्या. या वह्या आयोध्यातील श्रीराम व मंदिरात न्यासांकडे सुपूर्द करण्यात येणार असल्याचे रामभक्त भरत कोल्हे यांनी सांगितले. सामूहिक आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आगाराची 'ती' भिंत अजून किती जीव घेणार

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क









राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**राजगुरूनगर :** अनेकांच्या अपघाताला कारणीभूत ठरणारी "ती" भिंत अजून किती अपघात झाल्यावर काढण्यात येणार असा प्रश्न सध्या राजगुरूनगर आगारातून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाकडून दररोज विचारला जात असून, या प्रश्नाचे उत्तर मात्र कोणाकडून आणि कधी मिळणार, हे मात्र कोणीच सांगत नसताना, येथे निरनिराळ्या प्रकारचे अपघात मात्र नित्य घडत आहेत.

राजगुरूनगर आगारात आल्यावर येथे येणाऱ्या लोकांचे स्वागत येथील खड्डे व चिखल करतात, त्यानंतर बऱ्याचवेळा येथील शौचालयात जाणाऱ्या लोकांना हात धुवायलाही पाणी नसते. आगारात रस्ते नसल्या कारणाने लोकांच्या अंगावर चिखल उडणे हे तर नित्याचेच झाले असून, त्याही पुढे येथील शौचालयाचे ड्रेनेज फक्त दगडांनी झाकलेले दिसते.

येथे काही महिन्यांपूर्वी टोरेन्ट कंपनीच्या माध्यमातून सीएनजी पम्प उभरण्यात आला. या सीएनजी पंपावर गॅस भरण्यासाठी दोन मशीन उपलब्ध असून, एक मशीन हे एसटी बसेस साठी तर दुसरी मशीन ही सर्वसामान्य लोकांच्या गाड्यांसाठी आहे. या सीएनजी पम्प मध्ये येण्यासाठी आधी राजगुरूनगर आगारात प्रवेश करावा लागतो व मगच त्या पंपात गॅस भरण्यासाठी जाता येते, अशी सुविधा येथे उपलब्ध आहे. येथे येणाऱ्या लोकांसाठी बाहेरून जागा करता येणे शक्य असले, तरी एक भिंत उभारली गेली असून, ती भिंत का उभारली गेली आहे याचे उत्तर कोणत्याही अधिकाऱ्याकडे आजवर मिळालेले नाही. त्या भिंतीमुळे मात्र एक निरपराध नागरिकाला जीव गमवावा लागला असून, आजवर तेथे अनेक अपघात सुद्धा झालेले आहेत.

गेल्या महिन्यात येथे झालेल्या अपघातानंतर पत्रकार सिद्धेश कर्नावट यांनी या विषयासंबंधी परिवहन मंत्र्यांकडे तक्रार केल्यानंतर संबंधित आगार प्रमुख महिलेची उच्चस्तरीय चौकशी सुरू असून, सदर महिलेवर भ्रष्टाचाराचे आरोप सुद्धा मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

काही प्रवाशी वर्गाचे म्हणणे आहे कि या आगार प्रमुखांच्या आधी राजगुरूनगर आगार हे उत्तम स्थितीमध्ये होते मात्र आता ते पुणे - नाशिक महामार्गवरील सर्वात खराब आगार म्हणून गणले जात आहे.

या सगळ्या घटनानंतर प्रवासी वर्ग उत्तम प्रवास कधी करू शकणार हे मात्र कोणीही सांगू शकत नसल्याने आता मुंबई मार्गावर प्रवास करणारे लोक हे बाहेर उभ्या राहणाऱ्या अवैध प्रवासी वाहतूक गाड्यांमधून प्रवास करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे

.जर पुढील काळात एखादा अपघात होऊन कोणाचा जीव गेला तर त्याची जब्बदारी कोण घेणार याचे सुद्धा उत्तर कोणाकडे मिळत नसून राजगुरूनगर आगारातील स्थानीक अधिकारी वर्ग हा मस्तवाल पणे जगत असून प्रवासी वर्ग मात्र उडत गेला अशा प्रकारात जगत आहेत.

> येथे आल्यावर आम्ही चालायचे कुठे हा प्रश्न मला सर्वात आधी पडला मात्र ह्या ठिकाणी आल्यानंतर माझी निदान आज तरी प्रवास करायची इच्छा मेली असून मी आज कॅब ने प्रवास करून माझ्या घरी जाणार आहे. फार वर्षांनी आल्यामुळे मला वाटले होते हे बसस्थानक आता अजून चांगले झाले असेल मात्र हा माझा गैरसमज होता.
>
> — **ह. भ. प.शरद महाराज भोसले** महाळुंगे, प्रवासी

# प्रत्येकाने शारिरीक व मानसिक स्वास्थ्य जपावे

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** उत्तम व निरोगी आयुष्य हा सर्वात महत्वाचा घटक आहे, आरोग्य व शरीर सुदृढ असेल तरच इतर गोष्टी साध्य करणे शक्य होते, त्या मुळे शारिरीक व मानसिक स्वास्थ्य जपण्यावर भर द्यायला हवा, असा संदेश आरोग्य संवाद कार्यक्रमादरम्यान विविध वैदयकीय तज्ज्ञांनी बारामतीकरांना दिला.

येथील एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने प्रतिबिंब व्याख्यानमालेमध्ये रविवारी आयोजित आरोग्य संवाद कार्यक्रमा दरम्यान डॉ. प्रसाद राजहंस, डॉ. अश्विनी जोशी, डॉ. राहुल कुलकर्णी व डॉ. वैभवी उपाध्ये या वैदयकीय क्षेत्रातील मान्यवरांनी वाढता मधुमेह व आवश्यक जीवन पध्दत, विस्मृतीचे आजार व ते टाळण्याचे मार्ग, जीवनरेखा (प्रथमोपचार प्रात्यक्षिके) या विषयावर बारामतीकरांशी संवाद साधत अनेक महत्वाच्या टीप्स दिल्या. संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम झाला.

डॉ. प्रसाद राजहंस यांनी १०८ या रुग्णवाहिकेची निर्मिती कशी झाली या बाबत सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, परदेशात ज्या धर्तीवर तातडीची आरोग्य गरज लागल्यानंतर बाबी केल्या जातात, त्याच भारतातही व्हाव्यात या दृष्टीने काही अभ्यासक्रम सुरु केले, त्याचा फायदा अनेक रुग्णांना भविष्यात झाला.

डॉ. राहुल कुलकर्णी म्हणाले, विस्मृतीबाबत तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा. चाळीशीनंतर काही प्रमाणात विस्मृती येते पण दैनंदिन जीवनावर परिणाम होत असेल तर त्याला उपचार करणे गरजेचे आहे. मेंदूला कायम चालना देत राहणे गरजेचे आहे, व्यायाम करावा, व्याधींवर नियंत्रण ठेवायला हवे, समतोल आहार घ्यावा, माणसांमध्ये मिसळून राहिल्यास त्याचा उपयोग होतो. व्यवस्थित झोप घ्या.

डॉ. अश्विनी जोशी यांनी मधुमेहावर नियंत्रण कसे ठेवायचे, आहार कसा ठेवायचा, व्यायाम कसा करायचा या बाबत माहिती दिली. भारतात आठ कोटीहून अधिक लोक लठ्ठपणा व मधुमेहाने ग्रस्त आहे.

एखाद्या त्सुनामीसारखी मधुमेहाची लाट आली आहे.यातून बाहेर पडण्यासाठी काळजी घेण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली.

डॉ. वैभवी उपाध्ये यांनी तातडीच्या वेळेस रुग्णाचे प्राण कसे वाचवायचे, त्याचे प्रात्यक्षिक दाखवित उपस्थितांनाही असे प्रात्यक्षिक करण्यास सांगितले. या मुळे अनेकांना ही नवीन माहिती या कार्यक्रमामुळे मिळाली. या नंतर योगासनांची प्रात्यक्षिकेही सादर केली गेली. या प्रसंगी या कार्यक्रमाचे संयोजक सुरेश शर्मा यांचा एन्व्हॉर्यमेंटल फोरमच्या वतीने सन्मान करण्यात आला. ज्ञानेश्वर जगताप यांनी सूत्रसंचालन केले.



# हजरत पठाणशाह बाबांचा शुक्रवारपासून उरूस



राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरानजीक असलेल्या पाडेगाव (ता. खंडाळा) येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाहचा ४१ व्या उरूसाला येत्या शुक्रवारपासून (१८ जुलै) प्रारंभ होत आहे.तीन दिवस हा उरूस साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने धार्मिक कार्यक्रमासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पाडेगाव ( ता.खंडाळा) येथील हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाह अनेक वर्षांपासून आहे. हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून या दर्ग्याकडे पाहिले जाते. हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबांचा येत्या शुक्रवारी १८ जुलैपासून ४१ वा उरूस साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. शुक्रवारी( दि.१८)सायंकाळी दर्गाहपासून नीरा शहरातून संदलची मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री दहा वाजता ही मिरवणूक पुन्हा दर्गाह येथे येईल. त्यानंतर बाबांच्या समाधीला धार्मिक विधिवत संदल लावण्यात येणार आहे. शनिवारी १९ जुलैला दुस-या दिवशी ऊर्स असून बाबांच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात. नीरा, पाडेगाव, निंबुत, लोणंद, बारामती परिसरासह पुण्याहून दर्शनासाठी भाविक येत असतात. रात्री मिलादख्वाणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तिसऱ्या दिवशी २० जुलैला सकाळी नऊ वाजता कुराण पठण होणार आहे. सकाळी ११ वाजता जियारतचा धार्मिक विधी करण्यात येईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी उर्सच्या तीन दिवसाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन दर्गाह ट्रस्टच्या वतीने ट्रस्टचे सचिव फिरोज सय्यद व विश्वस्त मोहंम्मदगौस आतार यांनी केले आहे.

# महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** महात्मा गांधी विद्यालय विद्यालयातील ४४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत १० आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ३४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे, अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संध्या कांबळे यांनी दिली.

इयत्ता पाचवी (पूर्व उच्च प्राथमिक) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व गुण (कंसात) पुढील प्रमाणे : तनय गोपाळे (२६२), सर्वेश भोकसे (२६०), जयेश गोरडे (२५८), पार्थ सूर्यवंशी (२५२), आरव गारगोटे ( २५२), आरोही बोरकर (२४२), रोहन सावंत (२३८), अविष्कार कुडेकर (२३६), ध्रुव यादव (२२८),अवनीश जाधव (२२२)

इयत्ता आठवी (पूर्व माध्यमिक) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व त्यांना मिळालेले गुण पुढील प्रमाणे : राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील विद्यार्थी : १) दिव्या राऊत (२८०,राज्य गुणवत्ता यादीत ८वी ), २) श्रावणी टाकळकर( २७२, राज्य गुणवत्ता यादी १६वी), ३) आर्या थिगळे (२७२,राज्य गुणवत्ता यादीत १६वी), जिल्हा गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी खालीलप्रमाणे : (कंसात गुण) समृद्धी बेंडुरे( २६८), विभूती चक्कर (२६६),आदिती चासकर (२६६),जान्हवी लोखंडे (२६४),श्रेयस रणपिसे (२६०), सोहम गुंडाळ (२६०),ईश्वरी गांजाळे (२५४),अर्णव घनवट (२५२),अक्षता पाचारणे (२५०), श्रेयस सुरकुले (२४८),अनुष्का धंद्रे (२४८),प्रणवी मांजरे(२४६),वेदांत होले (२४६),कार्तिक मनकर (२४६), सत्यम सूर्यवंशी (२४२), आस्मी आतकरी (२४०),सौम्या शेलार (२४०),वेदांती गुट्टे (२३८), श्रावणी गोरे (२३६), साई टाकळकर (२३४),कृष्णा टकले (२३०),अर्जुन गावडे (२१८), प्रज्ञा माळशिरसकर (२१८), प्रांजल पाचारणे (२१६),नीरजा वाळुंज (२१६), कार्तिक वरकड (२१४), प्राची निमसे(२१४), सायली भोकसे (२१४), प्रतीक्षा पालवे (२१२), अर्णवी बनसोडे (२१०), हरीश पवार (२१०) शिष्यवृत्ती विभाग प्रमुख प्रिया कुटे व रंजना भांगरे यांनी काम पाहिले.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना प्रिया कुटे, शैलेंद्र गावडे, कविता वायाळ, उर्मिला सावंत, कविता मुळूक, रंजना भांगरे, नयना लोखंडे, शितल ढवळे, मृणाल कुलकर्णी, कांचन बुरसे, सुनिता कोहिणकर, प्रियांका गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर,उपाध्यक्ष अजित लुणावत, सचिव गणेश जोशी, मुख्याध्यापिका संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका अस्मिता पाठक व सर्व अधिकारी वर्ग यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.



# खेडमधील जिल्हा परिषद गट-गण प्रारूप रचना जाहीर




राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणाच्या प्रारूप प्रभाग रचनेची यादी सोमवारी (दि. १४ जुलै) जाहीर झाली. या यादीत संभाव्य गट आणि गणांची नावे निश्चित नसली, तरी गावांचा समावेश आणि प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्यात आल्या आहेत. यापूर्वीच्या गट-गण रचनेत मोठ्या प्रमाणात फेरबदल झाले असून, प्रभागांची सलगता आणि भौगोलिक सोय यांचा अभाव असल्याचा आरोप स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांकडून होत आहे. या बदलांमुळे इच्छुक उमेदवारांचे धाबे दणाणले असून, त्यांच्या गेल्या काही वर्षांच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खेड तालुक्यात यापूर्वी ७ जिल्हा परिषद गट आणि १४ पंचायत समिती गण होते. नव्या प्रारूप रचनेनुसार आता ८ गट आणि १६ गण अस्तित्वात येणार आहेत. वाडा, कडूस, रेटवडी, काळुस, म्हाळुंगे, नाणेकर वाडी, पिंपळगाव तर्फे खेड आणि कुरुळी अशी संभाव्य प्रभागांची नावे जाहीर झाली आहेत. या नव्या रचनेमुळे गट आणि गणांचे स्वरूप पूर्णपणे बदलले असून, यापूर्वीच्या आरक्षणाचा आधार आता ग्राह्य धरला जाणार नाही, असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आरक्षणाची सोडत होईपर्यंत इच्छुकांना अनिश्चिततेच्या गर्तेत राहावे लागणार आहे.


गेल्या काही वर्षांपासून निवडणुकीच्या तयारीसाठी इच्छुक उमेदवार गावांमध्ये जनसंपर्क वाढवत होते. गावातील सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहून त्यांनी मतदारांशी जवळीक साधली होती. मात्र, नव्या रचनेमुळे त्यांचा हा जनसंपर्क आणि खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. आता नव्या प्रभागांनुसार पुन्हा जनसंपर्काला सुरुवात करावी लागणार असून, यामुळे इच्छुकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर झाला असून, यावर हरकती आणि सूचना मांडण्यासाठी १५ दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. या कालावधीनंतर अंतिम प्रभाग रचना जाहीर होईल. त्यानंतर गट आणि गणांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत होणार आहे. आरक्षण निश्चित झाल्यावरच खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या लढती स्पष्ट होतील. सध्या तरी इच्छुक उमेदवार आणि त्यांचे समर्थक नव्या प्रभागांमध्ये जनसंपर्क वाढवण्याच्या तयारीला लागले आहेत.

नव्या गट-गण रचनेमुळे खेड तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे. इच्छुक उमेदवारांमध्ये चर्चा आणि बैठका सुरू झाल्या असून, गावोगावी जनसंपर्काची स्पर्धा तीव्र होण्याची शक्यता आहे. दशक्रिया विधी, लग्न, साखरपुडा, वाढदिवस यांसारख्या सामाजिक कार्यक्रमांना इच्छुकांचे चेहरे आवर्जून दिसणार आहेत. प्रभाग रचनेतील बदलांमुळे काही गावे एका गटातून दुसऱ्या गटात गेल्याने इच्छुकांना नव्याने रणनीती आखावी लागणार आहे.

नव्या प्रभाग रचनेमुळे इच्छुक उमेदवारांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. एकीकडे नव्या गट-गणांनुसार जनसंपर्क वाढवण्याची गरज आहे, तर दुसरीकडे आरक्षणाच्या अनिश्चिततेमुळे त्यांना सावध पावले टाकावी लागणार आहेत. यापूर्वी केलेला खर्च आणि वेळ वाया गेल्याने अनेक इच्छुकांमध्ये नाराजी आहे. तरीही, नव्या जोमाने कामाला लागण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही.

# निरामय

## पापणी का फडफडते?



अनेकदा आपली पापणी फडफडत असते. त्या वेळी अनेकजण घरगुती उपाय करतात. अनेकजण पापणी फडफडत असेल तर काही तरी शुभ किंवा अशुभ बातमी कळणार असे म्हटले जात असते.

डोळ्याची पापणी फडफडणे ही सर्वसाधारणपणे ही सामान्य क्रिया आहे. यात गंभीर आजार वगैरे काही नसते. काही वेळाने आपोआप पा-पणी फडफडणे बंद होते; परंतु जर ही समस्या खूपच वेळ येत असेल तर डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करायलाच हवी. डोळ्यांची पापणी फडफडणे हे तणाव आणि चिंतेमुळेदेखील होऊ शकते. जेव्हा आपण मानसिकदृष्ट्या खूपच थकलेलो असतो. आत्यंतिक तणावाचा सामना करीत असतो, तेव्हा आपल्या शरीरावर काही प्रतिक्रीया होतात. ज्यात डोळ्यांची पापणी फडफडणेदेखील सामील आहे. स्नायूंच्या अनियमित आकुंचन पावण्यानेदेखील हे होते. जेव्हा अपुरी झोप होते, तेव्हादेखील असा प्रकार होतो. जेव्हा नीट झोपत नाही, स्नायू काम करीत नाहीत, तेव्हा डोळ्यांची पापणी फडफडू लागते.

काही वेळा डोळ्यांची फडफडणे जास्त कॅफीन सेवन केल्यानेदेखील होते. जादा कॅफीन घेतल्याने नर्व्हस सिस्टीम स्टिम्युलेट करू शकते. त्यामुळे पापण्या फडफडू शकतात. डोळ्यांतील ड्रायनेसदेखील डोळ्यांच्या पापण्या फडफडण्यासाठी जबाबदार असते. आपल्या डोळ्यातील पाणी कमी होते, तेव्हा स्नायू आंकुचन होऊ लागतात. त्यानेदेखील पापण्या फडफडू लागतात. खूप तास संगणक पाहिला, तर असे होऊ शकते. त्यामुळे अशा स्थितीत 'आर्टीफिशियल टीयर ड्रॉप'चा वापर करण्याची वेळ येऊ शकते. शरीरात जर पोषक तत्वाची कमरता असेल तरी हे घडू शकते. मॅग्नेशियम, पॉटेशियम आणि व्हिटामिन्स बी-१२ च्या कमतरतेने पेशींचे कार्य प्रभावित होऊ शकते आणि डोळ्याची पापणी फडफडू शकते.

जर लागोपाठ पापणी फडफडू लागली तर ती दुखू शकते, सूज येऊ शकते. त्या वेळी ही समस्या मज्जापेशींशी निगडीत असू शकते. अशा वेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## दिवस चांगला जाण्यासाठी 'हे' कराच..



आपल्यापैकी बऱ्याचजणांची सकाळ अंथरुणातून उठण्यापूर्वीच निघून जाते. लोक अलार्म लावून झोपतात; पण वेळेवर उठू शकत नाहीत. ही सवय यशाच्या मार्गात अडथळा ठरू शकते. कारण दिवसाचे पहिले काही तास आपण दिवसभर किती फलदायी आणि आनंदी राहू हे ठरवतात. आता तर विज्ञानानेही हे सिद्ध केले आहे की सकाळची सुरुवात चांगली झाली तर संपूर्ण दिवस चांगला जातो. अशा वेळी आपली सवय बदलण्याची गरज आहे.

सकाळी दहा वाजण्याच्या आधी फक्त दहा गोष्टी केल्या तर आपण नक्कीच अधिक निरोगी आणि आनंदी राहू. यासोबतच यशाचा मार्ग सुकर होईल. रोजच्या आयुष्यातील काही सवयी बदलून आपणही यशाकडे वाटचाल करू शकतो. यासाठी फार काही करण्याची गरज नाही, फक्त आपली सकाळ सकारात्मक करायची आहे. आचार्य चाणक्य म्हणतात, सकाळी लवकर उठणे ही यशाची पहिली पायरी आहे. सकाळी लवकर उठल्याने दिवसाचे काम वेळेवर पूर्ण होण्यास मदत होते आणि आत्मविश्वास वाढतो. हे जग जागे होण्याआधी तुम्ह-ाला काही वेळ शांत घालवण्यास अनुमती देते. ध्येये ठरवण्यासाठी आणि दिवसाची योजना करण्यासाठी या वेळेचा वापर करता येतो. सकाळी उठण्यासाठी झोपेचा त्याग करण्याची गरज नाही. यासाठी झोपण्याच्या वेळेचे व्यवस्थापन करावे लागेल. वेळेवर झोपून वेळेवर उठणे त्या दृष्टीने महत्वाचे आहे.

सकाळी उठल्यानंतर करावयाची पहिली गोष्ट म्हणजे पलंग नीटनेटका करणे. खोली स्वतः स्वच्छ करावी आणि घरातील वस्तू व्यवस्थित ठेवाव्यात. स्वच्छ वातावरणात राहिल्याने तणाव कमी होतो. त्याचा आपल्या मनावर आणि आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. रात्रीच्या झोपेनंतर शरीराला हायड्रेशन आणि पोषण आवश्यक असते, म्हणून चयापचय सुधारण्यासाठी आणि शरीर रीहायड्रेट करण्यासाठी एक ग्लास कोमट पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करावी. त्यामुळे अनेक आजारांचा धोका कमी होतो.

अनेकजण डोळे उघडताच हातात मोबाईल धरतात आणि काही वेळ त्यात मग्न राहतात. हे अजिबात करू नये. दिवसाची सुरुवात शांततेने झाली पाहिजे. फार महत्वाचे नसेल तर सकाळी दहा वाजेपर्यंत फोन तपासू नये. हा वेळ स्वतःला समर्पित करावा. हे आपल्याला आपल्यासाठी खरोखर महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास अनुमती देईल. सकाळी थोडी काळजी घेतल्याने आत्मविश्वास वाढतो. येणाऱ्या दिवसासाठी तो आपल्याला मानसिकदृष्ट्या तयार करतो. लक्षपूर्वक ध्यान केल्याने मन शांत होऊन लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. यासाठी शांत ठिकाणी बसून श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करावे. हा सराव कालांतराने कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढवू शकतो. दीर्घकाळात त्याचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

ऊर्जा पातळी वाढवण्यात सकाळची शारीरिक क्रिया महत्त्वाची भूमिका बजा-वते. त्यामुळे रोज सकाळी किमान तीस मिनिटे व्यायाम करावा. यामुळे फक्त तंदुरुस्त राहणार नाही, तर दिवसभर उत्साही आणि ताजपणा अनुभवाल. सकाळच्या पहिल्या आहारात साखर आणि कर्बोदके खाऊ नयेत. यामुळे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. थकवा, अशक्तपणा आणि वजन वाढण्यासह अनेक समस्यांम ागील हे नेमके कारण आहे. मधुमेही रुग्णांनी याची विशेष काळजी घ्यावी. व्यायामानंतर, सकाळी प्रथिने आणि फायबरयुक्त पौष्टिक नाश्ता करावा. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि दिवसभर सक्रिय राहण्यास मदत होते. सकाळी निरोगी न्याहरी केल्याने मूड चांगला राहतो आणि काम करण्यास मदत होते. सकाळच्या नाश्त्यामध्ये हरभरा, मूग यासारखे अंकुरलेले धान्य आणि कोणत्याही हंगामी फळांचा समावेश करावा.

सकाळी काही मिनिटे काढून रोजच्या कामांची यादी तयार करा. या यादीतील महत्त्वाच्या कामांना प्राधान्य दिल्यामुळे उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होते.

## लठ्ठपणामुळे दरवर्षी २८ लाख लोकांचा मृत्यू

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा ही महामारी बनली आहे. लठ्ठपणामुळे होणाऱ्या जीवघेण्या आजारांमुळे दरवर्षी २८ लाख प्रौढांचा मृत्यू होत आहे.

आता लठ्ठपणा ओळखण्याची पद्धत पूर्वीपेक्षा अधिक शास्त्रीय करण्यावर भर दिला जात आहे. भारतातील डॉक्टर गेल्या १५ वर्षांपासून लठ्ठपणा शोधण्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) टूल वापरत आहेत. यामध्ये लोकांची उंची आणि वजन यांचे प्रमाण वापरून कोणी लठ्ठ आहे की नाही हे ठरवले जाते; मात्र आता याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे आली आहेत. आता लठ्ठपणा शोधण्यासाठी 'बीएमआय'चा वापर केवळ सपोर्ट मॉनिटरिंग टूल म्हणून केला जाईल. 'लॅन्सेट डायबिटीज अँड एंडोक्राइनोलॉजी कमिशन'मध्ये जगभरातील ५८ तज्ज्ञ डॉक्टरांनी लठ्ठपणाची नवी व्याख्या दिली आहे. संशोधनात असे दिसून आले आहे, की लठ्ठपणा अधिक शास्त्रोक्त पद्धतीने समजून घेतल्यास, कोणत्या प्रकारचा लठ्ठपणा कोणत्या रोगांसाठी धोका बनू शकतो हे ओळखण्यास मदत होईल. त्या दिशेने काम करून आपण त्या सर्व आजारांचा धोका टाळू शकतो. 'बीएमआय'चा सर्वात मोठा दोष म्हणजे ते चरबी आणि स्नायूंम ध्ये फरक करत नाही. 'बीएमआय'च्या कमतरतांबाबत डॉक्टरांनी अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. ओटीपोटात जमा झालेली चरबी, कंबरेभोवती जमा झालेली चरबी किंवा यकृत आणि हृदयात जमा झालेली चरबी हात आणि पाय यांच्या चरबीपेक्षा जास्त धोकादायक असते. यामुळे हात, पाय किंवा त्वचेखाली जमा झालेल्या चरबीपेक्षा जास्त आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे अनेक जुनाट आजारांचा धोका संभवतो.

भविष्यात हा मोठा धोका होऊ शकतो. त्यामुळे नवीन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उपचाराची दोन टप्प्यांत विभागणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. 'क्लिनिकल लठ्ठपणा' हा एक जुनाट आजार आहे. त्यामुळे शरीरात जमा झालेल्या अतिरिक्त चरबीमुळे अवयवांचे कार्य प्रभावित होऊ लागते. दैनंदिन कामात अडचणी येतात. ते ओळखण्यासाठी संशोधकांनी लहान मुले आणि प्रौढांसाठी वेगवेगळे निकष तयार केले आहेत. यामुळे सांधेदुखी, श्वास घेण्यात अडचण, हृदय अपयश आणि अवयव निकामी होणे यांसारखी लक्षणे दिसतात. 'प्रीक्लिनिकल लठ्ठपणा'चा अर्थ असा आहे, की या रोगामुळे अद्याप कोणतीही आरोग्य समस्या उद्भवलेली नाही; मात्र त्यामुळे टाईप-२ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीचे आजार आणि काही कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढत आहे. याशिवाय शरीरात अतिरिक्त चरबी दिसून येते. त्यात काही सुधारणा केल्या, तर आरोग्याच्या गंभीर परिस्थितीचा धोका टळू शकतो, याला खूप वाव आहे.



## यकृताचे आरोग्य बिघडण्यात वाढ

डॉ. संदीप काळोखे

लिवर म्हणजेच यकृत हा आपल्या शरीरातील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. शरीरातील अनेक महत्त्वाची कार्ये करण्यासाठी लिवर जबाबदार असते. हे शरीरातील टाकाऊ पदार्थ फिल्टर करून काढून टाकण्याचे काम करते. ते अन्न पचवणाऱ्या पित्त प्रोटीनच्या निर्मितीमध्ये आणि लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये मदत करते. अशा परिस्थितीत शरीर निरोगी ठेवण्यासाठी यकृत निरोगी ठेवणे खूप गरजेचे आहे.

आजकाल वाईट खाण्याच्या सवयी आणि वाईट जीवनशैलीमुळे यकृताचे आरोग्य खूप बिघडते. आजकाल लोकांमध्ये लिवरशी संबंधित आजार झपाट्याने वाढतायत. त्या वेळी यकृत खराब होते, तेव्हा शरीरात काही लक्षणे दिसून येतात. काही लक्षणे अशीदेखील आहेत, जी बहुतेकदा रात्री दिसून येतात. ही लक्षणे वेळीच ओळखली गेली, तर यकृत खराब होण्यापासून वाचवता येते.



### लक्षणे

■ **सतत झोपमोड होणे**

जर तुम्हाला रात्री झोपायला त्रास होत असेल किंवा वारंवार जागे होत असेल, तर हे यकृताच्या नुकसानाचे लक्षण असू शकते. यकृताच्या समस्यांमुळे, शरीरात टॉक्सिन पदार्थांचे प्रमाण वाढते. जे मेंदू आणि मज्जासंस्थेवर परिणाम करू शकते. यामुळे झोपेशी संबंधित समस्या उद्भवू लागतात.

■ **पायाला सूज येणे**

यकृताच्या नुकसानीमुळे पाय आणि घोट्यांमध्ये सूज येण्याची शक्यता वाढते. या वेळी तुम्हाला या भागात वेदना होण्याची दाट शक्यता असते. रात्रीच्या वेळी, ही सूज खूप वाढू शकते. जर तुम्हाला हे लक्षण दिसले तर वेळीच डॉक्टरांची मदत घ्या.

■ **शरीराला खाज येणे**

जर तुम्हाला रात्रीच्या वेळी तुमच्या त्वचेवर जास्त खाज येत असेल, तर ते लिवरच्या नुकसानीचे लक्षण असू शकते. खरेतर जेव्हा यकृत योग्यरित्या काम करू शकत नाही, तेव्हा शरीरात पित्ताचे प्रमाण वाढते. यामुळे त्वचेवर खूप खाज येण्याची समस्या उद्भवते.

■ **रात्री उल्टी होणे**

जर तुम्हाला रात्री मळमळ आणि उलट्या सारखी लक्षणे जाणवली तर ते यकृताच्या नुकसानीचे लक्षण असू शकते. अशावेळी वेळीच डॉक्टरांची मदत घ्या.

■ **लघवीचा रंग बदलणे**

लघवीच्या रंगात बदल होणे हेदेखील यकृताच्या समस्येचे लक्षण आहे. ज्या वेळी यकृत योग्यरित्या कार्य करत नाही, तेव्हा शरीरात बिलीरुबिनची पातळी वाढते. ज्यामुळे लघवीचा रंग गडद पिवळा होऊ शकतो. लघवीतून फेस येणे किंवा लघवीतून दुर्गंधी येणेहे देखील यकृताच्या समस्येचे लक्षण आहे.

## चेरी खा, स्वस्थ राहा

चेरी हे फळ दिसायला छोटं असलं तरी त्यात अनेक पोषणमूल्यं दडली आहेत. छोटीशी चेरी अनेक विकारांना आळा घालण्यास समर्थ असते. वजन कमी करण्यासाठी आहारात चेरीचा समावेश करता येईल. पोटावरची चरबी कमी करण्यासाठी चेरी उपयुक्त ठरू शकते. चेरीतल्या अँटीऑक्सिडंट्समुळे कॅन्सरलाही प्रतिबंध होऊ शकतो. चेरीतल्या काही घटकांमुळे मज्जासंस्थेला आराम मिळतो. चेरी खाल्ल्याने शांत झोप लागू शकते. हृदयविकारावरही चेरी उपयुक्त ठरू शकते. या फळात पोटॅशियम खूप जास्त प्रमाणात असल्यामुळे हृदयगती सुरळीत होण्याबरोबरच रक्तातल्या कोलेस्टरॉलचं प्रमाणही कमी होतं. चेरीमुळे रक्ताल्या साखरेचं प्रमाणही नियंत्रणात राहू शकतं. चेरीमुळे रक्ताचं शुद्धिकरण होतं. या फळात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असतं. त्वचा आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठीही चेरीचं सेवन करायला हवं.



## कर्करोगाचे निदान रक्तचाचणीने

कर्करोगाचं निदान वेळेत होणं गरजेचं असतं. हा विकार प्राथमिक अवस्थेत लक्षात आला तर रुग्णाचा जीव वाचू शकतो. येत्या काळात अत्यंत कमी खर्चिक अशा रक्तचाचणीद्वारे कर्करोगाचं वेळेत निदान करता येणार आहे. पुण्यातल्या एका शास्त्रज्ञाने ही चाचणी शोधून काढली आहे. या चाचणीमुळे डॉक्टरांना कर्करोगावरच्या उपचारांची दिशा ठरवणं सोपं होणार आहे. ही रक्तचाचणी ऑन्को डिस्कव्हर नावाच्या लिक्विड बायोप्सी तंत्रज्ञानावर आधारित आहे. याद्वारे रुग्णाच्या रक्तातली कर्करोगग्रस्त पेशी खूप लवकर शोधता येईल. यामुळे कर्करोगाचा शरीरातला प्रसार रोखणं शक्य होईल. ही चाचणी तुलनेने खूप स्वस्त असल्यामुळे सर्व स्तरातल्या रुग्णांना लाभ घेता येईल. या चाचणीची अमेरिकन पद्धत खूपच खर्चिक आहे. आज ही चाचणी भारतात उपलब्ध नाही. पण उपलब्ध होताच ती रुग्णांसाठी वरदान ठरू शकेल.



## ओळखा स्पोर्टस बारचे धोके

नियमित व्यायाम करणारे, ॲथलिट्स स्पोर्टस ड्रिंक्स, एनर्जी बारचं सेवन करतात. मात्र यामुळे त्यांच्या दातांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधल्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं. यासाठी ३५२ व्यावसायिक ॲथलिट्सचा अभ्यास करण्यात आला. यापैकी ९४ टक्के ॲथलिट्स दिवसातून दोनदा दात घासायचे तर ४४ टक्के नियमित फ्लॉसिंग करायचे. या ॲथलिट्सच्या अहवालाची तुलना दोन वेळा दात घासणाऱ्या आणि फ्लॉसिंग करणाऱ्या सर्वसामान्य लोकांशी करण्यात आली. यातून काही निष्कर्ष काढण्यात आले. त्यानुसार एनर्जी बार, स्पोर्टस ड्रिंकमधल्या अतिसाखरेमुळे ॲथलिट्सना दातदुखी तसंच इतर समस्यांना सामोरं जावं लागतं असं आढळलं.



## शाकाहारीत बी १२ जीवनसत्त्वांची कमतरता



डॉ. प्रसन्न नेने

मुंबई: आजकाल अनेकजण मांसाहार सोडून शाकाहारकडे वळले आहेत. मांसाहार केल्याने अनेक आजारांचा सामना करावा लागतो, असा अनेकांचा समज असल्याने मांसाहार करणाऱ्यांनी चक्क शाकाहार स्वीकारला आहे. शाकाहारी लोक मांस खात नाहीत, म्हणून त्यांच्यामध्ये वबी १२ १२ जीवनसत्वाची कमतरता असण्याची शक्यता आहे.

व्हिटॅमिन बी -१२ शरीरासाठी अत्यंत आवश्यक

व्हिटॅमिन बी -१२ हे एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे, जे शरीराच्या पेशी आणि रक्ताशी संबंधित कार्यांसाठी आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी-१२ हे इतर जीवनसत्त्वांच्या तुलनेत सर्वात आवश्यक आणि आवश्यक मानले जाते. त्याच्या कमतरतेचा अर्थ शरीरातील सर्वात महत्वाच्या सूक्ष्म पोषक घटकांची घट. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हे जीवनसत्व प्रामुख्याने मांस, मासे, अंडी आणि दुग्धजन्य पदार्थ यांसारख्या प्राण्यांवर आधारित खाद्यपदार्थांमध्ये आढळते. त्यामुळे शाकाहारी लोकांना कधीकधी त्याची कमतरता भासते.

शाकाहार आणि बी-१२ ची कमतरता

शाकाहारी आहारात व्हिटॅमिन बी-१२ ची कमतरता असू शकते. कारण हे जीवनसत्व वनस्पती-आधारित पदार्थांमध्ये कमी असते. हे जीवनसत्व काही शाकाहारी पदार्थ जसे की संपूर्ण धान्य, सोया दूध आणि हिरव्या पालेभाज्यांमध्येदेखील आढळते, तरीही शाकाहारी लोकांना त्याची कमतरता जाणवू शकते. जे लोक शाकाहारी असतात, त्यांना सर्वात जास्त अशक्तपणा आणि थकवा येतो. शरीरात व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेमुळे ॲनिमिया म्हणजेच रक्ताशी संबंधित इतर आजारही होतात. व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे, की शाकाहारी लोकांना या जीवनसत्वाच्या कमतरतेचा त्रास होत आहे. व्हिटॅमिन बी-१२ चे सर्वोत्तम स्त्रोत प्राणी-आधारित अन्न मानले जातात. हे बहुतेक भारतीय लोकांमध्ये घडते.

**व्हिटॅमिन बी -१२ च्या कमतरतेची लक्षणे**

- नेहमी थकवा जाणवतो
- केस गळणे
- त्वचेचा पिवळसरपणा
- डोळ्यांचा पांढरा भाग पिवळसर होणे
- भूक न लागणे

## लक्षणं पक्षाघाताची


व्याधी-विचार

पक्षाघात हा अत्यंत गंभीर असा आजार आहे. मेंदूला होणारा कमी रक्तपुरवठा पक्षाघाताला कारणीभूत ठरतो. रक्तपुरवठा थांबल्यामुळे मेंदूतल्या पेशी मृतवत होतात. यामुळे मेंदूचं खूप नुकसान झाल्याने रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. पक्षाघाताचा झटका आल्यानंतर रुग्णावर तातडीने उपचार करावे लागतात. पक्षाघातावर योग्य उपचार होण्यासाठी त्याची लक्षणं जाणून घेणं गरजेचं असतं. लक्षणांची जाण असेल तर त्वरित उपचार मिळवणं बऱ्याच अंशी सोपं होतं. फक्त प्रौढांनाच नाही तर तरुणांमध्येही पक्षाघाताची समस्या वाढते आहे. ही बाब निश्चितच खूप गंभीर आहे. स्थूलपणा, वाढलेलं, कोलेस्टरॉल, मद्यपान, अमली पदार्थांचं व्यसन यामुळे तरुणांमध्ये पक्षाघाताचा धोका वाढतो आहे. पक्षाघाताच धोका टाळण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणं गरजेचं आहे. तसंच या व्याधीच्या लक्षणांबाबत जाणून घ्यायला हवं.

पक्षाघा-ताचा झटका अचानक येतो. मात्र याची काही लक्षणं दिसून येतात. या चाचणीला फास्ट चाचणी म्हटलं जातं. या चाचणीत रुग्णाच्या हास्याकडे बघितलं जातं. एका बाजूला झुकलेलं किंवा वेडंवाकडं हास्य पक्षाघाताचं लक्षण असू शकतं. रुग्णाच्या हातांची तपासणी केली जाते. यात दोन्ही हात वर उचलायला सांगितले जातात. एक हात अचानक खाली येणं हे स्ट्रोकचं लक्षण ठरतं. लुळेपणामुळे हात पटकन खाली येतो. बोलताना त्रास होणं, असंबद्ध बोलणं हे लक्षणही पक्षाघाताकडे अंगुलीनिर्देश करतं. त्यामुळे रुग्णाला एखादं वाक्य बोलायला सांगणं आणि ते पुन्हा वदवून घ्याला हवं. पक्षाघाताच्या उपचारांमध्य वेळेला खूप महत्त्व असतं. रुग्णावर तातडीने उपचार व्हावे लागतात. त्यामुळे वरील लक्षणं दिसली तर तातडीने डॉक्टरांकडे धाव घ्यायला हवी.

वर नमूद केलेल्या लक्षणांव्यतिरिक्त पक्षाघाताची इतर लक्षणंही दिसून येतात. यात तोल जाणं, चालताना त्रास होणं, चेहऱ्याची एक बाजू, हात किंवा पाय लुळे पडणं, अस्वस्थ वाटणं, भोवळ येणं, श्वास घ्यायला त्रास होणं, उलटी, मळमळ, अचानक तीव्र स्वरुपाची डोकेदुखी जाणवणं यांचा समावेश आहे.

पक्षाघाताचे दुष्परिणाम टाळण्यासाठी एकाही लक्षणाकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही. ही लक्षणं दिसली की कोणतीही हयगय करता कामा नये. रुग्णवाहिका बोलावून रुग्णाला रुग्णालयात दाखल करायला हवं.



## का जाणवतो थकवा?

आपण कुठे चुकतो

अनेकांना सतत दमल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं. सततच्या थकव्यामुळे तुमच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. ऊर्जा, उत्साह कमी होण्यामागे काही कारणं असतात. आपल्या काही चुकांमुळे थकल्यासारखं वाटतं. या चुका टाळल्या तर तुम्ही उत्साही आयुष्य जगू शकता.

अपुरी झोप हे थकव्याचं महत्त्वाचं कारण असतं. एखाद्या रात्री शांत झोप झाली नाही तर दुसऱ्या दिवशी मरगळल्यासारखं वाटतं, डोकं जड होतं. अपुरी झोप त्रासदायक ठरू शकते.



सध्या विविध प्रकारची डाएट्स केली जातात. यामुळे कॅलरींचं प्रमाण कमी होऊन तुम्हाला थकवा येऊ शकतो. तुमच्या दैनंदिन गरजेनुसार योग्य तो आहार घेणं गरजेचं आहे. पोषक आणि सकस आहारामुळे तुम्ही ताजेतवाने राहू शकता. प्रथिनांमुळे चयापचय क्रिया सुधारते आणि शरीराला आवश्यक ती ऊर्जा मिळते. प्रथिनांचं योग्य प्रमाणात सेवन केलं तर वजन कमी व्हायला मदत होते. प्रथिनांच्या कमतरेमुळे थकवा जाणवू शकतो. त्यामुळे थकल्यासारखं वाटत असेल तर आहारात प्रथिनांचं प्रमाण वाढवता येईल.



## अल्काराझवरील विजय महत्त्वाचा : सिनर

**लंडन : यानिक सिनरने विम्बल्डन २०२५ अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझला पराभूत करत ऐतिहासिक विजय नोंदवला. गेल्या पाच लढतींमध्ये अल्काराझकडून पराभव पत्करणाऱ्या सिनरसाठी हा विजय अत्यंत भावनिक ठरला. विम्बल्डन ग्रँडस्लॅममधील अंतिम फेरीच्या लढतीआधी कार्लोस अल्काराझ याने सलग पाच लढतींमध्ये यानिक सिनरला पराभूत केले होते. यामध्ये फ्रेंच ओपन टेनिस ग्रँडस्लॅममधील जेतेपदाच्या लढतीचा समावेश होता. याच पार्श्वभूमीवर इटलीच्या सिनर याने विम्बल्डनमधील जेतेपद पटकावल्यानंतर अल्काराझवरील विजय अत्यंत महत्त्वाचा ठरला, अशा शब्दांत आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या.**

# कबड्डीसाठी शरद पवार पुन्हा मैदानात

## ‘कबड्डीतील किमयागार’ पुस्तक प्रकाशानात शरद पवारांची घोषणा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**




**चेन्नई :** एकेकाळी महाराष्ट्र आणि मुंबईच्या कबड्डी संघटनेचा नावलौकिक संपूर्ण देशात होता, आज मात्र माझ्या कानावर काही गोष्टी ऐकू येतात ,त्या चिंता करण्याजोग्या आहेत. संघटना मुठीत ठेवण्यासाठी दुर्दैवाने चुकीचा रस्ता स्वीकारलाय की काय असे चित्र दिसत आहे. त्यामुळे खेळाडूंना सर्वात जास्त किंमत चुकवावी लागत आहे, हे ऐकल्यानंतर यामध्ये मी लक्ष घालण्याची वेळ आली आहे, या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे; असे मत माननीय नामदार शरद पवार यांनी नुकतेच व्यक्त केले.

विनायक दळवी लिखित कबड्डीतील किमयागार या संदर्भ ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करताना शरद पवार बोलत होते. त्याप्रसंगी अनेक राष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते. त्यामध्ये अर्जुन पुरस्कार विजेते सदानंद शेट्टी, शांताराम जाधव, राजू भावसार, अशोक शिंदे, माया आकरे यांचा समावेश होता. तर राष्ट्रीय खेळाडूंमध्ये आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेता खेळाडूंमध्ये चित्रां नाबर, शैला रायकर,ग्रेटा डिसोजा, सुनील जाधव जेम्स परेरा, विजया शेलार, सागर बांदेकर आदी आजी माजी राष्ट्रीय कबड्डीपटू देखील उपस्थित होते. उपस्थितांमध्ये भारताचे ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे तसेच उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय टिपसे बीसीसीआयचे माजी सीईओ रत्नाकर शेट्टी आणि शरीर संस्थापटू विकी गोरक्ष हे मान्यवर देखील उपस्थित होते.

आपला मुद्दा अधिक विस्तृतपणे मांडताना शरद पवार म्हणाले, “मला आनंद आहे की, हा खेळ सुधारतोय. पण अलीकडेच मला काही गोष्टी ठीक ऐकायला मिळत नाहीत. दुर्दैवाने संघटनेमध्ये काहीतरी चुकते आहे, चुकीचा रस्ता काही लोकांनी स्वीकारला की काय? असं चित्र दिसतंय. मात्र त्यामुळे सगळ्यात जास्त किंमत ही खेळाडूंना द्यावी लागते. कबड्डी खेळ विस्तारित होतोय. त्यामध्ये नवीन एक तंत्र पुढे आलेलं आहे. आज टेलिव्हिजनमध्ये ते तंत्र आपल्याला बघायला मिळतं. त्याच्यामधून खेळाडूंना कदाचित काही मदत होत असेल. पण मूळ कबड्डी हा खेळ जो आहे तसाच आहे. त्याच्यातील जे कसब आहेत, त्याच्यावर कुठेतरी आक्रमण होतंय की काय? असं त्या ठिकाणी दिसतंय. म्हणून याच्यात लक्ष घालावं लागेल. मी जाहीरपणाने कबूल करतो की, अलीकडे माझं लक्ष या कामात नव्हतं. पण एकंदर चित्र ऐकल्यानंतर याच्यात लक्ष घालण्याची वेळ आलेली आहे आणि कबड्डीला जुने दिवस कसे येतील? याची काळजी ही घ्यावी लागेल, या निष्कर्षाशी मी आलो आहे.

सदर प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन माजी राष्ट्रीय कबड्डीपटू आणि माझी प्रशिक्षक राणाप्रताप तिवारी यांनी आपल्या खास खुमासदार शैलीत केले.

## चेंबूर जिमखाना तर्फे राज्य कॅरम स्पर्धेचे आयोजन



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** द चेंबूर जिमखान्याच्यावतीने तसेच महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या मान्यतेने ४ थी चेंबूर जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धा २५ ते २७ जुलै २०२५ दरम्यान चेंबूर जिमखाना, क्रिस्टल कम्युनिटी वातानुकूलित हॉल, फेज- २, रोड क्रमांक १६, चेंबूर ( पूर्व), मुबई - ७१ येथे रंगणार आहे. पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटात हि स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. स्पर्धेतील प्रत्येक गटातील पहिल्या आठ विजेत्या मिळून एकंदर खेळाडूंना रोख रुपये १ लाख १० हजारांचे ईनाम, चषक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंनी आपली नावे जिल्हा संघटनेमार्फत दिनांक १६ जुलै २०२५ पर्यंत महाराष्ट्र कॅरम असोसिएशन, पारेख महल बिल्डिंग, सखाराम कीर मार्ग, आश्रय हॉटेलच्या मागे, शिवाजी पार्क, मुंबई येथे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९९८७०४५४२९ येथे संपर्क साधावा.

## रवींद्र जोशी व ओंकार जोग यांना एकेरीत विजेतेपद; संतोष वाकडराडकर यांना उपविजेतेपद

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**





**पुणे :** पुण्याच्या रवींद्र जोशी व ओंकार जोग खेळाडूंनी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रौढांच्या पहिल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील आपापल्या गटात विजेतेपदावर मोहोर नोंदवित कौतुकास्पद कामगिरी केली. ४० वर्षावरील गटात पुण्याच्या संतोष वाकडराडकर यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले

ही स्पर्धा नवी मुंबई येथील एलीसीयम क्लब येथे टीटीसी पालव यांनी आयोजित केली होती. प्रौढांच्या ४५ वर्षावरील गटात जोग यांनी अंतिम लढतीत केदार कसबेकर (मुंबई महानगर जिल्हा) यांच्यावर ११-३,६-११,११-३,११-८ अशी मात केली. उपांत्य फेरीत त्यांनी सुहास राणे यांचा पराभव केला होता तर कसबेकर यांनी पिनाक शाळीग्राम यांना पराभूत केले होते. त्यांनी टॉप स्पिन फटक्यांचा सुरेख खेळ केला.

प्रौढांच्या ५५ वर्षावरील गटात जोशी यांनी नागपूरच्या बसाब चौधरी यांना अंतिम लढतीत ११-८,११-६,१७-१५ असे पराभूत केले. त्यांनी काउंटर अटॅक पद्धतीचा बहारदार उपयोग केला. उपांत्य फेरीत जोशी यांनी प्रसाद नाईक यांना हरविले होते तर चौधरी यांनी भूषण निवगी यांचे आव्हान संपुष्टात आणले होते.

पुण्याच्या संतोष वाकराडकर यांना ४० वर्षावरील गटात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. चुरशीच्या लढतीत अमोल सरोदे यांनी त्यांचा ११-४,१२-१०,७-११,११-८ असा पराभव केला. उपांत्य फेरीत सरोदे यांनी पुण्याच्या विवेक कोलते यांचा पराभव केला होता. ५० वर्षांवरील गटात सोलापूरच्या मनीष रावत हे विजेते ठरले. अंतिम सामन्यात त्यांनी मुंबई महानगर जिल्हा संघाचे खेळाडू शरद ग्रोव्हर यांना ७-११,११-४,११-४,९-११,११-९ असे अटीतटीच्या लढतीनंतर पराभूत केले. रावत यांनी उपांत्य फेरीत अमित श्रॉफ यांचा पराभव केला होता. ग्रोव्हर यांनी पुण्याच्या नचिकेत देशपांडे यांच्यावर मात करीत अंतिम फेरी गाठली होती.

## सात्त्विक-चिराग जेतेपदाचा दुष्काळ संपवणार?

### जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धा रंगणार



**टोकियो :** सात्त्विक-चिराग ही भारतीय दुहेरी जोडी जपान ओपनमध्ये जेतेपदासाठी सज्ज झाली असून ते आपला फॉर्म कायम राखण्याचा प्रयत्न करणार आहेत. दुखापतीतून सावरल्यानंतर सिंधू आणि लक्ष्य सेन यांच्यावरही भारताच्या आशा टिकून आहेत. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या पुरुष दुहेरीतील जोडीवर जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताची मदार असणार आहे. याप्रसंगी सात्त्विक-चिराग जोडी आपला शानदार फॉर्म कायम राखण्याचा प्रयत्न करेल. तसेच उपांत्यपूर्व, उपांत्य फेरीपर्यंत मजल मारत असलेल्या या जोडीला जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठीही प्रयत्न करावे लागणार आहेत.

जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील एकेरी विभागात पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन या दोन खेळाडूंवर अधिक लक्ष असणार आहे. सिंधू हिने इंडिया ओपन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली होती. ही तिची २०२५ मधील सर्वोत्तम कामगिरी होय. दुखापतीमधून बरी होत सिंधू आता पुनरागमन करीत आहे. लक्ष्य १८व्या स्थानावर आहे. पहिल्या लढतीत चीनच्या वँग झेंग झिंग याच्याशी त्याला दोन हात करावे लागणार आहेत. जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे अन्य खेळाडूही सहभागी होणार आहेत. उन्नती हुडा, अनुपमा उपाध्याय हे खेळाडू एकेरीमध्ये बॅडमिंटन कोर्टवर उतरणार आहेत, तसेच हरिहरन अम्साकरुणन-रुबनकुमार तसेच काविप्रिया सेल्वम-सिमरन सिंघी आणि ऋतुपर्ण पंडा-स्वेतपर्ण पंडा या जोड्या दुहेरीत आपल्या खेळाची धमक दाखवणार आहेत.

## ऑलिम्पिकचं वेळापत्रक जाहीर!



**पुणे :** क्रिकेट, हॉकीसह कोणत्या स्पर्धा कधी, ऑलिम्पिक २०२८ स्पर्धा लॉस अँजलिसमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील विविध खेळांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. ऑलिम्पिक २०२८ स्पर्धा १५ जुलै ते ३० जुलैदरम्यान लॉस अँजलिसमध्ये होणार आहे. या ऑलिम्पिकमध्ये प्रथमच क्रिकेटचा समावेश असून स्पर्धा १२ जुलैपासून सुरू होईल. या वेळापत्रकात ३० पेक्षा जास्त खेळांचा समावेश असून अनेक स्पर्धा उद्घाटनाआधीच सुरू होतील. बरोबर तीन वर्षांनी ऑलिम्पिक २०२८ स्पर्धेला लॉस अँजलिसमध्ये सुरुवात होणार आहे. ऑलिम्पिक आयोजकांनी सोमवारी या स्पर्धेचे खेळांनुसार वेळापत्रक जाहीर केले आहे. गेल्याचवर्षी पॅरिसमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा झाली होती. त्यानंतर आता पुढच्या ऑलिम्पिकची तयारी सुरू झाली असून वेळापत्रकही जाहीर झाले आहे. त्यामुळे आता खेळाडूंना ऑलिम्पिक २०२८ साठी तयारी सुरू करतील.

ऑलिम्पिक २०२८ स्पर्धेचा उद्घाटन समारंभ १५ जुलै २०२८ रोजी होईल आणि अधिकृतरित्या या स्पर्धेची सुरूवातही होईल. तसेच ३० जुलैला स्पर्धेचा समारोप समारंभ होईल. या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचाही समावेश झाला असल्याने क्रिकेट स्पर्धेच्याही तारखा समोर आल्या आहेत. उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी ट्रायथलॉनचे पहिले मेडल स्पर्धा होईल. दरम्यान, उद्घाटन जरी १५ जुलैला होणार असले तरी काही स्पर्धांना १२ जुलैपासून सुरुवात होणार आहे. पण १२ ते १४ जुलैपर्यंत कोणतेही मेडलचे सामने होणार नाहीत. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी यांसारख्या मोठ्या आणि सांघिक स्पर्धाही १२ जुलैपासूनच सुरू होतील. क्रिकेटला १२ जुलैपासून सुरुवात होणार असून २९ जुलैपर्यंत सामने होतील. हॉकी आणि फुटबॉल स्पर्धांचे देखील १२ जुलै ते २९ जुलै असे सामने होणार आहेत. ॲथलेटिक्स १५ जुलै ते ३० जुलै दरम्यान होईल.

### आयबीएसएफ जागतिक १७ आणि २१ वर्षाखालील स्नुकर अजिंक्यपद स्पर्धा

## आरव संचेती भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करणार

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** बाहरीन येथील मनामा येथे आंतरराष्ट्रीय बिलीयर्डस् आणि स्नुकर फेडरेशन (आयबीएसएफ) तर्फे आजपासून सुरू झालेल्या आयबीएसएफ जागतिक १७ आणि २१ वर्षाखालील स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या भारतीय संघामध्ये पुण्याच्या आरव संचेतीची निवड झाली आहे. भारतीय संघामध्ये निवड झालेला आरव हा महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू असून १४ वर्षीय आरव हा संघातील सर्वात लहान खेळाडू आहे.

भारतीय संघामध्ये आरव (महाराष्ट्र) याच्यासह भाव्य पिपालिया (गुजरात), आरव जयद (कर्नाटक), राहूल विल्यम्स् (तामिळनाडू) आणि वैभव चढ्ढा (तेलंगणा) यांचा समावेश आहे. अशोक शांडिल्या हे संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पहाणार आहेत. बाहरीन येथील मनामा येथे आजपासून (१५ जुलै) सुरू झालेली ही स्पर्धा २४ जुलैला संपणार आहे.

आरव हा राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय स्नुकर आणि बिलीयर्डस् खेळाडू सचिन संचेती यांचा मुलगा असून आपल्या वडीलांप्रमाणेच त्याने या क्यु स्पोर्ट्स प्रकारात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. भारतीय (राष्ट्रीय) सब-ज्युनिअर २०२४ स्नुकर आणि बिलीयर्डस् गटात क्रमांक १ तसेच महाराष्ट्र (राज्यस्तरीय) सब-ज्युनिअर गटात क्रमांक १ असे आरवचे मानांकन आहे.

आरव हा यासिन मर्चंट यांच्या मार्गदर्शनाखाली ॲमानोरा फन क्लब येथे सराव करतो. एनआयओएस या खुल्या शालेय अभ्यासक्रमांतर्गत तो सध्या दहावी परीक्षेची तयारी करत आहे.

### “कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक २०२५”

## स्पर्धेचा बक्षीस वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ २० जुलै रोजी पुण्यात

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सतेज संघ, बाणेर यांच्या वतीने तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित "कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी निमंत्रित राज्यस्तरीय पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा - २०२५" व "पुणे लिग कबड्डी स्पर्धा २०२५" चा बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि. २० जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

हा समारंभ म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे संपन्न होणार असून, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते होणार आहे.

याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून त्यामध्ये - चंद्रकांत पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री), दत्तात्रय भरणे (क्रीडामंत्री), माधुरी मिसाळ (राज्यमंत्री), अण्णा बनसोडे (विधानसभेचे उपाध्यक्ष) तसेच विविध विधानसभा मतदारसंघातील आमदार - दिलीप वळसे पाटील, शंकरराव मांडेकर, चेतन तुपे, हेमंत रासने, ज्ञानेश्वर कटके, सुनील शेळके, सुनील कांबळे, भिमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, समीर चांदेरे (अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, पुणे शहर), राहुल बालवडकर (उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, पुणे शहर) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे.

या कार्यक्रमात बाणेर, बालेवाडी, सुस व म्हाळुंगे या परिसरातील सुमारे ५००० विद्यार्थ्यांचा, जे इयत्ता १०वी व १२वी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत, गुणगौरव करण्यात येणार आहे. सन २००६ पासून सलग हा सन्मान सोहळा पार पडत आहे आणि प्रभागातील नागरिक, विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी होतात.

या कार्यक्रमाचे आयोजन राज्य संघटनेचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

## अनु पांडे ‘एसोएफ बेस्ट इंटरनॅशनल टीचर अवॉर्ड’ ने सन्मानीत

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** शिक्षकांना त्यांच्या निःस्वार्थ सेवेसाठी, विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे व शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ) द्वारे नांदे स्थित ध्रुव ग्लोबल स्कूलची शिक्षिका अनु पांडे यांना ‘एसोएफ बेस्ट इंटरनॅशनल टीचर अवॉर्ड’ देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी त्यांना हा पुरस्कार नवी दिल्ली येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे प्रदान करण्यात आला आहे. पुरस्कार स्वरूप अनु पांडे यांना ट्रॉफी व प्रशंसापत्र देऊन सन्मानित केले.

शिक्षणात उल्लेखनीय योगदान देण्यासाठी सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) कडून दिला जाणारा एक प्रतिष्ठित सन्मान आहे. हा पुरस्कार विशेषत विज्ञान आणि गणित क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांना दिला जातो. अनु पांडे यांनी यांच्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडून शिक्षणाची गुणवत्ता सुधारली आहे. नेतृत्वगुण प्रदर्शित करून शिक्षणात नावीन्यपूर्णता आणि दूरदृष्टी दाखवली आहे. तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन त्यांच्या उत्कृष्टतेसाठी प्रयत्न केले आहेत.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी, मुख्याध्यापिका संगीता राऊतजी व संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्यात.

### जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत बसला फटका

# भारताचा 'लॉर्ड्स'वर पराभव!

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** भारतातर्फे ‘पाचव्या दिवशी जिंकू’ असं ठामपणे सांगणाऱ्या वॉशिंग्टन सुंदरला जोफ्रा आर्चरने माघारी धाडताच भारताची स्थिती ढासळली. त्यानंतर एकामागोमाग एक फलंदाज बाद होत गेला आणि अखेर लॉर्ड्सवर इंग्लंडने भारताला पराभूत केले. पाचव्या दिवशी आम्ही नक्की जिंकू, असा दावा करणाऱ्या वॉशिंग्टन सुंदरने माती खाल्ली. जोफ्रा आर्चरला विकेट देऊन तो माघारी परतला अन् नंतर सारेच गणित बिघडले. इंग्लंडने लॉर्ड्स कसोटीवर राज्या गाजवतानामालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. भारताला पराभवामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या ( WTC ) गुणतालिकेत त्यांना धक्का बसला.

इंग्लंडच्या पहिल्या डावातील ३८७ धावांचा पाठलाग करताना भारताच्या डावातालाही ३८७ धावांवर ब्रेक लागला. लॉर्ड्सच्या खेळपट्टीचे अचानक रंग बदलला आणि इंग्लंडचा दुसरा डाव १९२ धावांवर गडगडला. वॉशिंग्टनने चार विकेट्स, तर जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. दुसऱ्या डावात भारतालाही झटके बसले. यशस्वी जैस्वाल ( ०), करुण नायर ( १४ ), कर्णधार शुभमन गिल ( ६) व आकाश दीप ( १) चौथ्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात माघारी परतले.

पाचव्या दिवसाचे पहिले सत्र इंग्लंडने गाजवले. तासाभराच्या खेळात ११.२ षटकांत भारताला फक्त ३७ धावा करता आल्या आणि त्यांनी तीन विकेट्स गमावल्या. जोफ्रा आर्चरने रिषभचा ( ९) त्रिफळा उडवला, बेन स्टोक्सेने राहुलला ( ३९) पायचीत केले. जोफ्राने स्वतःच्याच गोलंदाजीवर अफलातून झेल घेताना वॉशिंग्टन सुंदरला ( ०) माघारी पाठवले. रवींद्र जडेजा व नितीश कुमार रेड्डी यांनी सावध खेळ केला आणि त्यांना इंग्लंडच्या स्लेजिंगचा सामना करावा लागला.

जडू व रेड्डीची ९१ चेंडूंत ३० धावंची भागीदारी ख्रिस वोक्सने तोडली. त्याच्या इनस्विंग चेंडू बॅटला चाटून यष्टिरक्षकाच्या हाती विसावला. रेड्डी माघारी परतला तेव्हा भारताच्या ८ बाद ११२ धावा झाल्या होत्या. तेव्हा त्यांना विजयासाठी ८१ धावा हव्या होत्या.

#रा